✻ कर्नाटक शासन ✻

पदवीपूर्व शिक्षण मंडळ, बेंगळूरु.

# साहित्य-मंथन

## भाग-१

(पी.यु.सी. प्रथम वर्षाकरिता मराठी पाठ्यपुस्तक)

२०१५

# SAHITYA MANTHAN

**Part- I**

**(Ist Year P.U.C. Marathi Text Book)**

**Department of Pre-University Education**
**Malleshwaram, Bangalore.-12**

*© Department of Pre-University Education 2014-2015.*

***Revised Edition - 2017***

*Printed on 80 GSM Maplitho paper*

**All Rights Are Reserved**

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photo copying, recording or otherwise without the prior permission of the publisher.

This book is sold subject to the condition that it shall not, by way of trade, be lent, resold, hired out or otherwise disposed of without the publisher's consent, in any form of binding or cover other than that in which it is published.

The correct price of this publication is the price printed on this page/cover page. Any revised price indicated by a rubber stamp or by a sticker or by any other means is incorrect and should be unacceptable.

## Director's Message

Dear Students,

We at the Department of Pre-university Education, Karnataka strive to empower each student to dream big and equip them with the tools that enable them to reach new heights and successfully deal with the challenges of life. As Swami Vivekananda said, "**Real education is that which enables one to stand on one's own legs**".

The course contents in this book are designed with the objective of equipping you well for the next level of study.

We wish you well on your journey and look forward to you becoming a responsible citizen of the nation and give back to the betterment of the society.

With best wishes,

Sd/-
**C. Shikha,** IAS
Director
Department of Pre University Education
Bengaluru

# प्रस्तावना

N.C.E.R.T. आणि N.C.F. 2005 सालाची शैक्षणिक ध्येय, धोरणे, उद्दीष्टे नजरेसमोर ठेऊन सन् २०१३-१४ सालच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार पदवीपूर्व प्रथम वर्षाचा मराठी विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. काळाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास दृष्टीसमोर ठेवून 'साहित्यमंथन' या पाठ्यपुस्तकाची निर्मिती केली आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या योगाने पी.यु.सी. प्रथम वर्ष अभ्यास क्रमाची उद्दिष्टे. आशय यांची निश्चिती केली. तेंव्हा राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रम, अन्यराज्यांतील अभ्यासक्रमाची तुलना, समाजातील विविध स्तरांवरील मान्यवरांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांचा प्रश्नावलींच्या माध्यमातून केलेला अभ्यास, शिक्षणतज्ञांची मते यांचे अध्यायन करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मध्यवर्ती ठेवून आगामी काळाच्या आव्हानांचा विचार करुन अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली. पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकाची निर्मिती प्रक्रिया झाली आहे.

अभ्यासक्रमांची कालानुक्रमे प्राचीन, अर्वाचीन व आधुनिक असे तीन टप्पे करुन त्या त्या काळातील साहित्य अभिरुचीचा आस्वाद विद्यार्थ्यांनी घ्यावा अशी रचना करण्यात आली आहे. विविध लेखक, कवी कथाकार, नाटककार आणि कादंबरीकार यांच्या विविध साहित्य क्षेत्रांशी संबंधीत असलेल्या वेगवेगळ्या, विचार प्रवाहाचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे व त्यांच्या नवनिर्मिती क्षमतेला चालना याकडे लक्ष पुरविले आहे. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीसाठी संपादक मंडळ, सदस्य, समीक्षक, पदवीपूर्व शिक्षण विभागाचे निर्देशक, सहनिर्देशिका, सहायकनिर्देशक व संबंधीत आधिकाऱ्यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करुन सहकार्य केले. त्याबद्दल पाठ्यपुस्तक समिती त्यांचे अत्यंत आभारी आहे.

बेळगांव येथील मराठा मंडळ पदवीपूर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व पदाधिकारी, पाठ्यपुस्तक समितीला सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या, तसेच 'श्री डी. टी. पी. केंद्राच्या' सौ. मीना अनंत काकतीकर, बेळगांव यांनी सुबक टंकलेखन करुन सहाय्य केले. या सर्वांनी केलेल्या मार्गदर्शनातून व घेतलेल्या परिश्रमातून हे पाठ्यपुस्तक साकार झाले आहे.

**अध्यक्ष**
**श्री.सूर्यवंशी यशवंत एन.**
**पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ**

# प्रस्तावना

२०१३-१४ सालच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार पदवीपूर्व प्रथम वर्षाचा मराठी विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. काळाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास दृष्टीसमोर ठेवून 'साहित्यमंथन' या पाठ्यपुस्तकाची निर्मिती केली आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या योगाने पी.यु.सी. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाचीउद्दिष्टे. आशय यांची निश्चिती केली. तेंव्हा राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रम, अन्यराज्यांतील अभ्यासक्रमाची तुलना, समाजातील विविध स्तरांवरील मान्यवरांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांचा प्रश्नावलींच्या माध्यमातून केलेला अभ्यास, शिक्षणतज्ञांची मते यांचे अध्यायन करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मध्यवर्ती ठेवून आगामी काळाच्या आव्हानांचा विचार करुन अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली. पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकाची निर्मिती प्रक्रिया झाली आहे.

अभ्यासक्रमांची कालानुक्रमे प्राचीन, अर्वाचीन व आधुनिक असे तीन टप्पे करुन त्या त्या काळातील साहित्य अभिरुचीचा आस्वाद विद्यार्थ्यांनी घ्यावा अशी रचना करण्यात आली आहे. विविध लेखक, कवी, कथाकार, नाटककार आणि कादंबरीकार यांच्या विविध साहित्य क्षेत्रांशी संबंधीत असलेल्या वेगवेगळ्या, विचार प्रवाहाचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे व त्यांच्या नवनिर्मिती क्षमतेला चालना याकडे लक्ष पुरविले आहे. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीसाठी संपादक मंडळ, सदस्य, समीक्षक, पदवीपूर्व शिक्षण विभागाचे निर्देशक, सहनिर्देशिका, सहायकनिर्देशक व संबंधीत आधिकाऱ्यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करुन सहकार्य केले. त्याबद्दल पाठ्यपुस्तक समिती त्यांचे अत्यंत आभारी आहे.

बेळगांव येथील मराठा मंडळ पदवीपूर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व पदाधिकारी, पाठ्यपुस्तक समितीला सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या, तसेच 'श्री' डी. टी. पी. केंद्रा' च्या सौ. मीना अनंत काकतीकर, बेळगांव या§नी सुबक टंकलेखन करून सहाय्य केले. या सर्वांनी केलेल्या मार्गदर्शनातून व घेतलेल्या परिश्रमातून हे पाठ्यपुस्तक साकार झाले आहे.

**अध्यक्ष**

**श्री.सूर्यवंशी यशवंत एन.**

# अध्यापकाशी संवाद

**मित्रहो !**

कर्नाटक राज्याच्या पदवीपूर्व नव्या अभ्यासक्रमाचे पुस्तक मसाहित्य मंथनफ आपल्या हाती देताना आनंद होत आहे. या निमित्ताने आपणाशी संवाद साधण्याची संधीही मिळते आहे.

मसाहित्य मंथनफ मधील गद्य-पद्य निवडताना भाषेच्या वाचन, लेखन, श्रवण आणि संभाषण या भाषिक कौशल्याचा विचार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या या कौशल्यांचा विकास हेच भाषेच्या अध्यापनाचे ध्येय आणि यश असते. विद्यार्थ्यांची अभिरुची, अभिवृत्ती, अनुवादक्षमता विकसित होईल, त्याच्या मनात भाषाभगिनीबद्दलचा आदर, निकोप सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोन निर्माण होईल या साऱ्यांचा विचार करुनच या अभ्यासक्रमाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

भाषेचा आणि त्यातील लेखनाचा काळानुसार विकास होत असतो. हा विकास व लेखनाचे बदलते स्वरूप लक्षात येईल यापध्दतीने गद्य व पद्यांचा क्रम ठेवला आहे. त्यानुसार महानुभाव साहित्य, बखर साहित्य, पंडितीकाव्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य यांची निवड केली आहे. तर सर्व लेखनप्रकार कळावे आणि अवगत व्हावे या हेतूने अभंग, ओवी, धवळे, कविता, ललितगद्य, वैचारिक लेख, कथा, नाट्यप्रवेश, निबंध यांची निवड करण्यात आली आहे. एकच भाषा प्रत्येक काळात आणि प्रत्येक साहित्यानुसार कशी बदलते, त्या त्या साहित्यप्रकाराचा आशय कसा घडतो हे त्यामुळे विद्यार्थ्यास कळेल.

कवी वा लेखक हे कोणत्या विचारांचे आहेत, कोणत्या साहित्यप्रवाहातील व परंपरेतील आहेत. कोणत्या काळातील आहेत, हे विद्यार्थ्यांना सांगणे सोपे जावे म्हणून तसा लेखक परिचय व पाठ-कविता परिचय दिलेला आहे. शेवटी कठीण शब्दाचे अर्थ, प्रश्न, व उपक्रमही दिला आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गोडी निर्माण होईल व तो त्यात अधिक रमेल.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडण्यासाठी त्याच्यावर मूल्यसंस्कार होणे गरजचे असते. त्या दृष्टीने पाठांची निवड करून प्रेम, दया, सहानुभूती, देशभक्ती, परोपकार, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणरक्षण, माणुसकी यांचे संस्कार त्यावर होईल असे वाटते.

अध्यापक मित्रानो, शेवटी या अभ्यासक्रमाची पुढची पालखी आता आपल्या खांद्यावर आहे. विद्यार्थ्यांच्या सर्व अंतर्गत क्षमता विकसित व्हाव्या, भाषासंस्कृतीची सर्व अंगे त्याने स्वीकारावी हा आमचा हेतू. आता आपणच पूर्ण करणार आहात. हे नवे शैक्षणिक धोरण आपणासारखे तळमळीचे शिक्षक या चळवळीतून आणखी पुढचे कार्य करतील असा विश्वास वाटतो.

**संपादन समिती**

# आभार

**'साहित्यमंथन'** या पाठ्यपुस्तकामध्ये खालील लेखक/कवी यांनी त्याचप्रमाणे वारसदाराने संबंधीत उतारे समाविष्ठ करण्यास परवानगी दिली त्याबद्दल कर्नाटक शासनाचा पदवीपूर्व शिक्षणविभाग त्यांचा आभारी आहे.

१) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, चिपळूण येथील 86 व्या. अ. भा. म. साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष (बदलते बोरगांव),
२) प्रा. अशोक राणा, (राष्ट्रमाता जिजाऊ)
३) सिंधूताई सपकाळ (घार हिंडते आकाशी)
४) महादेव मोरे (पहिली शिकार)
५) प्रा.फ.मु.शहाजिंदे (रबीची पेरणी)
६) बी.ए.कांबळे (नावलौकिकसंत :कनकदास)

सदरील लेखक कवी, कथाकार, व कादंबरीकार यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता, अभ्यासक्रमासाठी लेख व पाठ कविता ठेवण्यास आनंदाने परवानगी दिली. त्याबद्दल अभ्यासक्रम मंडळ त्यांचे हृदयपूर्वक आभार व्यक्त करते.

# TEXT BOOK COMMITTEE

| Names and Address of the Text Book Committee | |
|---|---|
| 1) Shri. Suryawanshi Yeshwant N.<br>**Chairman**<br>Govt. P.U. College for Girls<br>GULBARGA- 585105 | |
| 2) Shri. D.N. Jabhade<br>Lecturer<br>B.S. Comp. P.U. College<br>Bedkihal Tal : Chikodi<br>Dist : BELGAUM-591214 | 6) Shri. V.B. Hiremath<br>Lecturer<br>C.S.S. P.U. College, Chikodi<br>Tal : Chikodi<br>Dist : Belgaum - 591201 |
| 3) Shri. S.M. Rajure<br>Lecturer<br>Shivaji P.U. College-Bhalki<br>Dist : BIDAR – 585328 | 7) Shri. N.M. Sanadi<br>Lecturer<br>M.M's P.U. College<br>Khanapur-Belgaum-591302 |
| 4) Shri. S.V. Deshmukh<br>Lecturer<br>D.N. Nadage P.U. College<br>Karadga, TAl : Chikodi<br>Dist : BELGAUM - 591263 | 8) Shri. A.S. Jadhav<br>Lecturer<br>S.N.P.U. College<br>Bhalki – Dist- BIDAR- 585328 |
| 5) Shri. G. N. Sapre<br>Lecturer<br>A.V.M. Comp. P.U. College<br>M. Vadgaon – BELGAUM<br>590005 | 9) Shri. S.D. Kamble<br>Lecturer<br>S.M.V.V.T.S. Ind. P.U.College<br>Examba TAl : Chikodi<br>Dist : BELGAUM- 591244 |

पी. यु. सी. प्रथम वर्षाचे पाठ्यपुस्तक तयार करुन वरील समितीने जे महत्वाचे कार्य केले त्याबद्दल पदवीपूर्व शिक्षण मंडळ संपादन समितीचे अत्यंत ऋणी आहे.

निर्देशक
पदवीपूर्व शिक्षण विभाग
बेंगळूरु - १२

---

# Reviewers

01. Prin. F.M. Madar
Govt. P.U. College-KALLEHOL
TAl & DIST : BELGAUM

02. Prin. S.B. Jahur
Govt P.U. College- YALGURATI
Dist : DHARWAD

03. Prin. Revati Deshapande
Darbar P.U. College-BIJAPUR

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही

गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांसः

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा

व उपासना यांचे स्वातंत्र्य;

दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेस

आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी

याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करुन स्वतः प्रत अर्पण करत आहोत.

***

# अनुक्रमणिका
## गद्य-विभाग-(सुक्ष्म वाचन)


| अक्र | विषय | लेखक / लेखिका | शि. तास | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | चक्रधरांची अहिंसावृत्ती व विनोदबुध्दी | म्हांईभट | ०३ | |
| २ | दत्ताजी शिंदे यांचे वीरमरण व वीरवचन | भाऊसाहेबांची बखर | ०३ | |
| ३ | शेतकऱ्यांची परिस्थिती | महात्मा ज्योतिबा फुले | ०३ | |
| ४ | युवकांपुढील आव्हाने | यशवंतराव चव्हाण | ०४ | |
| ५ | घार हिंडते आकाशी | सिंधूताई सपकाळ | ०४ | |
| ६ | जातील हे बी दिवस | प्र. ई. सोनकांबळे | ०४ | |
| ७ | शेरास सव्वाशेर | भा. वि. वरेरकर | ०४ | |
| ८ | नाव लौकिक संत- संत कनकदास | बी. ए. कांबळे | ०४ | |
| ९ | जेंव्हा आपलाच इतिहास आपण विसरतो.. | मूळ लेखिका सुधामुर्ती (अनुवादक - लीना सोहनी) | ०४ | |
| १० | वीरमाता जिजाऊ | प्रा. अशोक राणा | ०४ | |
| ११ | टारफुला | शंकर पाटील | ०३ | |
| १२ | संगणकाचे महत्व | माधव राजगुरु | ०३ | |

# पद्य विभाग



| अ. क्र. | कवितेचे नांव | कवी / कवयित्री | शि. तास | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | महदंबेचे धवळे | महदंबा | 0३ | |
| २ | गुरुमहात्म्य | संत ज्ञानेश्वर | 0२ | |
| ३ | संतवाणी<br>अ) मनुष्य करिसी<br>ब) विठु माझा लेकुरवाळा<br>क) हीन याती माझी देवा<br>ड) चंदनाचे हात पायही चंदन | –<br>संत नामदेव<br>संत जनाबाई<br>संत चोखामेळा<br>संत तुकाराम | 0५ | |
| ४ | सीतागीत | मोरोपंत | 0४ | |
| ५ | लटपट लटपट तुझे चालणे | होनाजी बाळा | 0३ | |
| ६ | मराठी माती | कुसुमाग्रज | 0४ | |
| ७ | आईची आठवण | माधव ज्युलियन | 0३ | |
| ८ | संसार | बहिणाबाई चौधरी | 0३ | |
| ९ | पंचारती | इंदिरा संत | 0३ | |
| १0 | आनंदी पक्षी | बालकवी | 0३ | |
| ११ | तेव्हा जीवन मला हे कळू लागले | वामन कर्डक | 0३ | |
| १२ | रबीची पेरणी | फ. म. शहाजिंदे | 0२ | |
| १३ | पोरी | अनुराधा पाटील | 0२ | |

# स्थूलवाचन-विभाग (अपठित)

| अ. क्र. | कथेचे नांव | लेखक / लेखिका | शि. तास | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | बदलते बोरगांव | डॉ.नागनाथ कोत्तापल्ले | ५ | |
| २ | पहिली शिकार | श्री. महादेव मोरे | ५ | |
| ३ | तिची वाटच वेगळी | सौ. मथू सावंत | ५ | |
| ४ | देव घावला! देव पावला | श्री. वामन होवाळ- | ५ | |

# व्याकरण विभाग

| अ.क्र. | विषय | शि. तास | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | निबंध | ०५ | |
| २ | प्रयोग | ०१ | |
| ३ | काळ | ०१ | |
| ४ | सामान्यरुप | ०१ | |
| ५ | वाक्याचे प्रकार | ०१ | |
| ६ | पत्रलेखन | ०२ | |
| ७ | अनुवाद | ०१ | |
| ८ | विरुध्दार्थी शब्द | ०१ | |
| ९ | जोड्या जुळवा | ०१ | |
| १० | वाक्प्रचार | ०१ | |
| ११ | समानार्थी शब्द | ०१ | |
| १२ | इंग्रजी प्रतिशब्द | ०१ | |

# गद्य विभाग

# १. लीळाचरित्र

## म्हाइंभट (सुमारे इ.स. १२३० ते १३००)

इ.सनाच्या बाराव्या शतकात महानुभाव पंथ या नावाचा एक भक्तिपंथ उत्तर महाराष्ट्रात उदयाला आला होता. श्री. चक्रधर हे या पंथाचे संस्थापक. म्हाइंभट या त्यांच्या शिष्याने, 'लीळाचरित्र' या नावाचे श्रीचक्रधरांचे चरित्र लिहिले असून हाच मराठीतील पहिला चरित्रग्रंथ मानला जातो. या ठिकाणी श्री. चक्रधरस्वामींच्या स्वभावाचे एक दोन विशेष दाखविणाऱ्या दोन छोट्या कथा निवडल्या आहेत.

प्राचीन मराठी वाङ्मयातील गद्याचा एक नमुना या दृष्टीने 'लीळाचरित्राचे' महत्व या लीळेत मोठे आहे.

### १) अहिंसावृत्ती :

गावीं एकी वृक्षाखालि आसन : तव पारधी वाटे ससा सीडीला : तेया पाठी सुणी सोडीली : काकूळती येउनि ससा जानूतळि रीगाला : सूणी उभी राहिली : मागील कडौनि पारधी आले : तेही वीनविले : ससा सोडीजो जी : सर्वज्ञे म्हणीतले : हा एथ सरण आला : पुडती तीही म्हणीतले : जी जी हा होडेचा ससा जी : हां सोडावाः जी : सर्वज्ञे म्हणीतलेः हां गा : एथ सरण आलेया काइ मरण असे : हां गा : ए. रानीं असति : पाणी पीति : याते तुम्ही कां मारा : तींहीं म्हणीतलें : जी जीं : आजि लागौनि न मरुं : मग : तें निघाले : मग : सर्वज्ञे म्हणीतलें : माहात्मे हो : आतां जाए ऐसें : भणौनि : जानु उचलिली : मग ससा निगाला ।। १।।

### २) चक्रधरांची विनोदबुध्दी :

मग बोणेबाइचीए गुंफेसि चोरु नीगाला : तो अवघे पदार्थ वाहीरि आंगणा घेउनि आला : तेथ आपुलिये जाडीं : मोट बांधत असे : तवं तीहीं कवाड दाटुनि घातले : मग बोबाति : धांव वा मूनिदेया : चोरें नागविलेंः वा मुनिदेया : ऐसीया बोबात असति : तवंः गोसावी बीजे केले

: सांचलु पडीला : आणि चोरें वास पहिली : तव गोसावीयाची श्रीमूर्ती वाढीनली देखीली : ऐसेनी चोरु पळालाः मोट जाडीची सांडौनि पळाला : मग सर्वज्ञे म्हणीतले : बाइ :कां कांही म्हणत असा बाइः बोबाता? चोरें नागविलों बा मूनिदेया : उघडा वाइ कवाड : कवाड उघडुनि बाहीरि आली : मग मोट सोडवीली : पा पा : बाइ : तुमचें काइ गेलेंः अमूकें असेः अमूकें असेः अवघेही पदार्थ होतेः सर्वज्ञे म्हणीतलें : बाइ : जाडी कोणाची : तेंही म्हणीतेलें : जाडी चोराची : सर्वज्ञे म्हणीतलें : बाइ : तरि कवणे कवणु नागवीला : तरि : उपराठा चोरुचि नागवीलाः तवं तेही म्हणीतलें : आतां तो जाडिकारणें मागुता येइल : सर्वज्ञे म्हणीतलें : बाइः हें एवढे एयातें एसणें एक वाढीनलें देखीलें : तो भीयाला :तो गेलाः ।।२।।

**शब्दार्थ**

सुणी- कुत्री, जानूतळि-मांडीखाली, रीगाला-गेला, सर्वज्ञ-श्री चक्रधरस्वामी, होडेचा - पैजेचा, महात्मे हो -सशाला गमतीने महात्मा म्हटले आहे, बोणेबाइ-एका स्त्रीचे नांव, गुंफा-निवासस्थान, घर, जाडी-चादरीसारखे जाड वस्त्र, कवाड दाटुनि घातले-दार घट्ट लावले, बोबात-बोभाटा, आराडाओरडा, मुनिदेव-श्री चक्रधर, बीजे केले-गेले, वास पाहिली-दिशेकडे पाहिले, सांडौनि-सोडून, पा पा-पाहा, एयातें-याला, एसणे-एवढे, सांचलु-चाहुल.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) चक्रधरस्वामी कोठे बसले होते?
२) चक्रधरस्वामी यानी महात्मा कोणाला म्हटले आहे?
३) बोणेबाईने आरडा ओरडा का केला?
४) चक्रधरस्वामींनी कोणी कोणाला नागवले असे का म्हटले?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) चक्रधरस्वामीनी पहिल्या लीळेतून कोणता विचार मांडलेला आहे?
२) चक्रधरस्वामी यांच्या स्वभावाचे कोणते गुणविशेष या लीळेतून प्रकट झाले आहेत?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** “हां गा : एथ सरण आलेयां काइ मरण असे :”

२) “बाई : हे एवढं एयातें एसणे एक वाढीनले
देखीले : तो भीयाला : तो गेलाः”

**ई) टीप लिहा.**

१) चक्रधरांची विनोदबुध्दी

**उ) उपक्रम**

**महानुभवपंथांचे दृष्टांत व लीळाचरित्र मिळवून वाचा.**

****

# २. दत्ताजी शिंदे यांचे वीरमरण व वीरवचन

## भाऊसाहेबांची बखर

प्रस्तुत उतारा 'भाऊसाहेबांची बखर' या ग्रंथातून निवडलेला आहे. या बखरीचा लेखक कोण याविषयी निश्चित माहिती मिळत नाही.

'बखर' हा शब्द 'खबर' या फारसी शब्दावरुन मराठीत रुढ झालेला असून त्याचा अर्थ हकिकत, इतिहास असा आहे. शिवाजीमहाराजांनी स्वराज्यसंस्थापना केल्यापासून मराठयांचे राज्य लयाला जाईपर्यंतच्या सुमारे दोनशे वर्षात शे-सव्वाशे बखरी लिहिल्या गेल्या मात्र बखरीत केवळ रुक्ष इतिहास असत नाही. त्यातील व्यक्तिदर्शन, स्वाभिमान, रसात्मकता आणि भाषा सौंदर्य या गुणामुळे बखरी ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे मनोरंजकही झाल्या आहेत.

या उताऱ्यात पेशव्यांचे उत्तरेतील सरदार, ग्वाल्हेरचे दत्ताजी शिंदे यांनी पानिपतपूर्व लढाईत कशी मर्दुमकी गाजविली आणि मृत्युसमयीही कसा बाणेदारपणा दाखविला त्यांचे अत्यंत वीरश्रीपूर्ण वर्णन वाचावयास मिळते.

---

इकडे दत्ताजी शिंदे यांस बयाजी शिंदे याजकडील स्वार धांवत आला आणि सांगितले की, 'पाटील' बयाजी शिंदे तो ठार पडले. मुर्दा त्यांनी नेला. आणि घाट घेऊन फौज जमाऊन उभी आहे. असे ऐकताच नगार केला. दत्ताजी शिंदे घोड्यावरि स्वार जाले तों फौज अगोदरच सिध्द होती. जनकोजी शिंदे यानी अंगात वक्तर घातले. दत्ताजी शिंदे यांनी रागास येऊन आंगातील सामान काढविले. आणि बोलले की, "आज काही आम्ही युध्द करीत नाही, मल्हारराव होळकर नजीक आले

आहेत, एका दोहों रोजांत येऊन पोंचणार, तों पावेतों काव्यानेच, दुरुन राहावे.” म्हणोन रागास येऊन आंगातील सामान काढविलें. आपण घोडियावर स्वार जाले. घाटाचे सुमारें चालिले, तों फौज जमून मुजऱ्यास आली. मुजरा करितात तों त्यास आज्ञा केली की, “निशाणाबराबर चालावें.” म्हणून फौज निशाणाबराबर लाविली. तों यमुनातीरी अडचण भारी, शेरण्याची बेटें होती, दिसेनात असे अडचणीत शिरले. मराठियास पाठीवर काठी उडत असली तरच हिंमत होते. त्यांत दैवयोगे करुन दडणभारी. कोणाची शरम कोणास नाही. तों निशाण जाऊन युध्दास थेटलें. ते समयी दोन्हीं तर्फेने तोफांचा, हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व गंजिफियाच्या गाड्या वगैरे गारभांडी व बंदुकांचा मार ऐसा जाहाला की जैसे भडबुंजे लाह्या भाजतात, की विद्युल्लता पात होतो. तैसा एकच धडाखा जाहाला. मोठी गर्दी जाहाली. बाणांचा वर्षाव मेघमालाप्रमाणे होऊ लागला. थोडे मनुष्य धुंद जहाले धुराची गर्दी जाहाली. तेणे करुन कोणी कोणास दिसेनातसे जाहाले. मोठे मोठे वीर, त्यांच्या वीरश्रिया उतरल्या. अलीकडे मराठियांनी झुंज याप्रमाणे पाहिले नाही. न भूतो न भविष्यति. ते समयी प्रसंगी होते त्यांस मात्र अनुभव असेल.

...इकडे दत्ताजी शिंदे यांजकडे तुंबळ युध्द होतच होतें. निशाणापाशी पांचशेही फौज नाहींशी जाली. आधीच मराठी फौज, हिंमत भारी नाहीं. त्यांत अडचण होती. त्यायोगेकरुन अडचणींत फौज गैब जाली. चाळीस हजार फौज; थोडकी नव्हती. परंतु अडचणीत कांही दिसेनासें जालें. इकडे निशाणाकडे जनकोजी शिंदे झोंबतच होते. दत्ताजी शिंदे निशाणाचे बाजूस उजवें होतें. दिल्लीचे बाजूनें पंचवीस खांसा व आपण उभे होते. गिलच्यास त्यांची धास्ती होतीच. इतकी फौज हिंमत सोडून होती. तों हत्तीवर घटका वाजत होती. आठ घटिका पूर्ण भरल्या. त्या अडचणींत पांचशें मनुष्यें ठार जालीं. तैशीच घोडींही पडली. तैसेच जखमीही जाले. केवळ शेणसडा होऊन गेला. तैशा समयीं जवळ तान्हाजी खराडा म्हणून सरदार होता, त्याने अर्ज केला की, “पाटील, दुराणीची फौज झाडून उतरली.

गोविंदपंत बुंदेले तों तिकडेच बुडविले. तैसेच मालोजी शिंदे यांस तेच गत जाली. निशाण उघडे पडले. अबरु जावयाचा प्रसंग आला. निशाण काढतां उत्तम आहे." असे म्हणताच दत्ताजी शिंदे यांनी उत्तर केले की, "आपण मेला जग बुडाला. अबरु जाते आणि वाचतो कोण? अजून काय निघावयाची बाकी राहिली कीं काय? सफेजंग होऊन गेली. आता निशान काढाल तर फौज पळूं लागेल. मग म्यांही पळावें? मग देशी तोंड म्यां दत्ताजीनें काय म्हणून दाखवावें?" असें बोलिल्यावर तान्हाजीं खराडे मागती बोलिलें कीं, "पूर्वीपासून देव, दैत्य, दानव काय करीत गेले? त्यांस आम्हीं मृत्युलोकीचे मानव पडलों. वेळेस मान द्यावा. यासमयी काळावर नजर देऊन निघावें." म्हणोन बोलिले. त्यावर दत्ताजी शिंदे यांनी साफ सांगितलें कीं, "हा खंदारचा पादशहा अबदुल अली चालून आला आहे. या रानांत ईश्वरें मृत्यु आणिला तरि उत्तम आहे. योगी, संन्यासी, तपस्वी नाना प्रकारचे देहदंड करितात की मोक्षसाधन व्हावें. त्यांत आम्हां क्षत्रियांचे स्वधर्म हेच कीं, रणांत विन्मुख न होतां मृत्यु आल्यास सर्वही साधने साधिली. तें ही कर्म ईश्वरें दाटून वोढून आणिलें. अशांत जो कोणी अभागी आहे तो विन्मुख होईल! रण सोडुन निघालियास दोहींसहीं मुकावें, इकडे नर्कसाधन, इकडे अपेश मरणाहून वोखटें. यांत मरतांच उत्तम!" म्हणून गाडून उभे राहिले.

तों इकडे जनकोजी शिंदे निशाणापाशी झोंबत होते. त्यांचे उजवे दंडास एकाएकीच गोळी लागून दंड फोडून हाड बाहेर आलें. जनकोजी शिंदे यांस तव येऊन घोड्याखाली आले. तों जवळ खिजमतगार उभा होता. तो धांवत दत्ताजी शिंदे यांजकडे आला. आणि घाबरेपणे वर्तमान सांगितलें. कीं, "बाबासाहेब गोळी लागून पडले." असे वर्तमान ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं जवळ लोक उभे होते त्यांस जाबसाल केला कीं, "बाबा आम्हांस सोडून गेले, आतां आम्हांस देशी तोंड दाखवावयास येणार नाहीं. रणांत मृत्यू आला तर उत्तम आहे. नाहीं तर विष भक्षूण प्राण द्यावा." असें बोलून दत्ताजी शिंदे यांचे पुढें दहा हजार कुतुबशाहा व दुराणीचे लोक उभे होते. त्यांजवर अठरा असामीनिशी घोडे घातले. घोडियाचे तोंड शिरलें. तों त्यामध्यें अकरा खांसे ठार पडले. जात्या

खाशांनी घाव केला. तेथून माघारे गोळीच्या माऱ्यांत निघाले. तों यशवंतराव जगदळे थोराळेकर यांस गोळी लागून ठार पडले. त्यांचा भाऊ पिराजी जगदळेही समागमेंच होता. त्यानें भावाचे मुरदियासाठी बहुत प्रयत्न केला. काढावा म्हणून बोलविले. म्हणोन पाटील यांनीं लालमणी घोडियाचें तोंड माघारें किंचित फिरविले. मुर्दा ओढा ओढा म्हणून बोलतात तों एकाएकींच आकाशाची दोरी तुटते, तैशी गोळी येऊन उजवे बगलेस बरगडीत लागली, आणि घोडियाखाली आले. तों नजीक राजाराम चोपदार व राघोबा शेणबइ पागनीस होता. त्यांनीं इत्यर्थ केला कीं, “बहुत दिवस यांचें अन्न भक्षिलें, आणि पाहिजे तितके विलास यांच्या जिवावर केले. आतां यांस टाकून जावें याहून मरण बरें. म्हणोन घोडियावरुन उतरले. तों (दत्ताजी) घायाळ होतें. प्राण कांही गेला नव्हता. घायाळ काढावा तरि त्यांजकडिल फौजेची निकड बसली. घायाळ काढावयास फुरसत पडेनासी जाली. तों नजीबखान रोहिला याचा गुरु कुतुबशाहा यांच्या अंबाऱ्या नजीक आल्या. राघोबा पागे यांनी राजाराम चोपदार यांस सांगितले कीं, “तुम्ही कुतुबशाहा याजपावेतों जाऊन पोंचावें. दत्ताजी शिंदे रणांत घायाळ म्हणून सांगावें कीं, तुम्हीं यांचा बचाव करावा नाहींतर अब्दुल अली हरामी यांची गाठ पडली तर आमचें व पाटील यांचे शीर कापून नेतील. त्याहून यांजकडे पाडाव सापडले ते उत्तम.” म्हणून राजाराम चोपदार यांस सांगून पाठविलें. तों कुतुबशाहाची अंबारी केवळ नजीक आली. त्यांस राजाराम चोपदार यानें जाऊन मुजरा केला. रात्रंदिवस येणें जाणें सहजच होतें. ओळख पूर्वीच होती. “राजाराम तूं कहां?” म्हणून अविंधी भाषेंने पुसलें. त्यानें ही खरें वर्तमान सांगितले कीं, “साहेब, पटेल घायाळ पडा है, या बचावे.” असें म्हणताच कुतुबशाहास मोठा आनंद जाला. इक्षुदंडातून शर्करा सांपडते, तैसा अनायासे करुन महालाभ जाला. बोलिला कीं, “पटेल कहां हैं? दिखलावं.” म्हणून तैसेंस अंबारी राजाराम जेथें दत्ताजी शिंदे घायाळ पडले होते तेथें घेऊन आला. कुतुबशाहा यानें अंबारीतून खालीं उतरुन जवळ आला. तों दत्ताजी शिंदे उताणे पडले होते. तेथें कुतुबशाहा यानें जाबसाल केला कीं, “पटेल हमारे साथे तुम और लढेंगे?” म्हणोन पुसलें. दत्ताजी शिंदे सावध होते. त्यास पुरतें उमजलें कीं, “हे कांही

आपणास वांचवीत नाहीत, मग व्यंग गोष्टी सांगणें हें विहीत नव्हें." म्हणून दम बांधोन जाबसाल केला की, "निशा अकताला! बचेंगे तो और बी लढेंगे."

## शब्दार्थ

वक्तर-चिलखत.हस्तनाल-हत्तीवरील तोफ. सुतरनाल-उंटावरील तोफ. जेजाल-लांब नळीची बंदूक. गंजिफा-दारुगोळ्याच्या गाड्या. भडबुंजे-लाह्या भाजणारे भट्टीवाले. गैब-गायब(अदृष्य). खांसा-महत्वाची व्यक्ती. गिलचा-इराणी (सैन्य). सफेजंग-घनघोर लढाई. वोखटे-वाईट. तव-ग्लानी. खिजमतगार-सेवक, हुजऱ्या. अविंध-मुसलमान. इक्षुदंड-ऊस. जाबसाल-प्रश्नोत्तर, संभाषण. व्यंग गोष्टी-आपल्या कमी पणाच्या गोष्टी. ग्लानता- गयावया. शाहादाने-मोठा नगारा. गारभांडी-चापाच्या बंदुका. निशा अकताला-परमेश्वर इच्छील तर.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) दत्ताजी शिंदे रागाने जनकोजी शिंदे यांस काय म्हणाले?

२) बाणांचा वर्षाव कशाप्रमाणे होऊ लागला?

३) निशाण काढता उत्तम आहे असे म्हणताच दत्ताजी शिंदे यांनी कोणतें उत्तर दिले?

४) जनकोजी शिंदे मेले असे सांगताच दत्ताजी शिंदे काय म्हणाले?

५) कुतुबशाहा दत्ताजी शिंदे यांना काय म्हणाले?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) दत्ताजी शिंदे यांच्या स्वभावाचे वर्णन करा?

२) दत्ताजी शिंदे व कुतुबशाहा यांच्यातील युध्दाचे वर्णन करा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "मराठियास पाठीवर काठी उडत असली. तरच हिंमत होते"

२) "आपण मेला जग बुडाला, अब्रु जाते आणि वाचतो कोण?"

३) "बहुत दिवस यांचे अन्न भक्षिले, आणि पाहिजे तितके विलास यांच्या जीवावर केले. आता यास टाकून जावे याहून मरण बरे."

**ई) टीप लिहा.**

१) क्षत्रियांचा स्वधर्म

**उ) उपक्रम**

**पानिपतच्या युध्दाविषयी अधिक माहिती मिळवून वाचा.**

****

# ३. शेतकऱ्यांची परिस्थिती

## महात्मा फुले

**परिचय : जोतीराव गोविंदराव फुले (१८२७-१८९०)**

'महात्मा फुले' या नावाने सर्वपरिचीत, एकोणिसाव्या शतकांतील थोर कर्ते समाजसुधारक समतेवर आधारलेल्या समाजाची संकल्पना मांडणारे विचारवंत. स्त्रियांसाठी व अस्पृश्य मुलांसाठी पुण्यामध्ये शाळा उघडून शिक्षणाचा प्रवाह समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचण्यास त्यांनी फार कष्ट घेतले. अंधश्रध्दांचे निर्मूलन होऊन समतावादी विचार समाजात रुजावा, यासाठी सत्य शोधक समाजाची स्थापना केली. महाराष्ट्रात पुढे निर्माण झालेल्या समतावादी पुरोगामी चळवळीच्या मागे महात्मा फुले यांची प्रेरणा आहे. समाजसुधारणेचा हेतूने महात्मा फुले यांनी विपुल लेखन केले आहे. 'अखंडादि काव्यरचना', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' यासारखी महात्मा फुले यांची पुस्तके प्रसिध्द आहेत.

या पाठामध्ये महात्मा फुले यांनी दारिद्रयाने गांजलेल्या शेतकऱ्यांची बाजू घेऊन त्या वेळच्या इंग्रज सरकारला धारेवर धरले आहे. सरकारच्या अन्यायी आर्थिक धोरणातील विसंगती त्यानी आपल्या आक्रमक शैलीत स्पष्ट केल्या आहेत. सरकारचे धोरण कसे चुकते आहे, हे स्पष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी त्या काळातील इंग्रज सरकारच्या कामगारांची आणि शेतकंऱ्याची तुलना केली आहे. या तुलनेमधून महात्मा फुले यांच्या मनातील शेतकऱ्याविषयीचा कळवळा, तसेच अन्यायाच्या विरोधातील चीड व्यक्त होते.

अहो, सरकारचे मनांत जर आम्हां कंगाल शेतकऱ्यांविषयी खरोखर कळवळा आहे. तर ते आपले विलायती सावकारांचे एक अर्ब रकमेचें व्याज अजीबाद बंद कां करीत नाहींत? आणि तसें केल्याबरोबर शेतकऱ्यांचे पाय कसे थारी लागत नाहींत, हं पाहूं बरें? परंतु आमच्या सरकारनें मध्येंच एखादी नवीन मोहीम परदेशांत उपस्थित करुन तिकडेही वांचवलेली रकम खर्ची घालू नये, म्हणजे त्याच्या न्यायीपणाची चहूंकडे वाहवा होईल. व मे. वेडरबर्नसाहेबासारख्या परोपकारी, उदार पुरुषांनी प्रथम आपल्या विलायती सरकारांचे व्याज अजीबाद कमी करण्याविषयीं सरकारची चांगली कानउघाडणी करण्याचें काम एकीकडे ठेवून, अशा नव्या ब्यांकी उपस्थित करण्याचें नादी लागून शेतकऱ्यांचे माथ्यावर अपेशांचे खापर फोडूं नये. कारण त्यापासून कोणत्याही पक्षाचें हित होणें नाहीं, इतकेंच नव्हे परंतु याशिवाय आमचे गव्हरनर जनरलसाहेबांनी एकंदर सर्व लष्करी, न्याय, जंगल, पोलिस, विद्या वगैरे लहानमोठ्या सरकारी खात्यांतील शंभर रुपयांचे पगारावरील कामगारांचे पगार व पेनशनी कमी करण्याविषयीं आपल्या मुख्य विलायती सरकारास शिफारस करुन त्याविषयीं बंदोबस्त केल्याविना शेतकऱ्यास पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळून त्यांचे कपाळचा कर्जबाजारीपणा सुटणार नाहीं. शेतकऱ्यांनी आपल्या बायकामुलांसह रात्रंदिवस शेतांत खपावे. तरी त्यास शेतसारा व लोकल फंडावरुन आपल्या कुटुंबातील दर मानसी दरमहा तीन तीन रुपयेही पडत नाहीत; आणि साधारण युरोपियन व नेटिव्ह सरकारी कामगारांस दरमहा पंधरा रुपये नसत्या किरकोळ खर्चास व दारुपाण्यास सुध्दा पुरत नाहीत. मग कलेक्टर वगैरे कामगारासारख्या नबाबांचे येथील बेलगामी किरकोळ खर्चाविषयी गोष्ट काढल्यास आमचें कोण ऐकतो? यास्तव आपण, येथील एक आठ बैली कुणबावा ओढणारा शूद्र शेतकरी असून त्याचे चारपाच कर्ते मुलगे आहेत. व ज्यांचे कुटूंबातील सुनाबाळा एकापेक्षा एक अधिक एकमेकींच्या पायावर पाय देऊन चढाओढीनें, घरी व शेती,रात्रंदिवस खपणाऱ्या आहेत. व जो सावकाराची फुटकी कवडीसुध्दां कर्ज देणे लागत नाहीं. अशाची स्थिती, येथील एका युरोपियन फलटणीतील साधारण गोऱ्या सोजराच्या स्थितीशीं सूक्ष्म रीतीने तुलना करुन पाहिली असतां, त्यामध्यें काशीरामेश्वरापेक्षांही जास्ती अंतर दिसून येते. इकडे शुद्र शेतकरी लंगोटी नेसून करगुट्याला चुना तंबाखूची गुंतविलेली बटवी,

डोईवर चिंध्यांचे पागोटे, उघडाबंब, अनवाणी, हातांत नांगराची मूठ धरून भर कडक उन्हामध्यें सर्व दिवसभर शिंपलेवजा नोकदार धसकटांनी युक्त अशा खरबरीत ढेकळातूंन आठ बैलांशी झटे घेता घेतां गीत गाऊन नांगर हाकीत आहेत. तिकडे गोरा शिपाई पायात पाटलोन, अंगात पैरणीवर लाल बनाती डगलें, डोईवर कलाबूतचा कशीदा काढलेली नखरेदार टोपी, पायांमध्ये सुतीं पायमोज्यावर विलायती सजविलेल्या मजबूत मऊ कातड्याचा बूट, कंबरेवर कातड्याचे तोस्तान व खांद्यावर चापाची बंदूक घेऊन, दररोज सकाळी अथवा सायंकाळी हवाशीर मैदानांत तास आर्धा तास परेडीची कसरत करीत आहे. इकडेस शुद्र शेतकऱ्यांचा पिढीजादा दरबारी पोशाख म्हटला म्हणजे, जाडाभरडा खादीचा दुहेरी मांडचोळणा, बंडी, पासोडी, खारवी पागोटें आणि दोरीने आळपलेला गावठी जोडा, ज्यांची निहारी व दुपार संध्याकाळचे जेवण जोंधळे, नाचणीची किंवा कोंड्याभोंड्यांच्या भाकरी, वा गाजरेरताळांची वरू, कालवण आमटी, अथवा बोंबलाचे खळगुट, तेंही नसल्यास चटणीच्या गोळ्याशिवाय भाकरीवर दुसरे कांही मिळावयाचे नाही. चटणी-भाकर कां होईना, परंतु ती तरी वेळच्या वेळी व पोटभर त्यांस मिळते काय? राहतें घर बैलांच्या गोट्याशेजारी असून ज्याच्या उशापायथ्याशीं तिन्ही वासरें, पारडीं अथवा कर्डे बांधलेली असल्यामुळे घरांत चहूंकडे मुतारीची उबट घाण चालली आहे. फाटके पटकूर व मळकट गोधडींचे अंथरूण-पांघरूण, सर्व गांवच्या म्हशी पाण्यात बसून-बसून खराब झालेल्या डोहाचे खालचे बाजूस उकरलेल्या डहुऱ्यांतील पाणी पिण्यांचे गांवांतील खिंडार तेंच त्यांचा शेतखाना, तशांत मोड्शी होऊन त्यास जाळताप आल्यास चांगल्या औषधी व त्यांचा माहितगार डॉक्टरांच्या नावांने आवळ्याएवढे पूज्य, याशिवाय सरकारी शेतसारा वगैरे फंड व पट्या कोठून व कशा द्याव्यात. यासंबंधी त्यांच्या उरावर कटार टांगलेली असते. अशा अभागी शेतकऱ्यांची अक्कल गुंग होणार नाही, असें एखाद्या वाकबगार गोऱ्या अथवा काळ्या डॉक्टराच्यानें छातीस हात लावून म्हणवेल काय? तिकडे सरकार विलायतेहून गोऱ्या शिपायांच्या पोषाखाकरिता उंच कपडे, बनाती, रुमाल, पायमोजे, बूट खरेदी करुन आणविते. सरकार त्यांच्या खाण्यापिण्याकरिता उत्तम गहूं, तांदूळ, डाळ, निकोपी तरुण गाया, शेळ्या व मेंढ्याचे मांस, विलायती पोर्टर वगैरे अंमली दारु, निर्मळ तेल, तूप, दूध, साखर, चहा, मीठ,

मिरच्या, गरम मसाला, सुरी, कांटा वगैरे सामान येथे खरेदी करुन, ख्रिस्ती अचाऱ्यांकडून तीनवेळा ताजा पाक सिध्द करवून त्यास वेळचे वेळी आयतें जेऊं घालितात. त्यास राहण्याकरितां लाखों रुपये खर्जी घालून सरकारने दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या आहेत. जीमध्ये लोखंडी खाट, बिछान्यावर उशी, पलंगपोसासह धाबळीची सोय केली असून वरतीं रोषणााईसाठी हंडी लोंबत आहे. बराकीचे आंगणांत स्नानाकरितां न्हाणी करुन तिजमध्ये “फिल्टर” केलेले पाण्याची तोटी सोडली आहे. त्यांचप्रमाणें स्वच्छ सोयींचे शौचकूप केलेंच आहे. तशांत अजीर्णामुळे किंचित् खोकला किंवा ताप आला कीं, त्यांच्या जिवासाठी दवाखाना तयार केलेला असून, त्यामध्यें शेंकडों रुपये किंमतीचीं औषधें, शस्त्रें वगैरें ठेऊन त्यावर हजारों रुपयें दरमहा पगाराच्या डाक्टराची नेमणूक करुन, त्यांच्या तैनातीत डोलीसुध्दा हमाल दिलेले आहेत. याशिवाय त्यांस देण्यामागण्याची काळजी नसून, घर, शेतखाना, झाडू, पाणी, रस्ता, शेत व लोकलफंड पट्टी वगैरे देण्याची ददात नसून, असमानी व टोळांच्या सुलतानीविषयी बिलकूल काळजी नाहीं आणि यावरुनच आपण सोंवळ्यांतील नेटिव्ह कामगारांस धिःकारानें म्हणतों कीं, पहा हा नेटिव्ह कामगार, ऐषआरामी युरोपियन कामगारांचे पुढें पुढें करुन अज्ञानी शेतकऱ्यांपासून लांच खाऊन कसा सोजरासारखा लाल गाजर पडला आहे. काय हा उधळेपणा! याला म्हणावें तरी काय? यास्तव आमचे डोळे झाकून निराकार परमात्म्याची प्रार्थना करणाऱ्या विलायती सरकारनें येथील धूर्त लोकांनी उपस्थित केलेले समाजांच्या व वर्तमानपत्रांच्या गुलाबी लिहिण्यावर बिलकुल भरंवसा न ठेवितां, एकंदर सर्व आपल्या सरकारी खात्यांतील गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षा जास्ती केलेले पगार अजीबाद कमी करुन, अज्ञानानें गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्या कमी न केल्यास, थोड्याच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असें आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारचे कानांत सांगून याप्रसंगी पुरें करितों.

**(शेतकऱ्याचा असूड)**

## शब्दार्थ

अर्भ–दहा कोटी, धसकट–ज्वारी किंवा बाजरी यांसारख्या पिकांची कापणी झाल्यानंतर जमिनीलगत राहिलेला पिकाच्या ताटाचा धारदार भाग. तोस्तान–काडतुसे, बंदुकीची दारु इ. सामग्री ठेवण्यासाठी कामरेला बांधण्याजोगी चामड्याची पिशवी. खारवी–एकप्रकारचे गडद लाल कापड. आळपलेला–बांधलेला. वरु–कणी. खळगुट–पीठ, भाजीपाला, चिंच इ. गोष्टी एकत्र करुन तयार केलेले कालवण, पातळ कालवण. मोडशी–हगवण, पोटदुंखी. पट्टी–कर. बनात–एक लोकरीचे वस्त्र. नेटिव्ह–मूळ अर्थ कुठल्याही देशाचा मूळ रहिवासी. इंग्रजी अमदानीत या शब्दाने भारतीयांचा उल्लेख केला जात असे. धाबळी–उबदार पांघरुण.

### अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

१) शेतकऱ्याची तुलना महात्मा फुले यांनी कुणाशी केली आहे?

२) महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्याचे मासिक उत्पन्न किती असे?

३) महात्मा फुले यांच्या मते शेतकरी कर्जबाजारी का झाले आहेत?

### आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

**१)** सरकारी कामगारांच्या परिस्थितीचे वर्णन महात्मा फुले यांनी कोणत्या शब्दामध्ये केले आहे?

२) महात्मा फुले यांच्या काळातील शेतकऱ्यांच्या जगण्याचे वर्णन करा.

### इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

**१)** “त्यास राहाण्याकरिता लाखों रुपयें खर्ची घालून सरकारने दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या आहेत.”

२) “मग कलेक्टर वगैरे कामगारांसारख्या नबाबाचे येथील बेलगामी किरकोळ खर्चाविषयी गोष्ट काढल्यास आमचे कोण ऐकतो?”

### ई) टिपा लिहा.

१) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नष्ट करण्यासाठी उपाय.

२) शेतकऱ्यांवरील करआकारणीबद्दल फुले यांचे मत.

**उ) व्याकरण**

**अ) वाक्प्रचार**

१) कानउघाडणी करणे- कडक शब्दांत उपदेश करणे.

२) उरावर कट्यार टांगलेली असणे-भविष्याविषयी चिंता वाटणे.

३) थारी लागणे-स्थिर होणे, आधार सापडणे.

४) खापर फोडणे-दोष देणे.

**ऊ) उपक्रम**

एखाद्या शेतकऱ्याची मुलाखत घ्या.

****

# ४. युवकांपुढील आव्हाने

## यशवंतराव चव्हाण

**परिचयः यशवंतराव बळवंतराव चव्हाण (१९१४-१९८४)-**

भारताचे माजी उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रिमंडळातील संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र इ. महत्वपूर्ण खात्यांचे माजी मंत्री. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकीय जीवनात लक्षणीय कार्य. मराठी साहित्य व संस्कृती क्षेत्राला चालना देणारे विचारवंत आणि साहित्यिक. 'शिवनेरीच्या नौबती', 'सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध' इ. त्यांची पुस्तके प्रसिध्द. साहित्यकलेत रस घेणारी सौंदर्यवादी वृत्ती, विचारशीलता आणि साधी, सोपी, मराठमोळी भाषाशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये.

प्रस्तुत पाठामध्ये श्री. यशवंतराव चव्हाणांनी युवकांपुढील आर्थिक, सामाजिक, परराष्ट्रीय व राजकीय आव्हाने कोणती याबाबतची सविस्तर चर्चा केली आहे.

---

आजच्या तरुण पिढीने कोणती कामे करावीत असा प्रश्न मला विचारण्यात आला आहे. आजच्या घडीची जी आव्हाने आहेत त्यांच्या संदर्भातच या कामांचा विचार करता येईल. ही आव्हाने कोणती? स्थूलमानाने या आव्हानांचे चार वर्ग करता येतील : १. आर्थिक, २. सामाजिक, ३. परराष्ट्रीय व ४. राजकीय. राजकीय आव्हानांचा हा जो मी उल्लेख केला तो राजकीय पक्षांच्या संदर्भात नव्हे, तर देशातील राजकीय क्षेत्रातल्या सर्वसाधारण आव्हानांसंबंधीचा होय.

आपली आर्थिक आव्हाने कोणती आहेत? आपल्या देशापुढील मूलभूत आर्थिक आव्हान विकासासंबंधीचे आहे. आपण ब्रिटिशांशी लढलो ते केवळ शासनाचे स्वरुप बदलण्यासाठी नव्हे, तर स्वतः मध्ये बदल घडवून आणण्याची आपल्याला संधी मिळावी म्हणून. ब्रिटिशांची येथून हकालपट्टी करण्याचा जेंव्हा आम्ही प्रयत्न करीत होतो तेंव्हा त्या

प्रयत्नांमागील आमचा विचार खरोखरी हा होता की, स्वराज्याच्या मार्गाने आम्हांला आमच्या जीवनामध्ये व आमच्या विचारसरणीमध्ये बदल घडवून आणता यावा आणि तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत व आधुनिक अशी संस्कृती आम्हांला या देशात निर्माण करता यावी. माझ्या या म्हणण्याचा आपण गैरसमज करुन घेऊ नका. कारण असे म्हणण्यात आपली प्राचीन संस्कृती कमी प्रतीची होती असे मला मुळीच सुचवायचे नाही.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या ज्या लोकांच्या प्राथमिक गरजा आहेत त्या भागविणे हे स्वाभाविकपणे आर्थिक क्षेत्रातील आपले अगदी किमान उद्दीष्ट म्हणता येईल. ब्रिटिशांशी लढण्यात आपला हा जो मूलभूत उद्देश होता तो अद्यापि तरी असफलच राहिला आहे. स्वातंत्र्यसंपादनानंतर आणि आपले राष्ट्रीय सरकार अस्तित्वात आल्यानंतर आपण आपल्यासाठी जणू काय एक नियम ठरवूनच टाकला आहे आणि तो म्हणजे सर्वच गोष्टी सरकारवर सोपविणे हा होय. एवढेच नव्हे तर या सर्व गोष्टी पार पाडण्याची जबाबदारी सरकारची आहे असाही एक समज आपण करुन घेतला आहे. परंतु अशाने आपल्या प्रगतीचे पाऊल कधीच पुढे पडणार नाही. अगदी किमान कार्यक्रम पार पाडावयाचा झाला तरी सबंध राष्ट्राची शक्ती त्याच्यामागे उभी राहिली पाहिजे. एखादा कार्यक्रम आखून आणि त्याची उद्दिष्टे ठरवून अंमलबजावणीसाठी कोणत्या तरी शासकीय यंत्रणेकडे तो सुपूर्द करण्याने काहीही साध्य होणार नाही. ही दृष्टीच मुळात चुकीची आहे. आपल्या उत्पादनपध्दतीत व त्याचबरोबर आपल्या विचारसरणीत आणि प्रश्नांकडे पाहण्याचा आपल्या दृष्टीत प्रथम मूलभूत स्वरुपाचा बदल झाल्याशिवाय कोणतेही परिवर्तन घडून येणे केवळ अशक्य आहे. आपण ठरविलेली आर्थिक समानतेची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी, काही विशिष्ट कार्यक्रम आखून एका विशिष्ट पध्दतीने शासनकारभार चालविला म्हणजे झाले असे म्हणून भागणार नाही. आज सर्वांत अधिक निकड जर कशाची असेल तर ती देशातील प्रत्येक व्यक्तीच्या वृत्तीत बदल घडवून आणण्यासंबंधीची आहे.

आपल्या तरुण मंडळींना याची जाणीव आहे किंवा नाही हेच माझ्या मते आर्थिक क्षेत्रातील आजच्या घडीचे मोठे आव्हान आहे.

सामाजिक क्षेत्रात कोणती आव्हाने आहेत? आपला देश शंभर वर्षांपूर्वी जेवढा कर्मठ किंवा पुराणमतवादी होता तेवढाच तो आजही आहे असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. अगदी आजही जाती, पोटजाती, धर्म, प्रदेश, भाषा, बोली अशा एक ना दोन अनेक गोष्टींमुळे आम्ही विभागलो गेलो आहोत. या विभाजक प्रवृत्तींमुळेच भारत इतिहासात प्रदीर्घ काळ परकीय अमलाखाली गांजला व भरडला गेला. या प्रवृत्ती आजही कार्यप्रवण आहेत, एवढेच नव्हे तर त्या वाढत आहेत व अधिकाधिक तीव्र बनत आहेत असे दृश्य दिसते. तरुणांपुढील हे सर्वांत मोठे आव्हान आहे असे मी समजतो.

पहिल्या जागतिक युध्दानंतर भारतात जी थोर व कर्तृत्वशाली माणसे झाली त्या सर्वांनी आपल्या तरुणपणीच राष्ट्रकार्यात पदार्पण केले होते. गांधीजींनी त्या वेळी आपल्याभोवती जो परिवार गोळा केला त्यात राजेंद्रबाबू, देशबंधू दास, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद वगैरे मंडळी होती. मी काही थोड्या व्यक्तींचीच नावे येथे घेतली आहेत. ही माणसे आपल्या देशाचे नेतृत्व करण्यास लायक होती; एवढेच नव्हे तर खंडप्राय भूप्रदेशाचे पुढारीपण करण्याचेही कर्तृत्व त्यांच्या ठिकाणी होते असे मी बिनदिक्कतपणे म्हणतो. मनात येते तर त्यांना वाटेल ते होता आले असते. परंतु असे असूनही देशासाठी आपले जीवन समर्पित करण्याचे त्यांनी ठरविले. तेंव्हाच्या तरुण पिढीची भावना ही अशी होती. मग ही भावना आजच्या तरुण पिढीत का नाही? ही भावना प्रथम आपण आपल्यामध्ये बाणविली पाहिजे आणि मग तरुणांच्या अंतःकरणात तिचे बिजारोपण केले पाहिजे. एकात्म भारताच्या कल्पनेने त्या काळी लोकांची हृदये काबीज केली होती आणि त्यामुळेच त्या वेळचे लोक भाषा, जात, व धर्म या भावनांच्या पलीकडे जाऊ शकले. हे जर तेंव्हा घडू शकले तर ते आतासुध्दा घडावयास हवे. पण मी जेव्हा देशाच्या निरनिराळ्या भागांत जात असतो तेव्हा तरूण पिढी अद्यापिही संकुचित निष्ठांच्या संदर्भातच विचार करीत असल्याचे मला आढळून येते. ही खरोखर फार दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा संकुचित निष्ठांच्या आहारी आपण जातो याचे कारण हेच की, ज्या रूढ व पारंपरिक कल्पनांच्या वर्चस्वाखाली आपण पिढ्यानुपिढ्या वावरलो त्यांच्याशी

आपण अद्यापि पूर्ण मुकाबला केलेला नाही, त्यांचे आव्हान अद्यापि आपण पूर्ण स्वीकारलेले नाही. अद्यापिही आपण लोकांना जुन्या चाकोरीच्या बाहेर काढू शकलेलो नाही. आधुनिक जग, आधुनिक शक्ती व आधुनिक भारत यांच्या संदर्भात विचार करावयास आपण त्यांना शिकविलेले नाही. राजकीय क्षेत्रात पुनरुत्थान घडलेले असले तरी सामाजिक क्षेत्रात त्याचा आपल्याला अद्यापि अनुभव यावयाचा आहे. पोषाखातील सुधारणा, रेडिओ, टेलिव्हिजन, चित्रपट यांसारख्या आधुनिक सुखसोयींमुळे आज एक प्रकारची जी आधुनिक जीवनपध्दती अस्तित्वात आल्याचे दृश्य दिसते आहे तिचे महत्व मी कमी लेखीत नाही. परंतु जोपर्यंत लोकांच्या दृष्टिकोनात व प्रवृत्तीत आपण क्रांतीकारक बदल घडवून आणीत नाही तोपर्यंत आपला देश जुन्या चाकोरीच्या बाहेर पडणार नाही. या सबंध प्रश्नांची मेख येथेच आहे. सामाजिक आव्हान असे ज्याला मी म्हणतो ते हे होय.

आता आपण परराष्ट्रीय आव्हानांचा विचार करू. मला वाटते हा विषय अगदी सुपरिचित आहे. चीनकडून, पाकिस्तानकडून अगर इतर अन्य ठिकाणांहून आपल्याला येणारी जी परराष्ट्रीय आव्हाने आहेत ती तुम्हांला माहीतच आहेत. ही आव्हाने आपल्यापुढे दीर्घ काळ राहणार असल्यामुळे या धोक्यांबाबत आपली तरुण मंडळी सतत जागरुक राहतील अशी मी आशा करतो. कारण एखादा झंझावात घोंगावत यावा आणि थोड्याच वेळात तो ओसरून जावा अशा प्रकारची ही काही गोष्ट नाही. ही आव्हाने आपल्या समोर सतत राहणार आहेत असे धरुनच जीवन जगण्याची कदाचित आपल्याला तयारी करावी लागेल व त्यांच्याशी आपल्याला लढा द्यावा लागेल. मी हे जे बोलतो आहे ते लष्करी दृष्टिकोनातून बोलत नाही. अशा प्रकारचे एखादे आव्हान जेंव्हा आपल्यासमोर उभे राहते, तेव्हा आपले सामर्थ्य, आपले अंगीभूत गुण, आपले चारित्र्य व आपली एकूण राष्ट्रशक्ती वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने त्या आव्हानाचा मुकाबला करण्यास आपण शिकले पाहिजे. हे आणखी एक असे क्षेत्र आहे की, जेथे फक्त तरुणांनाच या आव्हानाचा स्वीकार करता येईल. वडीलधाऱ्या माणसांनी या बाबतीत आपल्या देशाच्या आशाआकांक्षांसंबंधी मार्गदर्शन करावे किंवा त्यासंबंधी जागृती निर्माण करावी, परंतु इथे प्रत्यक्ष कृती मात्र तरुणांकडूनच होऊ शकते.

तरुणांनी सैन्यात दाखल व्हावे, एवढेच सांगण्याचा माझा यामागील उद्देश नाही. मला म्हणावयाचे आहे ते हे की, तरुणांनी या क्षेत्रातील प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करावा व हे प्रश्न व्यवस्थित समजावून घ्यावेत. तसे झाले म्हणजे राष्ट्रीय संरक्षणाच्या क्षेत्रातील आपल्या डावपेचांचे तंत्र हे आपले मनुष्यबळ, साहित्य, भूगोल व इतर संबंधित बाबींचा अनुभव व ज्ञान यांतून विकसित होईल. देशाच्या संरक्षणाचे तंत्र हे काही आभाळातून पडत नाही. तरुण माणसे जेव्हा या आव्हानांचा गंभीरपणे विचार करतात आणि आपल्या सामर्थ्याने व कल्पनाशक्तीच्या बळावर त्यांचा मुकाबला करण्याची जाणीव त्यांच्या ठिकाणी निर्माण होते तेंव्हाच ते देशाच्या संरक्षणाचे तंत्र उभे करु शकतात.

चौथे आव्हान हे राजकीय क्षेत्रातील आहे. या क्षेत्रात दोन मूलभूत आव्हाने आहेत. एक भारताच्या एकात्मतेचे आणि दुसरे लोकशाही जीवनपध्दतीचे. आज विभाजक शक्ती जोर करीत आहेत याबद्दल माझ्या मनात शंका नाही. अशा परिस्थितीत आपल्या राष्ट्रीय जीवनातील भेदांचा स्वाभाविकपणेच लोक विचार करु लागतात. व्यक्तिशः मला या भेदांचे मुळीच भय वाटत नाही. नैसर्गिक व भौगोलिक भेद हे राहणारच. कारण आपला देशच मुळी अवाढव्य असून तो इतक्या विविधतेने भरलेला आहे की, असे भेद असणे अगदी स्वाभाविक आहे. देशाच्या या अव्याढव्यपणामुळे प्रचंड प्रश्न निर्माण होतात. पण हे प्रश्न नसतील तर मग आव्हानेही नसतील. प्रश्न आहेत आणि ते यापुढेही राहणार आहेत. आपल्या जीवनातून व आपल्या प्रगतीतून प्रश्न हे निर्माण होत राहणारच.

गांधीजी आणि नेहरु यांनी सर्वांत मोठी जर कोणती गोष्ट केली असेल तर ती ही की, ते नेहमी सबंध भारताचा विचार करीत असत. भारत हा भौगोलिकदृष्ट्या एकात्म आहे आणि एका राज्यघटनेनुसार चालणारा देश आहे असे म्हणून केवळ भागणार नाही. ते सत्यच आहे. आणि पडेल तो त्याग करुन आपण त्याचे रक्षण करणारच आहोत. तथापि, देशातील जनतेमध्ये एकात्मतेची भावना कशी निर्माण करता येईल हे मूलभूत आव्हान आपल्यापुढे आहे. काही निश्चयी बाण्याच्या

लोकानी आपले जीवन या ध्येयासाठी व या कार्यासाठी वाहून घेतल्याखेरीज भारताचे पाऊल पुढे पडणार नाही.

राजकिय क्षेत्रातील दुसरे आव्हान हे लोकशाही जीवनपध्दतीला असलेले आव्हान होय. आपण जेव्हा आर्थिक प्रगतीसंबंधी किंवा आर्थिक विषमता दूर करण्यासंबंधी बोलत असतो तेंव्हा व्यक्तीव्यक्तींमधील समानता आपल्याला अभिप्रेत असते. विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य ही लोकशाहीची पायाभूत कल्पना आहे. आपल्या राज्यघटनेच्या कोंदणात आपण तिला मानाने बसविले आहे. प्रत्येक व्यक्तीला माणूस या नात्याने आपला उत्कर्ष साधण्याची आकांक्षा बाळगण्याचा पूर्ण अधिकार आहे. लोकशाहीची ही पायाभूत कल्पना आपण सावधगिरीने, कौशल्याने, आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणाने अमलात आणली पाहिजे.

वयच केवळ नव्हे तर आपल्यापुढील आव्हान स्वीकारुन त्याला तोंड देण्याची कुवत हे पण मी तारुण्याचे गमक मानतो. खरे म्हणजे माणूस तरुण आहे की वृध्द आहे याची कसोटी त्यावरच ठरते. लोकमान्य टिळक प्रीव्ही कौन्सिलात आपला खटला हरल्यानंतर, “या पराभवाने तुमचे मनोधैर्य खचले का?” असे त्यांना कोणीसे विचारले त्यावर टिळकांनी उत्तर दिले “माझे धैर्य कदापि खचणार नाही. मी ज्या पिढीत वाढलो त्या पिढीवर आकाश जरी कोसळले तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून ती उभी राहील आणि लढत देईल.” टिळकांचे हे तेजस्वी उद्‌गार आमच्या तरुणांचे ब्रीदवाक्य झाले पाहिजे. तरुण माणसाने नेहमी आव्हाने शोधीत राहिले पाहिजे, आपल्या दृष्टीसमोर त्याने ध्येये ठेवली पाहिजेत आणि ही ध्येये गाठण्याकरिता त्याने आपले मनोधैर्य सदैव शाबूत राखले पाहिजे. ज्या तरुणाच्या दृष्टीसमोर स्वप्ने नाहीत तो तरुणच नव्हे. स्वप्ने पाहण्याचीच केवळ नव्हे तर ही स्वप्ने वास्तवात आणण्याची कुवत व धैर्य त्याच्यापाशी असले पाहिजे. आमची तरुण माणसे हे करतील तर आपल्या ध्येयस्वप्नातील भारत लवकरच समूर्त झालेला आपल्याला दिसेल अशी मी ग्वाही देतो.

**(‘युगान्तर’)**

## शब्दार्थ

अंगीभूत-स्वतःमध्ये असलेले, जन्मापासूनचे, नैसर्गिक. वृध्दिंगत करणे-वाढ करणे, जोपासना करणे. सांगोपांग-सर्वार्थाने, यथासांग, परिपूर्ण. आभाळातून पडणे-आपोआप (सहजासहजी) प्राप्त होणे. विभाजक शक्ती-फाटाफुटीची वृत्ती, भेदभाववृत्ती. एकात्मता-एकता, एकजूट अभिप्रेत-मनात आणलेले योजलेले, हवे असलेले. तोंड देणे-संकटाला सामोरे जाणे. गमक-प्रमाण, पुरावा, आधार. प्रीव्ही कौन्सिल-ब्रिटनमधील सर्वोच्च न्याय संस्था. आकाश कोसळणे-मोठी आपत्ती येणे. ब्रीदवाक्य-प्रतिज्ञा, बाणा, ध्येयवाक्य.वास्तवात आणणे-सत्यात आणणे, प्रत्यक्षात आणणे. समूर्त-साकार.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) युवकांपुढे असलेले आव्हानांचे चार वर्ग कोणते?
२) लोकांच्या प्राथमिक गरजा कोणत्या?
३) आम्ही कोणत्या गोष्टीमुळे विभागलो आहोत?
४) टिळकांचे तेजस्वी उद्‌गार कोणते?
५) लेखक युवकांना कोणती भावना बाणावयाला सांगतात?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) यशवंतराव चव्हाणांनी सांगितलेली युवकांपुढील आव्हाने कोणती?
**२)** आपल्या देशापुढे कोणती आर्थिक आव्हाने आहेत ते लिहा.
३) यशवंतराव चव्हाण यांनी कोणती सामाजिक आव्हाने सांगितली आहेत.
४) युवकांनी आव्हाने कशी पेलावीत असे त्यांना वाटते?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "माझे धैर्य कदापि खचणार नाही."
२) "वयच केवळ नव्हे तर आपल्यापुढील आव्हानं स्विकारुन त्याला तोंड देण्याची कुवत हे पण मी तारुण्याचे गमक मानतो."

**ई) टीप लिहा.**

१) युवकापुढील राजकीय आव्हान.

**उ) व्याकरण**

**अ) वाक्प्रचार**

१) समर्पित करणे २) काबीज करणे ३) मुकाबला करणे

**ऊ) उपक्रम**

यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेले 'कृष्णाकाठ' हे पुस्तक वाचा.

****

# ५. घार हिंडते आकाशी...

## ...सिंधुताई सपकाळ

**परिचय : सिंधुताई श्रीहरी सपकाळ (जन्म : १९४८)**

अनाथ मुलांचे संगोपन मातृममतेने करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या. 'ममताबालसदन' या संस्थेची स्थापना करुन सिंधुताईने शेकडो अनाथ मुलांना कृपाछत्र दिले. विवाहानंतर परित्यक्ता म्हणून वाट्याला आलेल्या दुःखद प्रसंगावर मात करुन त्या हजारो मुलांच्या माता झाल्या.

'मीवनवासी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांना 'अहिल्याबाई होळकर', 'सावित्रीबाई फुले' हे सन्मानाचे पुरस्कार दिले आहेत. याशिवाय 'सत्पाल मित्तल नॅशनल अॅवॉर्ड' व 'फायफाउंडेशन' या संस्थांचे पुरस्कार प्राप्त. अमेरिका, इंग्लंड या देशांचा प्रवासही त्यांनी केला आहे.

सिंधुताईनी इंग्लंड या देशाचा प्रवास केला, त्यावेळी त्यांना जे अनुभव आले ते त्यांनी प्रस्तुत लेखात व्यक्त केले आहेत.

---

**गुरुवार -२२ सप्टेंबर**

हिथ्रो विमानतळावर पहिले पाऊल टाकले आणि एका बलाढ्य राष्ट्रावर आपण उतरत आहोत याची जाणीव झाली. ज्यांनी आपल्यावर दीडशे वर्षे राज्य केलं तिथे पोहचलो...

आठ तासांचा प्रवास. सारं कसं वेगळंआगळं. खिडकीतून जेव्हा डोकावलं तेंव्हा आकाशपाताळ कुठेतरी एक झाल्यागत वाटलं. स्वप्नच

जसं सातासमुद्रापार नव्या दुनियेत पोहोचलो. विमानातून बाहेर उतरल्यावर वाट बघावी लागली. आपण कुठेतरी आपल्या जगातून दुसऱ्या जगात पोहोचलो असं वाटलं! कुठेतरी भरकटलो, हरवलो, फसलो असंही मन सांगत होतं.

आपला गाव बरा. आपली लेकरं बरी. आपली माती बरी...

पण ब्रिटिशांचं गांव बघायचं होतं. तिथे मराठी माणसांना भेटायचं होतं. एवढ्या दूर पोटापाण्यासाठी आपली माणसं आलीत. त्याही दुनियेत त्यांनी स्वतःला जुळवून घेतलं. स्पर्धेत टिकून राहिली.

विमानतळावरुन हॉटेलात जाण्यासाठी वाट बघत बसलो. गोऱ्या साहेबांचं अन् तंग कपड्यातल्या सायबिणींचं कौतुकही वाटलं. दिवसभरात सारं पळत असतं. त्यांची लेकरं कुठं असतील? त्यांना कोण बघत असतील? ती जेवली का न्हाई? यांच्या वेगात त्यांची लेकरं कुठे, कशी असतील? मनात प्रश्न आले, जे संपता संपत नव्हते.

दिवसाची रात कधी झाली कळलं नाही...

नवं जग सुरु झालं. प्रत्येक सेकंदाच्या काट्यावर विमानं उतरतच होती.

## शुक्रवार –२३ सप्टेंबर

या ब्रिटिशांच्या मनांत अन् घरांत शिरता आलं नाही. मग ते आपल्या घरात, मनांत कसे काय बाई शिरले होते? प्रश्न मनांत डोकावला. हॉटेलात सारं वातावरण भारावून टाकणारं. कृत्रिम का होईना; पण एक सौंदर्यदृष्टी त्यामागे होती.

भल्या पहाटे आणि रात्री उशिरा एक म्हातारी इंग्रजी बाई दिसली. ती हॉटेलात नोकरीला होती. का कुणास ठाऊक, पण मला तिच्याबद्दल कुतूहल वाटलं. साफसफाईचं काम ती ज्या प्रकारे करीत होती, ते मनात भरलं. कारण झाडू मारताना सावरासावर करताना एका वेगात ती सारं करायची. जणू अन् जसा वेग तिच्या मागे लागलाय. घड्याळाशी तिची स्पर्धा जशी सुरु आहे. एखादं दुःख विसरण्यासाठी कामात हरवून जाणं तिच्यात मला दिसलं. त्या बाईचं दुःख काय असेल. ती स्वतःला एवढं कां गुंतवून ठेवते? तिला विचारावंसं वाटलं खरं पण... तिला संवाद साधायला वेळ तरी कुठे होता? आता इथे होती पण कुठे गेली कुणास ठाऊक!

लंडनच्या सफरीवर निघालो,एका भल्या मोठ्या बसमधून. तिथंही एक आजीबाई गाईड होती. ती आपल्या लंडन शहराचा तपशील देत होती. लंडन आणि मुंबईतलं साम्य सांगत होती. प्रत्यके वस्तुची ऐतिहासिक माहिती जणू तिला तोंडपाठ होती.

आपण आपल्यासाठी जगतो, पण काही माणसं देशासाठी जगतात. देशाला, शहराला स्वच्छ सुंदर ठेवण्यासाठी ती झपाटलेली असतात.

आपली माणसं तशी का जगत नाहीत? देशासाठी जगायला शिकायला हवं. आपल्या लेकरांच्या भवितव्यासाठी आपण काही नियोजन का करत नाही?

दिवसभरातल्या लंडन दर्शनात बरेच प्रश्न घुटमळत राहिले...

मेणाच्या पुतळ्याचं मादाम तुसॉंचं प्रदर्शन म्हणजे माणसं जिवंत करणारी कलाचं. मेणाचे पुतळेही  हुबेहुब वाटत होते. काहीदा तर पुतळे आपल्याशी बोलतील की काय असंपण वाटायचं.

हिंदुस्थानातले पुतळे मात्र या प्रदर्शनात अवघडल्यागत, अडचणीत सापडल्यासारखे, अज्ञातवासात आलेले सारे हिंदुस्थानी भासत होते. उदासपणा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वाटला. आम्हांला किती लांब आणलं. पुन्हा महाराष्ट्रात घेऊन चला. इथे आमचा दम घुटमळतो...असं अमिताभ आणि ऐश्वर्या बोलली असती. जर पुतळे जिवंत झाले तर ते असचं काहीसं बोलतील.

**शनिवार २४ सप्टेंबर**

थेम्स नदीचा किनारा. त्याभोवती हे शहर जसं गुरफटलं आहे. आमची मुळा, मुठा, पंचगंगाही आठवली. आमच्या नद्या त्याभोवतीची देवस्थानं, तिथली श्रध्दा... सारं आठवलं...गावची दुःख आपल्या सोबत वाहून नेणाऱ्या आपल्या पवित्र नद्या. पण इथे नदीच्या काठावर सैर करायला बरं, खाणं, मौजमजा...नदीच्या पात्रावरुन नजर फिरविली आणि लक्षात आलं की आजूबाजूला रान नाही. पाखरं नाहीत. साऱ्या इमारती अन् करमणूक.

काही माणसं भेटली. बोलली. ओळख करुन घेतली. माणसं सगळी चांगलीच असतात; पण मनामध्ये कुणाचं काय चाललंयं हे कसं बाई सांगणार?

कुठे माझ्या महाराष्ट्राची काळजी वाहणाऱ्या पवित्र नद्या आणि कुठे पर्यटकांचे चोचले पुरवणाऱ्या इथल्या नद्या... एका दिवसापुरतं इथं राहणं ठीक. पण गांवाची ओढ सतावू लागली. आपली माणसं कुठे गर्दीत हरवत तर नाहीत ना, अशी चिंता वाटू लागली...थेम्स नदी शांत होती.

**रविवार -२५ सप्टेंबर**

लंडन शहर विमानातून बघितलं, पण "लंडन आय" मधून बघितलं नाही. पुन्हा त्यात काय बघणार?

मला माझा महाराष्ट्र आठवला. महाराष्ट्रातला शेतकरी आठवला. जन्म देवून लेकरांना दूर लोटणारे आठवले. कष्टकरी आठवला...घोटभर पाण्यासाठी तडफणारा दुष्काळ आठवला...

डोळ्यांसमोर लंडनचं सौंदर्य होतं, इतिहास होता. दगडी टोलेजंग वास्तू होत्या; पण मनात माझा महाराष्ट्रच होता. तहानलेली भुकेलेली लेकरं होती. डोळ्यात लंडन खरं, पण मनात माझा महाराष्ट्र...

डुलकी लागत होती.

मुख्य कार्यक्रम भव्य-दिव्य झाला. एका मराठी चित्रपटाचा गौरव झाला! 'मी सिंधुताई सपकाळ' हा चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. पुरस्कार मिळाला. मी सारं काही डोळे भरुन बघत होते.

एखाद्या जिवंत बाईच्या कामावरल्या चित्रपटाला पुरस्कार मिळाला. जसं माझ्याचं आयुष्यावर शिक्कामोर्तब होतयं असं वाटलं. जिवंतपणीच हा मान मिळाला; पण मी हे पुरस्कारासाठी नाही केलं. माझ्या लेकरांच्या जगण्यासाठी जगले...कुठलाही स्वार्थ न धरता...

**सोमवार २६ सप्टेंबर**

परतीचे वेध लागले.

ब्रिटिशांनी कोणे एकेकाळी आम्हाला लुटून नेले. आज आम्ही आमच्या माणुसकीच्या धड्याने त्यांना लुटुन नेत आहोत. जगा, जगवा.

माणूस म्हणून प्रत्येक जीवाला सांभाळा...ही शिकवण या निमित्ताने आपण त्यांना दिलीय.

लंडनची नशा उतरली. माझी लेकरं मला बोलावताना दिसली. भाषण नाही तर राशन नाही. अशी आपली अवस्था. शेकडो पोरं माई कुठे? म्हणून रित्यापोटी विचारत असतील, ही चिंता घर करीत होती. एकदाचं मुंबई विमानतळ आलं...

माझ्या नऊवारी साडीचा पदर पुढे करून लेकरांची पोटं भरण्यासाठी पुन्हा भिक्षा मागायला मी तयार आहे. आपल्या माणसांकडं निघावं लागणारं आहे. हक्कानं बोलावं लागणार आहे. वसई, ठाणे, टिटवाळा, सोलापूर...भेटी पक्क्या झाल्या.

'घार हिंडते आकाशी चित्त तिचं पिलांपाशी' असं माझं झालंय. जगाच्या पाठीवर कुठेही असलीतरी 'माईऽऽ' म्हणून हाक कुणी तरी मारलीय, कुणाला तरी माझी गरज आहे असं सतत वाटतं. आवाज कानात घुमतोय...

लेकरा, मी आले रे...

**(दैनिक सामना)**

## शब्दार्थ

हिथ्रो-लंडनमधील प्रसिध्द विमानतळ. लंडन आय-लंडन शहराचे विहंगम दृश्य दाखविणारा फिरता पाळणा. पर्यटक-प्रवासी. चोचले-लाड.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) लेखिकेने पहिले पाऊल कोणत्या विमानतळावर टाकले?

२) कांही माणसं कशासाठी जगतात?

३) हिंदुस्थानातले पुतळे लेखिकेला कसे वाटतात?

४) भारतातले पुतळे जीवंत झाले असते तर त्यांना काय वाटले असते?

५) मादाम तुसाँचे प्रदर्शन पाहिल्यावर सिंधुताईंच्या मनात कोणते विचार आले?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) विमानतळावर वाट पहात असताना कोणत्या प्रश्नांची आंदोलने लेखिकेच्या मनांत फेर धरु लागली?

२) लेखिकेचे मन लंडनचे सौंदर्य न्याहाळताना कोणत्या विचारात गुरफटलेले होते?

३) या लेखाच्या शिर्षकाची समर्पकता स्पष्ट करा?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "एखादं दु:ख विसरण्यासाठी कामात हरवून जाणं तिच्यात मला दिसलं."

२) "आपण आपल्यासाठी जगतो, पण कांही माणसं देशासाठी जगतात."

**ई) टीप लिहा.**

१) लंडन आय

**उ) वाक्प्रचार**

१) चोचले पुरविणे-अति कौतुक करणे   २) कुतुहल वाटणे-उत्सुकता वाटणे

**ऊ) उपक्रम**

'मी सिंधुताई सपकाळ' हा चित्रपट पहा.

***

# ६. जातील हे बी दिवस

**प्र.ई.सोनकांबळे**

**परिचय : प्र.ई.सोनकांबळे (१९४३-२०१०)**

मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील ताः जळकोट येथून जवळच असलेल्या सुल्लाळी (डोंगरगाव) या दुर्गम भागातील लहानशा खेड्यात जन्म. लहान वयातच आई-वडीलांचा साथीच्या रोगाने मृत्यू. लहान वयात आलेले पोरके पण पाठीमागे सांभाळ करण्यासाठी कोणीच नाही दोन बहिणींचे लग्न झालेली. तो लहान पोरका झालेला मुलगा अशा स्थितीत दोन्ही बहिणींनी त्यांचे संगोपन केले. शाळा शिकण्याची अत्यंत उत्कंठा पण परिस्थिती नसल्यामुळे आडचणी. सर्व संकटांना सामोरे जात कधी 'चेरा' येथील बहिणीकडे तर कधी जगळपूर येथील बहिणींकडे राहून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उपासमारीत पूर्ण केले. पदवी व पदव्युत्तर एम्.ए.पर्यंतचे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे अंतर्गत झाले.

अशा आर्थिक विवंचना सोसून त्यानी 'आठवणींचे पक्षी' १९६९ मध्ये प्रकाशित केले. व मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राध्यापक व कांही काळ प्राचार्य म्हणून काम पाहिले. 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथेतून दुःख, दारिद्रय, दैन्य गरिबी यांच्याशी संघर्ष करण्याची व शिक्षणासाठी संघर्ष करण्याची तसेच भूक व गरीबीवर मात करण्याची मानसिकता समाजाला आदर्श घालून देणारी ठरते.

मजे दोन दाजी. एकाचं नाव धोंडिबा व दिसऱ्याचं नाव किशन. धोंडिबा थोरल्या अक्काचा नवरा. किशन न्हनग्या बाईचा. धोंडिबा चेऱ्याचा तर किशन जगळपूरचा. ते दोघे होते सक्के मावस भाऊ. कारण तेयच्या माया म्हंजे मज्या बापाच्या सक्या बहिणी म्हंजे मज्या आता. दोगीबी मज्या बापावून वडील. मी माय बाप मेल्यापासून धोंडिबाच्या ईतं ऱ्हात व्हतो. तो गरीब सबावाचा राकायचा लोकाचा हुंट पातीनं. लोकांचे पैसे. हेयची निसती अंगमेहनत ऱ्हायची व जे किराया लागला आर्दा मिळायचा, तेयला. त्याच्यात काई भागायचंच न्हाई. आक्का निसतं वन वन करायची, पसाकुसा मिळंल म्हणूनशीन दाजी हुंटावर बसून टेलत गैराद्यावनी कुटंबी फिरायचे व किराया लागला काय न लागला तेयला परवा नव्हती. काम तर करायचाच न्हाई पण पोरायसंग जे असेल ते गळागळा गिळायला हजरच ऱ्हायचा. म्हणूनशीन आक्का त्याच्यावर लई चिडायची व शिव्या देयाची. दाजी तसाच निघून जायचा, पण कदी कदी असं व्हायचं की त्याची माय म्हंजे मजी आत जे लावून देयाची व म्हणायची,

'अरं धोंड्या तुला सकीनं काय काय बोललीरं, तुजा खाना खराब व्हवू दे. त्याला संसार करता येत न्हाई मग लेकरं कशाला हळजावं, निसपुरी भाड्यानं. गोसायनं.'

मग दाजी लई मायचं ऐकून चिडायचा व मज्या आक्काला जे बेहद मारायचा ते कधी कधी तिचं डोस्कं फुटायचं व रगत भळंळ येयाचं भाईर. भईन मेलो मेलो रे बापरे म्हनीत शिव्या देत खाली बसायची. तरी माय लावून देयाचीच व दाजी लगावायचाच. मला लई वंगळ वाटायचं. पण करणार काय. मला वाटायचं की अपून बी त्याला मारावं पण मजा जीव व्हता न्हनगा.

मी चेऱ्याच्या आक्काला मारलं की जगळपूर एक कोस असल्यामुळं जगळपूरच्या भईनीकडं पळून जायचो पण जगळपूरला गेलो तर बी थेट घरी जायचोचं न्हाई, कारण तितल्या दाजीचा सबाव जरा अलक व्हता. ते निसते डोळे वटारायचे व धुमकारतच बोलायचे व तेयला मज जानं बरं वाटायचं न्हाई, व वाटलं तरी मी तेयला खसपटासारकं वाटायचो. कोनी लोकनं म्हनलं,

'आहो किसन, तुमचा म्हेवना आलाय का?' ते म्हणायचे, 'हं हं. आलंय ते पोरगं. त्याला काय लागलंय येतंय तसंच.'

मला लई भिव वाटायचं तेयचं. म्हणून मी मऱ्याआईच्या देवळातच घरी न जाता बसायचो व देऊळ सापसूप करायचो व लोकांनी निवदबिवद बोनं नारोळ ठिवल्यालं खावं वाटायचं पण खायचो न्हाई, कारण वाटायचं खावं तर मरूमाय काई करील बाबा. म्हणून तसाच बसायचो एका कोपऱ्यात दडून. कोणी आलं की लई दबायचो व मनात तर वाटायचं की कोण तर बगावं गड्या मला व बाईला सांगावं, मग कोनी पोरंसुरं बगायचे व बाईला सांगायचे.

'आये काकू' परलादमामा आलाय. काई म्हणायचे, 'आये मुगताबाई, तुजा भावू आलाय माय, त्या मरूआईच्या देवळात बसलाय, चल म्हणलं तर येतचं न्हाई.'

मग भईन येयाची. तेबी दाजीला दबत दबत. कारण तेयचा लइ दरकार व्हता तिला व दिसरं म्हंजे दाजी म्हंजे लई चंद्रा, व बाई म्हंजे लई साळीभोळी येडसर बिचारी, गरीब गाय तिला कुठं जाऊ देयाची न्हाई. तिचा जीव लई तुळतुळ तुटायचा. दाजी निजते भारूडंबिरूड म्हनीत व वाटनंबिटनं हं हं हा हा करीत ऱ्हायचा. ते सागुतीफिगुती खात नव्हते, व गळ्यात जानवंबी व्हतं. म्हणूनशीन उतीमलोक तेयला जरा जवळ करायचे. ते लई फुगून गेल्यावनी करायचे. व ते गरीबाला बोलायचे नाहीत. तेयला आगास पाताळ एक झालं व्हतं. तेयला दिसत न्हवतं. बाई येऊन देवळात, 'चल रं बापू' म्हनायची. मी जायाला जरा भियाचो. कारण त्या दाजीचं तसं डोळे वटारुन बगनं व भईनीवर कातावनं बगून नकोच वाटायचं. मग कदी कदी तिच्या म्हागं दडून दडून जायचो, व एका कोपऱ्यात बसायचो. तितल्या लोकायला लई आदत व्हती. बायापोरी म्हनायच्या,

'परलादनं काय आनलंय माय मुगताला. आता सन जवळ आलाय.'

तेयला म्हाईत व्हतं की मजे मायबाप मेलेत व मीच लोकाच्या वळणीवस्तरी पडलोय म्हणून. बाईच्या जीवाला कातर लागायची व मला वाटायचं मी लहान व मजेच दिवस देवाऱ्यावर न्हाईत. मी काय आणू. दाजी जेऊन भाईर गेला की मग हालकं मी बाईसंग मुचू मुचू जे असलं ते

कांजीभाजी खाऊन घेयाचो, व म्हारोवड्यातल्या गुरु म्हाराजाच्या देवळाजवळ सगळे लोक निजायचे तितं बाजूला दूर निजायचो. लोक म्हणायचे 'अरे कोन हाय. आंदारात आलंय, तितं पडलंय.' कोणी म्हनायचं, 'अरं, त्या किसनदादाचा म्हेवना हाय, किसनचा म्हेवना.' तसं काई म्हणायचे. तर कोणी म्हणायचे, 'अरं, त्या ईर मामाचं म्हनगं पोरगं हाय. त्याचा बाप असताना लई अंबल व्हता. किती लोक येयाचे ईरमामाकडे जाणतपणाच्या नादानं पण आता त्याच्याच लेकराला कसे दिवस आलेत. आन हा किसन तरी त्याला बरं बगतोय का? किसन खाऊन पिऊन चांगला हाय तर ह्यानं ह्या पोराला ठेवून घेवं. पण कसा घेईल तो मुलकुचा चेंगट हाय.'

मी रातबर करमायचो तितं व सकाळ व्हताच कदी भईनीला कळवायचो तर कदी कळवायचोच न्हाई. तसंच चेऱ्याला निगून जायचो. भईन बिचारी हुडकीत ऱ्हायाची. मग कोणी तरी तिला सांगायचं,

'आगं, मुगताबाई, परलाद गेला चेऱ्याच्या वाटनं.' मग ती हुरहूर करीत पानी गाळीत बसायची. असं कदी कदी व्हायचं तर कदी कदी मऱ्याईच्या देवळातून भईन मला न्हेयाला आली तरी येतो चल म्हणून जायचोच न्हाई व वापस चेऱ्याला तितूनच म्हागी फिरायचो. कदी कदी दिवस
असल्यावनी वाटायचं पण बुक्याच्या मळ्यात तर बेंबऱ्याच्या माळावर दिवस मावळायचा. मग मला भिव वाटायचं व झुडपा फिडपात खूसपूस केलं की 'आलरं, बापरे' वाटायचं काईतरी. सुताराच्या माळावरच्या वडाजवळ तर लई भिव वाटायचं. कारण लोक सांगायचे तितं लई मोटं भूत हाय म्हणून. लई भेगी भेगी चालायचो. व काई वाजलं की दचकायचो व कदी कदी तर घुबडं घुमायचे. मला वाटायचं लई वाईट दिसतंय गड्या वक्त. भेगी चालताना कदी चिपाडानं पाय कापायचे तर कुजलेले काटे मोडायचे व काढलं तरी मदीच खुडाचे. मला खूप वाईट वाटायचं. उगच आलो म्हणून बाईच्या घरला न जाता. भाकरीला लात देऊन आलो म्हणून असं झालं काय की वाटायचं.

झालो चवती पास. आला ईचार. कसं करावं वाटू लालं तवाच झाली एक गम्मत. ती म्हंजे आक्कानं आनलं व्हतं जगळपूरच्या बाईला

कोनी निगायला व तिला वाटलं की कांजी भाजी खावून व्हईल कसंतरी बाळातपण. कचेवले जातील दिवस. निगाली कोणी बाई. झाली तिला पोरगी. घर व्हतं निसतं कैंबळाचं. बाळतीनसाठी रातभर चिमणी ठिवायचे. जे चिमणीनं एका दिशी घर पेटलं ते काही केल्या आटपंना झालं. लोक झटले. पाण्यानं ईजवू लाले पण करावं काय नाईलाज, वारं बरंच व्हतं. जे हवा भडकली ते सारं घर जळून खाक झालं. जे ते चू चू करु लाले. सारा म्हारोडा म्हणू लाला, 'उगीच आणली ह्या सकीनं भईनीला.' दुसऱ्या बाया म्हणायच्या 'भईनीचं तिला कोडकौतुक करु वाटलंगं. बरी केली आणली. आता हमच्या घराला आग लागली म्हंजे तिचं पोट थंड व्हईल.' काई म्हणायच्या, 'आग म्हणूनि. येळ कुणालाबी येतीया.' घरची गरीबी लई पण अक्काला लई सबं व्हती. लोटके चेटके भरुन ठिवायची, 'हुंटाच्या गादीमदला रुबी व्हता.' सगळ्याची राख रांगोळी झाली. आदिच कपडे नसायचे व व्हती पावसाळ्यात थंडी पाण्यात हिवात व्हईल वापराय म्हणून ठिवलेल्या भाराबर चिंद्याची गोदडी ती बी खाक झाली. पोरं लई मुतायचे तिचे तरी बी गोदडी हिवात तर लई आपरुक वाटायची. सारं घर जळालं पण माणसाला कायबी झालं न्हाई. देवाजवळ मारोजा हाय ग माय.

जिकडं तिकडं हाच बोंबाट झाला. सारे म्हणू लागले, सकीचं घर जळालं. सकीचं घर जळालं. कोणी म्हणायचे कशाला आणली असंल भईनीला रांडनं. जसं व्हईल तसं व्हवू देयाची व्हती तिच्या तिच्या घरी. कायी बाया म्हणायच्या आग माय वडील धाडील हाय तिनं म्हणूनशीनी आणली असंल करुन बगावं म्हणून. लोक ये जा करीत ऱ्हायचे व बगुन चू चू करायचे व कोणी म्हणायचे, 'सखू ये गं मज्या घरला. देईल तुला काई तरी.' तर कोणी म्हणायच्या, 'अगं, सकूबाई ये गं माय मज्याकडं. कापडं मिपडं देईन तुज्या लेकराबाळाला.' असं व्हता व्हता दिवसामागं दिवस लोटले. कोणी कापड दिलं. कोणी थोड्या दाळी. कोणी दाणे तर कोणी तांदूळ दिले. घरातली जळलेली काळीभोर गठुड्यात असलेली थोडीशी उडदाची व मुगाची दाळ भईनीनं काई टाकून दिली न्हाई. ती कशी तरी लागायची. म्हणूनशीनी अक्कानं तिला लोकायनी दिलेल्या त्या दाळीत मिसळून टाकली व तसंच एक व करप लागली तरी तसाच

मुकाट्यानं खावं लागायचं. दिवसा म्हागं दिवस चाले. जे थोड्या थोड्या मातीच्या व शेनकुटाच्या भिंती व्हत्या त्या जरा सारवून घेतलो व त्याच्यावर आर्ध्या घरावर पळाट्याचा तातवा व अर्दे घर जाळणातले लाकडं वाकडे तिकडे व धांडाळ चिपाड टाकून जरासा फाटकं फाटकं आदार केलो व ऱ्हावू लागलो. तवा उनाळा भरकांडीत व्हता. लई उन लागायचं. आमी लई करुन तर बामणाच्या चिंचखालीच दुपारी ऱ्हायचो.

सगळे लोक म्हणायचे की आता सकीच्या नवऱ्यानं हुंट सोडून देवं व जे लागलं ते काम करावं पण दाजी लई हट्टी. तो काई लोकाचा हुंट सोडून देईनाच. जरा काम करा बाबा म्हटलं की तो म्हणायचा मज मी हुंटाचं काम करतो तुमचं तुमी बगा. तेयला दिसरं काम करुच वाटायचे न्हाई. खाया मिळंना तर मिळंना पण हुंटावर बसून टैलत फिरावं वाटायचं. किराया लागो कि भागो तेयला काई परवा न्हवती. बिचारी आक्काच जरा धडपड करायची. लेकरंबाळं हायत म्हणून. कोणाचं शेन काडायची, तर कोणाच्या ईतं लाकडं आणून टाकायची. तर कुणाच्या ईतं गवत आणून टाकायची. मी बी संग ऱ्हायचो. मला कदी कदी नगं म्हणावं वाटायचं पण आक्का शिव्या देईल वाटायचं म्हणूनशीन तसंच चुंबीत जायचो कुटं बी. जितं आक्का न्हेईल तितं.

दाजी, जरा गैरादी व्हते. ते काम करीतच नव्हते. पण जे आणलं ते पोरायसंग मातर खायला हजर ऱ्हायचे. मग कदी कदी आक्काचं व त्यांचं जुपायचं. दाजी लई मऊ ऱ्हायचा पण कदी कदी राग आला की असा भंगीट व्हायचा व आक्काला लई मारायचा व त्याची माय म्हंजे–मजी आत, बापाची भईन लई लावून देयांची 'अरं धोंड्या तुला सकीनं असं म्हणलं तसं म्हणलं' म्हणून. मी रडत कुटंबी निघून जायचो.

जरा मिरुग सितळाई पडली म्हंजे पाणी पाऊस सुरु झालं न्हाई तर जरा थंड वाटू लागलं. सगळे म्हणू लागले,

'आगं सकू ह्या तुज्या भावाला शाळाबिळात जाऊ नको म्हन. ठिव त्याला नोकर कुठंतरी.' भईन म्हणायची, 'जी, माय जरा न्हणगा हायजी जीव त्याचा.' लोक म्हणायचे, 'आगं तसं पोमाळून ठिवू नको त्याला. चांगला बारा तेरा वर्षांचा हाय. त्याला काय झालंय दुदग्याला.' मला बाया म्हणायच्या, 'आरं परल्या, ऱ्हातूसकारं नौकर किसंडा

पाटलाच्याईतं नसता अप्पा मोऱ्याच्याईतं.' मी गप्पच बसायचो. भईनीला जरा बरं वाटायचं कारण  पैसे मिळतील व त्याचं पोटबी भाईर पडलं म्हणून.

मग ठिवलं आक्कानं नौकर मला. दाजीनं काई ध्यान दिलंच न्हाई. मुकाट्यानं बसलं मला समजनाच गेलं. किसंडाबापूनं मला आडीच रुपये देऊ केले. म्हईन्याची म्हावर बरं का. सगळ्यांना वाटलं की आता सकीचं बरं झालं. एक तर पोराचं पोट भाईर पडलं व दिसरं व वरीस सहा म्हईन्याचे पैसे उचलून सकीला घराचं काही तरी बगता येतंय. असं साऱ्याला वाटलं. मी आज परेंद असं नौकरी ऱ्हाईला न्हवतो. दोनचार दिवस बरं वाटलं. कारण उनाळ्याचे दिवस व्हते. तेवडं काम बी न्हवतं व तेयची लई मिन मिन नव्हती. खायाला बी चांगळं वंगळं मिळायचं. चांगळंवंगळं म्हंजे दिसर काई नसून नुस्त भाजी भाकरी. जरा फोडणी दिलेली एवडाच काय त्याचा आरत. कारन भईनीच्यात कवा भाकर म्हंजे रोटी मिळायची तर कवा भरपूर मिळायचीच न्हाई. थोडी रोटी व जास्त आंबाड्याची भाजी सुगीत वाळवून ठेवलेली खाऊन पोट भरावं लागायचं. नसता उंबराच्या दोंड्यांचे भाजी निटमिट बीट नसताना खावं लागायचं. म्हणून मला किसंडाबापूच्याइतलं जेवन चांगळंवंगळं वाटायचं आन म्हणुनशीनी मजं मन रमायचं. पण ते लोक मला वतलाजवळ मोरीजवळ तर कदी हुडव्याच्या जवळ नसता कणगीच्या जवळ बसवून जेवू वाडू लागले. मला अमंगळ वाटायचं व मन नसताना कामाला जावं लागतंय म्हणून खावून घेयचो, व पळून जावं कुठं तरी वाटायचे. पण चांगलं गुंतलो व्हतो व भिकोरा व्हता मजा सबाव. वाटायचं बरी व्हती शाळा खाया मिळना तर हरकत नव्हती. आता काय गड्या खाया मिळतेय पण कुटंबी लेकरं हागतात तितं बसून जेवावं लागतंय. लई वाईट वाटायचं. पण गेलो एक्यादिवशी खोपाड्याच्या शेतातून कडबा आणायला. लई धांडाळ व्हता कडबा. मला किती येणार. लई कुतून आनलं तर दोन कवा तीन पेंढ्या. अगोदर वारं सुटलं व्हतं. मी कडबा बांधलो तर चांगली गाठ बसलीच नाई. निसतं बिळबिळ वाटू लागलं. जे वारं म्होरुन सुटलं काई केल्या जाऊ देईना. काई लोक वाटतले म्हणायचे,

'कायरं परल्या, तू नोकर ऱ्हायलास कारं बापू' काई पोरासारखे पोरगेले चिडवून म्हणायचे,

'आरं शाळा वाळली का आता रं, किसंडा पाटलाच्या ईत नौकरीला हाईस व्हईरं.' मुकाट्यानं बसायचो व लई लोक बोलले की शब्द न काढता हं हं म्हणायचो. तसं म्हणताना मज्या मनात कसंतरी वाटायचं. पण म्हणतातना 'आडला नारायण' तसं झालं मजं म्हणून धरलो व्हतो नौकरी. नाइलाज
व्हता म्हणून. भईनीचं तसं मन नव्हतं बिचारीचं पण तिच्या घरची राखरांगोळ झाली व्हती व ते बी भईनीच्या कोण निगण्यानं म्हणून लोक तिला चिडवायचे म्हणून आक्का मला म्हणायची, 'आरं बापू नवकरी जरा चांगलं मन लावून कर तू बाबा. व्हईल जाळभाज घराची.'

मला वाटायचं मजेच जर मायबाप असते तर तेयनी बाईचं बाळातपण केलं असतं व आक्काला अशी पाळी आली नसती. पण काय करावं? मायबाप अगोदरच देवाघरी गेलते. कुणास ठाऊक हामाला भिवून देव जाणे. मला किसंडाबापूच्या इतले लोक लई काम सांगू लाले. मजा पडला न्हनगा जीव, मला हे सारं झेपेना गेलं. मग पावसाचे दिवस झाले की दाजी आक्कावर रागात आले व म्हणू लाले, 'आपलं कसं का व्हईना. त्याला का चाकरी ठिवलीस. राहारं परलाद घरी आण जा तुजं तू शाळत.' मला बरं वाटलं. मी बसलो घरी पण उद्या आले किसंडाबापू. जरा रागातच व म्हणू लाले.

'पर परलाद्या! काय झालं तुला दुदग्या. चांगल खाल्ल्याघरचे वासे मोजायलाईच तू, का बसलास घरी.'

तेयनी भईनीला इच्यारलं व म्हणू लाले.

'अगं सखे कुठं गेलाय धोंड्या?'

दाजी आले भाईर व म्हणू लाले, काय की बापू त्यानं व त्याची भईन जानं. मला कायबी म्हाईत न्हाई, म्हावर आणकी उचललो नव्हतो म्हणून बरं झालं. खानं पिनं व काम बराबरी झालं. असं म्हणूनशीनी चाकरीवून बसंलो कदीमचा घरी. किसंडाबापू तोऱ्यातच गेले. ते पुना फिरुन मज्याकडं फायलेच न्हाईत. सगळे लोक म्हणू लाले, 'अरं परदिशा पोरा. सकीचं घर तुज्या परतभावामुळं जळालं. कारं तू चाकरी सोडलास. ' मी ऐकायचो व कदी कदी चिडायचो बी. पण ते लोक मोटे ऱ्हायाचे. म्हणूनशीन भईन मला दाबून ठिवायची. मग जरा अवघड वाटलं की

रडायचो. व कुणाच्याबी वळणी वस्तरी बसायचो. तर कदी कदी कुणाच्या बी शेताबितात रुसून जायचो व तेथंच काय बी काम करायचो व तेयनी जे दिले ते शिळेपाके खायचो. कदी कदी काई नसलं की ते लोक म्हणायचे,

'खारं हुरडा जरा दोन-चार कणसं होरपळून.' कदी कदी खायचो तर कदी तसाच बसायचो, कारण कदी कदी लोक मजी परक्षा बगायचे व म्हणायचे, 'अरं खावं म्हनलं की खावंच कारं. तू शाळत जात व्हतास तुला समजत न्हाई. कदी येईल तुला अक्कल बिक्कल.'

जर का कदी तेयनी लई खा खा म्हणून आलुलकी केली की खायचो व गळागळा पाणी पियाचो तर व्हायचं दिसरंचं. दाणे जे फुगायचे ते पोट घळघळ तर कधी घर्घर् करायचं व टोचल्यावनी करायचं व लगेच भरारी लागायची. मग वाटायचं उगच तर खाल्लो ईच्या मायला.

आता झालं काय चेऱ्याला अक्काची लई कंगाल इस्तती झाली व शाळां बी गावात नव्हती व निव्वळ बसून आयता खाऊ लाला पोरगा वाटू लालं तिला. तिच्या घरच्च्यायला. माजं मन रमना गेलं मग मला एकदा जगळपूरच्या दाजीनं बोलिवलं व म्हणू लाले की,

'काय रं, परलाद, रहातूस का तू मज्याईतं. तुला दुकान करुन देतो. बरी धा वरीष रहावं लागलं तुला. आदिच बोल ठाक ठोक. म्हागून लोक काय म्हणतील. धा वरीस ऱ्हाईलास तर तुजं लगीन करुन देतो. तमाम खरंच मीच करतो.'

मला लगनाची हऊस वाटली न्हाई पण दुकानात तरी ऱ्हाऊन जरा हुषार व्हईन वाटलं. म्हनूशीनी केलो कबूल चेऱ्हावून मजी पाटी एक पुस्तक घेऊन गेलो जगळपूरला. ईकडं अक्का व आत म्हणतच व्हती की 'बाबा रहा रं इतंच. किसन्या भाड्या लई दलाल. कावळ्यावनी हाय. तो तो काय देयालाय तुला दुकान करुन.' पण मी ऐकलोच न्हाई. दुकानाच्या आशेनं गेलो पण दाजीनं जुपलं खुरपायला आप्पारावाच्या माळाला. आप्पारावाचा माळ म्हंजे तेयनं कबजा केल्यालं शेत. जरा काई घोळाचं व्हतं शेत. मला तितकं म्हाईत न्हवतं पन ते घरचंबी नव्हतं शेत. पन मला काय करायचं. मी पोटाचा मारला व्हतो. त्या शेतात निसता नागरमोता व्हता. सगळं चवाळी लागून गेलं होतं. पिवळ्याचे एक दोन पिवळे चुटुक घाट दिसत व्हते. व त्यात जरा कुटं तरी ढांगा वर कुट

कासऱ्यावर एक उडदाचं धाट दिसायचं. मी रोज चालो माळाला खुरपं घेऊन बरका. मज्यानं तेवढं रान व्हयाचं न्हाई पन मन लावून बारीक मट्टचक निंदायचो. पिवळा तर गेलाच व्हता. कई उडदाचे ढाळे थोडेसे आले हवा खेळल्यावर. कारण ईतकं गवत दाटलं व्हतं की पुस्तागत न्हाई निसता कुंदा, नागरमोता ठिलून व्हता. वाटायचं की त्याच्यात काय बी पेरलं नाही. तितं येयाचे खूप लोकायचे ढोरगुरं. येऊ देऊ नको म्हणून दाजी मला सांगायचा. पण मला नवाड्याला कोनबी ऐकायचं न्हाई. व बऱ्याच लोकायला म्हाईत व्हतं की मी परदिसा हाव म्हणून.

तितंच येत व्हत्या कायी पोरी म्हैशी घेऊन चारायला. बरं त्याबी म्हारोड्यातल्याच असायच्या व तितंच चारवायच्या व बाजूला जरा जरा पाण्याच्या डबक्यात बसवायच्या. पानी कमी पण निसतं बेंदाड असायचं व चाटू माशा त्यात. मला वाटायचं, खायच्या माशाच हाईत. म्हणून उडी कुनं टाकली की धरायला बगायचो. तर काय चाटूच चाटू येयाच्या हातात व पोरी म्हैशीला उटवू नको म्हणून शिव्या देयाच्या. काई म्हनायच्या. काकूचा भाऊ का पडलाय माय ईतं. लई गुणाचा दिसतोय म्हैशी उटवायालाया. जरा दिसऱ्या आळीच्या म्हणायच्या, कोण हायग तो, तर काई म्हणायच्या, 'आग त्यानं हाय त्या वरलाकडच्या किसनदाच्या मुगताबाईचा भाऊ.' एकदा तर तेयच्या म्हैशी वावराजवळ आल्या. म्हणूनशीन हानायला गेलो तर तेयनं जे शिव्या सुरु केल्या तोबाहल तेयनं तेवढंच केलं न्हाई तर एक काटक्याकुटक्याची ताटी केली व त्यावर चिकलाची एक मुरुत करून मेल्यावानी ठेवली. मज्या नावानं बरं का!

असं व्हता व्हता चाले दिवस निगून. जरा साऱ्याच्या वळकी व्हवू लाल्या. तितले गावातले काही पोरं हडोळतीला शिकायला जात व्हते. मी वाटंवर त्या आप्पारावाच्या माळावर व्हायचो व ईचारायचो की, 'बाबा पाचवीला लई भारी कोरस असतंय का म्हणून?' पोरं बोलायचेच न्हाईत, कारण सगळे वाण्याचे, जगमाचे व बामणाचे ऱ्हायचे. ते लई फुगून गेल्यावनी करायचे ते लई ईटाळ मानायचे. मजा जीव लिव्हण्यापायी तुळतुळ तुटायचा. व्हता तेयच्यात एक कोळ्याचा ईटल. तो व्हता बाराहळीकडचा पण व्हता तो सोयऱ्याईतं जगळपूरला लिव्हायला म्हणून त्याची झाली वळक. तो जरा समद्या जातीपक्षा

हलक्या जातीचा व्हता व परगावचा म्हणून तो एकटाच ऱ्हायचा. झाली मजी त्याची वळक. मी रोज ते वावर निंदित असताना ईचारायचो, 'आंग्रजी लई अवघड हायका जी.' तो म्हणायचा, 'अरं जरा हाय. काई आवगड न्हाई पण तू येतोयाच कुटं. कशाला ईच्यारतूस मला. गणित व अंग्रजी जरा आवगड हाईत व ईज्ञानाचा मास्तर बी लई खराब हाय.' म्हणायचा तो. मला वाटायचं चेऱ्यावून जमलं न्हाई तर न्हाई ईतून जवळ हाय हडोळती व दाजी दुकान कर म्हनन्यापक्षा शाळत का जां म्हणंना गड्या? पण तो कसा जाऊ देईल. त्याला पैसा पैसा गोळा करण्याची हाऊस व्हती. त्याला मानसाची कदर कुटली? त्याला आगास पाताळ एक झालं व्हतं. काई खाली दिसत नव्हतं. मला वाटायचं चेऱ्याचा दाजी व भईन जरी गरीब असले तरी हाजार पटीनं चांगले गड्या? उगंच आलो ईत. पळून जावं वाटायचं. पण कसं जाऊ. आलतो तितून नको नको म्हणाले तेयनी तरी व इतं हेयच्या पेचात सापडलो होतो. कसा कुण्या तोंडानं पळून जाऊ वाटू लागलं. असं करु तर कसं व्हईल. तसं करु तर कसं व्हईल. ईकडे आड तिकडे हीर. आगीतून उटून फोफाट्यात पडल्यावानी वाटू लालं पण वाटायचं की बाबा, जातील हे बी दिवस.

**(आठवणींचे पक्षी)**

**शब्दार्थ**

पसाकुसा–जे मिळेल थोडेफार ते. हळजाव–जन्माला घालणे. निसपुरी–ज्याला कुणीही नसतो तो, सडाकोस. धुमकारतच–दरडावून बोलणे. खसपटासारखा–कवडीमोल, किंमत नसलेला. भिव–भिती. बोनं–लहान आकाराची पुरण भरलेली पोळी (छोटे नैवेद्य) दरकार–मज्जाव, येण्यास बंदी. चंद्रा–हुशार. सागुती–मासाहार. उतीम–मध्यमवर्गीय जीवन जगणे. आगास–आकाश. आदत–सवय. वळणीवस्तरी–उशापायथ्याला पडणे. कातर–काळजी घोर. देवाऱ्यावर–ठिक अवस्थेत नसणे. कांजीभांजी–चटणीभाकरी किंवा जे मिळेल ते खाणे. जाणतपणा–छाछु, जादुमंतर, दोरिगंडा. बुकाबेंबरा–माणसाचे व माळाचे नाव. कोणी निगायला–बाळंतपणासाठी. मारोजा–दया. पळाट्या–कापूस पिक घेतल्यानंतर वाळलेले ताटे. टैलत–दिमाखात चालणे. चुंबीत–इच्छा नसताना. गैरादी–ऐतखाऊ. भंगीट–भांग पिल्यासारखे असणे. मिरुग–मृगनक्षत्र. पोमाळून–

लाडावून, काम न लावता ठेवणे. दुदगं-विना मेहनतीनं पोसलेलं फळ. म्हावर-पगार, वेतन. दोड्या-उंबराची फळं कोवळी फळे. हुडवा-शेणाच्या गोवऱ्या भिजू नय म्हणून रचून ठवणे. धांडाळ-लांबसडक असलेला. कुतून-काकुळतीने, ऐपतीपेक्षा जास्त करणे. कदीम-कायमचा. परदिशा-नातेवाईक नसलेला, एकटा. भरारी-पातळ संडास होणे. नागरमोता-एक पिकात वाढणारं तन. चवाळी-पाणी धरणारी जमीन. ढांग-एका पावलापासून दुसरे दूरवर टाकलेले पाऊल. पुसतागत-विचारायची सोयच नाही. तोबाहल-भयंकर.

### अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

१) लेखकाचे संपूर्ण नांव काय?

२) लेखकाला बहिणी किती व त्यांची नांवे सांगा?

३) लहानपणी लेखकाला कोणत्या शेतमालकाची नोकरी करावी लागली?

४) लेखकाच्या बहिणीच्या घराला आग कशामुळे लागली?

५) लेखकाला शेतमालकाकडून दरमहा पगार किती ठरला होता?

### आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

**१)** आई वडिलाविना पोरका झालेल्या लेखकाची लहानपणीची दुरावस्था यावर माहिती लिहा.

२) लेखकाला शिक्षणाची असलेली ओढ व होत असलेली ससेहोलपट यावर सविस्तर लिहा.

### इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

**१)** "गेलो एक्यादिवशी खोपाड्याच्या शेतातून कडबा आणायला. लई धांडाळ व्हता कडबा. मला किती येणार. लई कुतून आणलं तर दोन कवा तीन पेंढ्या."

२) "लोकांनी निवद बिवद बोनं नारोळ ठिवल्यालं खावं वाटायचं पण खायचो न्हाई."

### ई) टिपा लिहा.

१) लेखकाचे दोन मेव्हणे किशन व धोंडीबा यांचा स्वभाव.

२) बहिणीच्या घरी लेखकाची होणारी कुंचबना.

**उ) वाक्प्रचार**

१) खाल्ल्या घरचे वासे मोजणे २) इकडे आड तिकडे विहीर असणे

३) आगीतून उठून  फोफाट्यात पडणे.

**ऊ) उपक्रम**

'आठवणींचे पक्षी' आत्मकथन मिळवून वाचा.

****

# ७. शेरास सव्वाशेर

**भा. वि. वरेरकर**

**परिचयःभार्गव विठ्ठल उर्फ मामा वरेरकर(१८८३-१९६४)**

हा नाट्यप्रवेश 'हाचमुलाचाबाप' या एकेकाळी गाजलेल्या नाटकातून घेण्यात आला आहे. या नाटकाशिवाय 'सत्तेचे गुलाम', 'सोन्याचा कळस', 'संन्याशाचा संसार', 'भूमिकन्या सीता' इ. नाटके. एकांकिका, 'विधवा कुमारी', 'धावता धोटा', 'सात लाखातील एक' इत्यादि कादंबऱ्या व कथा असे विपुल लेखन केले. शरत्चंद्रांच्या बंगाली कादंबऱ्यांचे त्यांनी मूळ बंगालीवरुन उत्कृष्ट अनुवाद केले. त्यांच्या नाट्यविषयांत विविधता असे. नाट्यरचनेत नवनवीत तंत्रांचा वापर करण्याची तत्परता ते दाखवीत. वरेरकरांची नाट्यकला प्रामुख्याने समाजाभिमुख व प्रचारकी आहे.

हुंड्याच्या प्रश्नावरले हे नाटक १९१६ साली रंगभूमीवर आले या विषयाने लेखकाचे मन वेधून घ्यावे अशी एक घटना त्यापूर्वी नुकतीच घडली होती. बंगालमधल्या स्नेहलता नावाच्या मुलीने अंगावर रॉकेल ओतून आणि त्याला काडी लावून स्वतःला जाळून घेतले होते. स्नेहलता ही एका गरीब घरातील मुलगी. हुंडा देण्याचे तिच्या बापाला सामर्थ्य नव्हते. आपले लग्न जुळावे म्हणून पित्याने घरदार विकून कंगाल व्हावे हे कोणत्या मुलीला आवडेल? स्नेहलतेला या गोष्टीचे मनस्वी दुःख झाले.त्या मानी भावनाप्रधान मुलीने पित्यावरले संकट टाळण्याकरिता आत्मनाश करुन घेतला.

वरेरकरांनी हा विषय विनोदाचा आश्रय करुन-हुंडा घेणाऱ्या माणसांच्या लोभी व ढोंगी स्वभावावर प्रकाश पाडून-

या नाटकात मांडला आहे. या वेच्याचे पूर्वसूत्र असे आहेः दिगंबरपंत हे एक सज्जन गरीब गृहस्थ. यमुना ही त्यांची शिकलीसवरलेली मुलगी. वसंत हा श्रीमंत रावबहादूरांचा डॉक्टर झालेला मुलगा. या दोन कुटुंबांचा पूर्वीचा घरोबा आहे. गुलाब हा दिगंबरपंतांचा भाचा व वसंताचा मित्र. विष्णुपंत हा रावबहादुरांचा कारभारी.

रावबहादुरांनी यमुनेला आपली सून करुन घ्यावी अशी विनंती करण्याकरीता दिगंबरपंत गुलाबला बरोबर घेऊन आले आहेत. वसंतची इच्छा यमुनेशीच लग्न करण्याची आहे. त्यामुळे तो दिगंबरपंतांना अनुकूल असेच बोलतो. अशा परिस्थितीत रावबहादुरांच्या दिवाणखान्यात हा प्रवेश घडतो.

...

**वसंत** : माझं लग्न यमुनेशी व्हावं अशीच आमच्या आईची इच्छा होती.

**रावबहादुर** : गेली बिचारी! खरे सुखसोहळ्याचे दिवस पाहण्याचे काही तिच्या नशिबी नव्हतं. गेली! तीही गेली आणि तिच्याबरोबर तिच्या साऱ्या इच्छाही गेल्या!

**वसंत** : तिची स्मृती तरी अढळ आहे ना? तिच्या स्मृतीबरोबरच माझ्या या हृदयात तिच्या इच्छेचीही स्मृती अढळ राहिली आहे. पडतील ते कष्ट सहन करुन तिची इच्छा पूर्णतेला नेण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. तुम्ही इतर कुठं स्थळ पाहू लागला असता तर मी तुम्हांला हेच सांगणार होतो.

**विष्णुपंत** : (स्वगत) कॅालेजात गेली की पोरं बिघडायचीच! तरी मी साहेबांना सांगत होतो.

**दिगंबरः** वसंतराव, आपल्या मृत मातेचा शब्द पालन करण्याविषयी तुमची ही उत्कंठा पाहून मला खरोखरच अत्यानंद होत आहे. फार गांजलो होतो. एकदाचा या संकटातून मुक्त झालो.

**रावः** (स्वगत) अरे, हे तर एकमेकांच्या गळीसुध्दा पडू लागले. आता? आता असं केलं पाहिजे. (उघड) माझ्या आवडत्या मृत पत्नीची इच्छा पूर्ण करण्याचा सुयोग आलेला पाहून खरोखरच मला धन्यता वाटत आहे.

**वसंत** : (स्वगत) मी हे काय ऐकतो आहे? बाबांचेच का हे उद्‌गार?

**गुलाब** :(स्वगत) यात काही तरी कावा आहे?

**दिगंबरः** खरोखरच आज मीही धन्य झालो!

**विष्णुपंत** : सारे धन्य झाले, माझ्या धन्याचं धन कोण पाहिल? हुंडा काय घ्यायचा?

**रावः** छे!छे! विष्णुपंत काय बोलता हे? हुंड्याचा मला अत्यंत तिटकारा आहे!

**विष्णुपंत** : हुंडा घ्यायचा नाही, तर दादासाहेबांना विलायतेला कसं पाठवता येणार?

**रावः** होय, बरोबर. तीही एक तिचीच इच्छा होती आणि या पहिल्या इच्छेप्रमाणं ही तिची दुसरीही इच्छा पूर्ण करायला मी अर्थात बांधला गेलो आहे.

गुलाब : वसंतला विलायतेला पाठवायला हुंड्याची रक्कम पाहिजे इतकी आपली सांपत्तिक स्थिती डबघाईची असेल, असं निदान मला तरी वाटत नाही.

**रावः** भ्रम आहे! डॉक्टर, सगळा भ्रम आहे! मिशीला तूप लावून लोकांत मिरवायचं येवढंच! दिवसेंदिवस वकिलांची संख्या वाढत असल्यामुळे आमचं आता पूर्वीसारखं कुठं चालतं आहे? त्यातून ही रावबहादुरी! ही रावबहादुरी शोभण्यासाठी प्रत्येक ठिकाणी भले मोठाले वर्गणीचे आकडे टाकावे लागतात. नुसता बडा घर आणि पोकळ वासा आहे झालं!

**वसंत** :मला मुळी विलायतेला पाठवूच नका म्हणजे झालं!

**राव** : छे! छ! असं कसं होईल? ती तिची इच्छा आहे ना? ती पुरी झालीच पाहिजे!

**गुलाब** : (स्वगत) असं पकडलं काय? ठीक आहे. आता शेवटचाच उपाय.

**विष्णुपंत** : शिवाय असं पहा, मुलीच्या अंगावर चार ठळकसे दागिने तर घातले पाहिजेत?

**दिगंबर** : माझ्या मुलीला दागिन्यांचा सोस मुळीच नाही. सोन्याचा तर तिला अगदी तिटकारा आहे.

**विष्णुपंत** : हे म्हणायचं नुसत. तुमची मुलगी आहे तोपर्यंतच म्हणेल फार तर! पण उद्या आमची सून होताच नजर फिरेल महराज!

**रावः** अशी मुलीला काय दागिन्यांशिवाय ठेवायची आहे? इभ्रतीला शोभेल असंच काही तरी केलं पाहिजे ना? बरं, आमच्या तिचे सारे चार दागिने आहेत-पण ते मंजिरीचे आहेत. कारण तीही तिचीच इच्छा आहे.

**गुलाबः** (स्वगत) आणखी काय काय तिच्या इच्छा निघणार आहेत देव जाणे !

विष्णुपंत : बरं, लग्नाच्या खर्चाची काय वाट?

**रावः का**य वाढतं आहे एकेक! 'लग्न पाहावं करून आणि घर पाहावं बांधून' असं म्हणतात ते कांही खोटं नाही. लग्न तर थाटात झालं पाहिजे बुवा! एकुलता एक मुलगा-

**वसंत:** माझं लग्न केवळ शास्त्रविधीपलीकडं इतर कसलादेखील थाटमाट न करता व्हावं अशी माझी इच्छा आहे.

**राव** : हे झालं तुझं म्हणणं! पण आमचे म्हाताऱ्यांचे आशाळभूत डोळे निवावे कसे? ते कांही नाही; लग्न थाटातच झालं पाहिजे! तुला यात काही समजत नाही. दिगंबरपंत, हुंड्याचा तर मला अगदी तिटकारा आहे. पण तुम्हीच सांगा डॉक्टर, तुम्हीच सांगा-पैशाशिवाय या साऱ्या गोष्टी व्हाव्या कशा? तिच्या साऱ्या इच्छा तर पूर्ण झाल्या पाहिजेत! नुसती यांची मुलगी पत्करायची एवढी एकच इच्छा पुरवल्यानं तिच्या स्वर्गस्थ आत्म्याला समाधान मिळेल असं कसं म्हणता येईल?

**विष्णुपंत** : एकुलता एक मुलगा-नवसासायासांनी झालेला. त्यातून नवसही काही थोडेथोडके नव्हते बरं! लघुरुद्र, महारुद्र, महाभिषेक,

शतचंडी, तुला भार, हे आणि ते-काही बोलू नका! नुसते नवस फेडायला तीन हजार रुपये लागले.

**गुलाबः** विष्णुपंत, जरा इकडे बाजूला या पाहू. (एकीकडे) आता तुम्ही सांगितलेल्या सर्व बाबींचे आकडे तुम्ही ठरविलेच असतील. त्यात आणखी एक आकडा मिळवा!

**विष्णुपंत :** तो कोणता?

**गुलाबः** वसंत हा यांचा मुलगा. यांनी त्याला लहानाचा मोठा केला; त्याची दुखणी बाहणी काढली; त्यांच्यासाठी एवढे जे परिश्रम केले त्याबद्दल यांचा आज पर्यंतचा मेहनताना मिळवून चटकन काय तो एकच आकडा सांगा पाहू. हुंडा हा द्यायची आमची तयारी आहे!

**विष्णुपंत :** दगड आहात-शुंभ आहात अगदी!

**राव :** विष्णुपंत, बोलणं सभ्य असावं. ही काय भाषा! काय झालं?

**विष्णुपंत :** नाही, हुंडा द्यायला आमची तयारी आहे असं हे म्हणाले, तेंव्हा मला अर्थात राग आला. दिगंबरपंतासारख्या सद्गृहस्थाकडून हुंडा घेण्याइतके आम्ही कसाब आहोत वाटतं?

**राव :** हुंडा म्हणून घ्यायचा नाही, असा तर माझा कृतसंकल्प आहे. मग तो कुणाकडून का असेना?

**गुलाब :** तर मग किरकोळ खर्च म्हणून काय रक्कम घ्यायची ठरली आहे?

**विष्णुपंत :** दिगंबरपंत एवढे श्रीमंत कधी झाले?

**गुलाब :** मामा काय? आहेत तसे दिगंबरपंत खरेच आहेत. पण मला हल्ली आकस्मिक वैभव प्राप्त झालं आहे. माझे एक चुलते तिकडे केपटाउनला व्यापार करीत असत. ते यंदा वारले (स्वगत) होते कोण म्हणा! (उघड) ते निपुत्रिक होते.त्यांनी मृत्युपत्रात आपली सर्व इस्टेट-आहे. सुमारे दीड लाखाची-माझ्या नावे करुन दिली आहे...

**राव :** काय, म्हणता काय? असे वर बसा ना खुर्चीवर. खरच, मोठे भाग्यवान आहात बुवा! या, बसा या कोचावर! उभे किती राहाल?

**दिगंबर :** (गुलाबला एकीकडे) नानु, तुला झालं आहे तरी काय? भलतंच काय बोलतो आहेस?

**गुलाब :** तेंव्हा यमूसाठी पाच हजार रुपये खर्च करणं म्हणजे आता माझ्या हातचा मळ आहे!

**राव :** मला आणखी एक योजना सुचली आहे. आमची मंजिरीही आता लग्नाला झाली आहे...

गुलाब : (स्वगत) हा माझ्या उसन्या श्रीमंतीचा प्रभाव!

**राव :** तेंव्हा वसंताच्या लग्नाबरोबर तुम्हां उभयतांचंही लग्न उरकून घेऊ म्हणजे थाटात थाट होऊन खर्चाचीही ओढाताण होणार नाही!

**'हाच मुलाचा बाप'**

**शब्दार्थ**

कावा-लुच्चेगिरीची योजना. सोस-अनावर हौस, हव्यास इभ्रत-समाजातील प्रतिष्ठा. मेहनताना-केलेल्या कामाचा मोबदला. शुंभ-मठ्ठ, मुर्ख मनुष्य. लघुरुद्र-शंकर प्रसन्न व्हावा म्हणून केलेल्या अकरा एकादशण्या. महारुद्र-अकरा लघुरुद्र. चंडी-दुर्गा, भवानी. शतचंडी-देवी

प्रसन्न व्हावी म्हणून केलेला एक धार्मिक विधी. तूलाभार-नवस फेडण्यासाठी नारळ वगैरे पदार्थ माणसाच्या बरोबर वजन करण्याचा प्रकार. कसाब-कसाई.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) राव बहादुर कोणते ढोंग करीत होते?

२) रावबहादुर यांचा ढोंगी स्वभाव विष्णूपंतामुळे कसा स्पष्ट झाला आहे?

३) 'शेरास सव्वाशेर' या नाट्यप्रवेशातील शेर कोण?

४) हा नाट्यप्रयोग कोणत्या नाटकातून घेतला आहे?

५) लेखकाचे संपूर्ण नांव सांगा?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** गुलाबने त्यांना कोणती थाप मारली? तिचा परिणाम काय झाला?

२) या नाट्यप्रवेशातील संवादात कोणकोणते गुण आहेत? उदाहरणे देऊन सांगा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "मला आणखी एक योजना सुचली आहे आमची मंजिरीही आता लग्नाला झाली आहे."

२) "विष्णुपंत, पूर्ण सभ्य असाव. ही काय भाषा! काय झालं?"

**ई) टीप लिहा.**

१) विष्णुपंत यांचे स्वभावगुण

**ऊ) उपक्रम**

'हुंड्याची रुढी कायद्याने बंद पण समाज जीवनात चालूच' या विषयावर निबंध लिहा.

****

# ८. नावलौकिक संत : संत कनकदास

**बी.ए.कांबळे**

**परिचय :** जन्म २४/३/१९५६ तडवळ ताः आळंद जिल्हा : गुलबर्गा. प्राथमिक शिक्षण तडवळ येथे. उच्च माध्यमिक शालेय शिक्षण आळंद. महाविद्यालयीन शिक्षण शासकीय महाविद्यालय गुलबर्गा. एम्.ए. व एम्.फिल् चे शिक्षण मराठी विभाग गुलबर्गा विद्यापीठ. अरुणोदय परिवर्तन हे त्यांचे कविता संग्रह प्रकाशित अस्मितादर्श, अनुबंध, युगप्रबोधन, परिवर्तनाचा वाटसरु, बहुजन समाचार, वीरशैव बसव दर्शन इ. नियतकालिकातून कविता, लेख प्रकाशित, अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन मुंबई, नाशिक, सांगली, पुणे व अस्मितादर्शच्या विविध मेळाव्यात कवी म्हणून उपस्थिती, पायताण आणि मी, मानवतावादी संत कनकदास प्रकाशनाच्या मार्गावर.

प्रस्तुत पाठामध्ये बी. ए. कांबळे यांनी शरण आणि दाससाहित्यातून प्रपंचाकडून परमार्थाकडे वाटचाल कशी करावी. ईश्वराचे चराचरात वसणे, अहंकार सोडून देणे, जातीभेदाचे खंडण यावर प्रामुख्याने भर दिलेला आहे.

---

कन्नड साहित्यात 'शरण साहित्य' आणि 'दास साहित्य' या दोन भक्तिपरंपरा निर्मळ निर्झराप्रमाणे आजही प्रवाहित असल्याने दिसून येते. लोकांना ईश्वरनामाचा सरळ, साधा आणि सोपा भक्तिमार्ग सांगून त्यांनी आपल्या काव्यगायनाद्वारे जनजागरण केले आहे. सत्याचे पालन आणि असत्याचे निर्दालन हे त्यांच्या जीवनाचे जणू अंगच बनून राहिले होते. आपल्या संतत्वाने जनसामान्यांच्या मनाचा तळ ढवळून काढणाऱ्या दासांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

दास परंपरेतील आद्य कवी म्हणून नरहरी तीर्थ यांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. श्रीपादराय, व्यासराय, वादिराज, पुरंदरदास, कनकदास, महिपतीराय, विजयदास, हेळवनकट्टी गिरियम्मा, हरपनहळ्ळी भीमव्वा, प्रसन्न व्यंकटदास आणि मोहनदास इत्यादि संतानी हरिदास साहित्याला समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. उपरोक्त दासांपैकी संत कनकदासांचे संत म्हणून आणि त्याचबरोबर द्रष्टे दार्शनिक कीर्तनकार म्हणून महत्व अनन्यसाधारण आहे. सोळाव्या शतकात आपल्या प्रतिभेने सर्वांना स्तिमित करुन सोडणाऱ्या कनकदासांना वंशपरंपरागत कसलाच अध्यात्मिक वारसा उपलब्ध नसला तरी त्यांनी आपल्या अभंग-कीर्तनाद्वारे जनमानसात कायमचे स्थान निश्चित केले आहे. शेळ्या-मेंढरांत, गुरा-वासरांत आणि कोल्ह्या-कुत्र्यांच्या सोबतीने जगणाऱ्या अज्ञ समाजात जन्म घेऊन, संतत्वाच्या उच्चपदी विराजमान होऊन तथाकथित धर्ममार्तंडांना आश्चर्यचकित करुन सोडले आहे. समाजात विशेष करुन अध्यात्मिक क्षेत्रात समतेचा विचार रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच क्रांतिकारी आहे असे म्हणावे लागेल.

## संत कनकदासांचा जन्म :

संत कनकदास यांचा जन्म सन १४९५ साली कर्नाटकातील ‘बाड’ या गावी झाला. त्यांचे जन्मगांव बाड असले तरी त्यांचे सारे जीवन ‘कागिनेले’ येथेच व्यतीत झाले. त्यांच्या वडिलांचे नाव बीरप्पा असून आईचे नाव बचम्मा होते. ते जातीने ‘कुरुब’ म्हणजे धनगर होते. बीरप्पा हा जात्याच शूरवीर व पराक्रमी असून तो विजयनगर सम्राटाचा विश्वासू म्हणून ओळखला जात असे. त्याचबरोबर आपल्या चांगुलपणामुळे तो लोकादरासही पात्र ठरला होता. बाड व बंकापूर परिसरातील ७८ गावची ‘पाटीलकी’ आणि ‘दंडनायकी’ त्यांना प्राप्त होती. पारिवारिकदृष्ट्या सुखी व संपन्न असलेल्या अशा शूद्र कुटुंबात कनकदास यांचा जन्म झाला. त्यांना योग्य आणि अनुरुप असे सारे शिक्षण बालपणापासूनच मिळत गेले वयोमानाप्रमाणे त्यांना तलवार, भाला, दांडपट्टा, धनुष्यबाण, अश्वारोहण, कुस्ती, मल्लयुध्द, मुष्टीयुध्द यांसारखे युध्दकलेतील सार शिक्षण मिळत गेले. दैहिक विकासाबरोबर बौध्दीक व मानसिक विकास व्हावा म्हणून त्याकाळच्या प्रचलित

पध्दतीप्रमाणे त्यांना कन्नड, संस्कृत, व्याकरण, तर्कशास्त्र, न्याय्यशास्त्र, छंद, अलंकार, काव्यमीमांसा आणि संगीत यांचेही धडे देण्यात आले. व्यक्तिविकासाला आवश्यक असणाऱ्या सगळ्या बाबींचे ज्ञान देण्याची व्यवस्था त्यांच्या पित्याने केली होती. त्यांचे एकंदरीत व्यक्तिमत्व अलौकिक व आकर्षक स्वरुपाचे होते. विद्या, बुध्दी आणि शौर्य यांचा त्रिवेणी संगम त्यांच्यात पाहावयास मिळे. युध्द असो की मैफिल आपोआपच ते त्याच्या नेतृत्वपदी विराजमान होत असत. जमलेले सारे त्यांच्या आज्ञेचे पालन करीत असत. मेहनतीतून कमावलेले शरीर, अभ्यासातून संस्कारित झालेली बुध्दी आणि व्यवहारातून प्राप्त झालेली मानसिक प्रगल्भता यातून त्यांचे व्यक्तिमत्व फुलत गेले. जातीने अस्पृश्य असूनही ते सगळ्यांच्या गळ्यातील ताईत झाले नसले तरच नवल!

**कनकदास नामाभिदान**

संत कनकदास यांचे मूळ नांव 'तिम्मप्पा' असे होते. नंतर त्याचे 'कनक' आणि 'कनकदास' असे स्थित्यंतर होत गेले. याविषयीची आख्यायिका सांगितली जाते ती अशी–बचम्मा व बीरप्पा या दांपत्यांना वयाचा मध्य गाठला तरी अपत्यप्राप्तीचे सुख लाभले नव्हते. उभयतां पतीपत्नी चिंताक्रांत होते. जीवनात सगळी ऐहिक सुखे हात जोडून उभी असताना आपल्या पोटी संतानप्राप्तीचे सुख लाभू नये याचे त्यांना वाईट वाटत होते. जगातील साऱ्या देवांचा धावा बोलूनही प्रयोजन झाले नाही. शेवटी त्यांनी भगवान तिरूपती तिम्मप्पाला साकडे घातले. नवस बोलला आणि कर्मधर्म संयोगाने त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. पतीपत्नीला आनंद झाला. देव नवसाला पावला आणि वंशाला दिवा लाभला म्हणून त्यांनी आपल्या मुलाचे नाव 'तिम्मप्पा' असे ठेवले. तिम्मप्पा दिसामासाने वाढत गेला. वाढता वाढता तो मोठा झाला. वयात येताच त्यांनी घरची व शेतीची कामे हाती घेतली. 'कायक' हा त्यांचा जीवनधर्म असल्याने तो मनापासून शेतात खपत राहिला. नित्याप्रमाणे असेच एकदा तो कुदळ घेऊन जमीन खोदण्याचे काम करीत असताना त्याला सोन्याच्या मोहरांनी भरलेला हंडा प्राप्त झाला. अनायासे लाभलेली ही सारी संपत्ती देवाची देणगी आहे असे मानून त्यांनी ते सारे धन सत्कारणी लावायचे ठरविले. कनकदासांचे घराणे मुळातच दानी आणि गोरगरिबांना आणि गरजूंना उदार हाताने मदत करणारे म्हणून ख्यातीप्राप्त होते. त्यांचे आई–

वडील हे मुळातच सात्विक स्वभावाचे असून त्यांच्या चांगुलपणाचा लौकिक साऱ्या मुलखात पसरला होता. आई-वडिलांचा दानशूरपणा कनकदासांच्या जीवनाचाही अविभाज्य अंग बनून राहिला होता आणि म्हणूनच त्यांनी त्या गुप्तधनाचा स्वतःसाठी किंवा परिवारासाठी किंचितही वापर न करता देवळे बांधणे, देवळांचा जीर्णोध्दार करणे, विहिरी व तळी खोदणे, लोकांना पिण्यासाठी आणि पिकासाठी पाण्याची व्यवस्था करणे, अनाथ, अपंग, वृध्द व भिक्षुक यांच्यासाठी अन्नछत्र खोलणे, गरीब गरजूंना मदत करणे अशा सामाजिक व धार्मिक कार्यासाठी त्यांनी वापर केला. कन्नड भाषेत सोन्याला 'कनक' असे म्हणतात. तिम्मप्पाला कनक लाभले. त्याशिवाय त्यांनी लाभलेल्या धनातून लोकांच्या जीवनाचे सोने करण्याचा प्रयत्न केला म्हणून लोक त्यांना 'कनक' नावाने संबोधन करु लागले. अशा प्रकारे तिम्मप्पाचे 'कनक' नावात रुपांतर झाले. पुढे ते आपल्या संतत्वाच्या प्रभावाने 'कनकदास' म्हणून प्रख्यात झाले.

**प्रपंच्याकडून परमार्थाकडे**

कनकाचे बरे चालले होते. परंतु नंतर मात्र त्यांच्या जीवनात एकामागून एक अशा आघातकारी घटना घडत गेल्या. वडिलांचा मृत्यू तर पूर्वीच झालेला होता. त्यांची गेलेली पाटीलकी पूर्ववत लाभली असली तरी व पूर्वीचे सुखासमाधानाचे आयुष्य परत प्राप्त झाले असले तरी सावलीप्रमाणे साथ देणाऱ्या त्यांच्या माऊलीचे आकस्मिकरित्या निधन झाले. आईच्यानंतर मुलगा आणि प्रेमळ पत्नी यांनाही एकापाठोपाठ एक असे काळाने हिरावून घेतले. कनकावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यात भर म्हणून त्यांना युध्दाला सामोरे जावे लागले. अचानक झालेल्या मुसलमानांच्या आक्रमणाने त्यांना प्रचंड आघात झाला. ते जरी जातीने शूरवीर असले तरी बेसावध असताना झालेल्या हल्ल्यात त्यांना निकराची झुंज देऊनही दारुण पराभव पत्करावा लागला. डोक्याला जबर मार लागल्याने त्यांना बेशुध्दावस्थेत पडून राहावे लागले. 'कनक' मेला आहे असे समजून शत्रूसैन्य निघून गेले. त्यांच्या बेशुध्दावस्थेत कुणीतरी येऊन त्यांची शुश्रुषा केली होती. अनामिकाच्या रुपाने येऊन साक्षात ईश्वराने आपले रक्षण केले आहे असे त्यांना ठामपणे वाटू लागले. जगात आपण एकटे आहोत.

आपल्याला ईश्वराशिवाय कुणीच वाली नाही. याची जाणीव त्यांना तीव्रतेने होऊ लागली. मग संत जनाबाई म्हणतात त्याप्रमाणे-

*'माय मेली बाप मेला ।*
*आता सांभाळी विठ्ठला ।।'*

असे म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली. संसाराविषयीची आसक्ती त्यांच्या मनातून समूळ नष्ट झाली. त्यांना विरक्ती आली. मनाने शाश्वत सुखाचा ध्यास घेतला. आपली सारी मालमत्ता त्यांनी लोकांना वाटून टाकली. अंगावरील नेसूचे धोतर, खांद्यावर घोंगडे, गळ्यात एकतारी, हातात चिपळ्या आणि बगलेत झोळी हे त्यांच्या उर्वरित आयुष्याचे कायमचे सोबती झाले. खूप भटकंती केल्यानंतर "व्यासराय" हे त्यांना गुरु म्हणून लाभले. गुरुंनी त्यांना "रेड्याचा" मंत्र दिला. गुरुंची आज्ञा शिरसावंद्य मानून कनकांनी त्याचा जप सुरु केला. अशा तऱ्हेने त्यांच्या संतत्वरुपी आयुष्याचा खडतर प्रवासाला प्रारंभ झाला.

## शिष्योत्तम म्हणून नावलौकिक

कनकदासांनी त्याकाळी प्रचलित असलेल्या वैष्णव, शैव आणि मध्व मताचा कसून अभ्यास केला. गुरुजनांचे उपदेश ते श्रध्दाभावनेने ऐकत राहिले आणि म्हणूनच देवस्तुती यास प्राधान्य दिल्याजाण्याऱ्या भक्तिविचाराला त्यांनी अल्पावधीतच आपल्या अंकित करुन घेतले. जेव्हा जेव्हां म्हणून गुरुंनी त्यांची परीक्षा घेण्यासाठी म्हणून जटीलात जटील असे प्रश्न विचारुन पाहिले तेव्हा तेंव्हा त्यांनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक अशी उत्तरे देऊन शिष्योत्तम म्हणून ते आदरास पात्र ठरले.

## केळी खाण्याची परीक्षा

एकदा गुरु व्यासरायांनी आपल्या सगळ्या शिष्यांना जवळ बोलावून घेतले आणि आपल्या सोबत आणलेल्या केळी प्रत्येकाला एक एक याप्रमाणे देऊन ते म्हणाले, "जिथे कुणीच नाही अशा एकांतस्थळी जाऊन केळी खा. खाताना तुम्हाला अजिबात कुणीच पाहता कामा नये." गोष्ट तशी साधी होती. शिष्यांना यात कसलीच दिक्कत वाटली नाही. ते गेले आणि आपल्या वाट्याला आलेली केळी निर्जन ठिकाणी खाऊन

टाकली. काही तासांनी ते सारे परत गुरुभोवती जमा झाले. व्यासरायांनी सगळ्यांनी केळी खाल्ली आहे काय? याची खात्री करून घेतली. कनकदासांकडे पाहिले. त्यांच्या हातात केळी तशीच शिल्लक होती. यांनी त्यांच्याकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले आणि म्हणाले, “कनका, सगळ्यांनीच केळी खाल्ली आहेत व ते विजयी मुद्रेने येथे उभे आहेत. तुला एकांत लाभला नाही काय? केळी न खाण्याचे कारण काय?” कनकदास विनम्रभावाने गुरुंना म्हणाले, “गुरुदेव, आपण म्हणता त्याप्रमाणे मला केळी खाण्यासाठी एकांताचे ठिकाण अद्याप भेटले नाही व भेटण्याची शक्यताही नाही. कारण साऱ्या चराचरात ईश्वर व्यापून राहिला आहे. तो मला पाहत असताना केळी खाणे कसे शक्य आहे? म्हणून मी मला दिलेली केळी न खाता ती तशीच परत आणली आहे.” कनकदासाच्या या उत्तराने गुरु व्यासराय आनंदित झाले. प्रस्तुत विषयाला अनुसरुन मार्मिक प्रवचन शिष्यांच्या समोर दिले. जे शिष्य अद्यापही अपरिपक्वच होते.

## ना होदरे होदेनु (‘मी’ गेल्यास जाईन)

एका प्रसन्न समयी गुरु व्यासराय आपल्या शिष्यांसमवेत विविध धार्मिक विषयांवर चर्चा करण्यात व्यस्त होते. अचानक ते गंभीर होऊन एका गहन विषयाकडे वळले. तेथे जमलेल्या शिष्यांना उद्देशून ते म्हणाले, “शिष्यांनो, तुम्हांपैकी कुणाला तरी स्वर्गात जाणे शक्य आहे काय? मला स्वतःला तरी ते शक्य नाही.” गुरुजींच्या या अचानक विचारलेल्या प्रश्नाने शिष्यवर्ग भांबावून गेला. ‘गुरुंनाच स्वर्गात जाणे जिथे अशक्य आहे तिथे आपली काय गत?’ असे वाटून त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी त्यांनी मौनव्रत धारण केले. जटिल वाटणाऱ्या त्या प्रश्नाचे उत्तर कसे व काय द्यावे हे त्यांना कळले नाही. शेवटी दूर अंतरावर बसलेल्या कनकदासांकडे दृष्टिक्षेप टाकून व्यासराय कनकदासांना म्हणाले, “कनका, तुला स्वर्गात जाता येईल काय?” कनकदास विनाविलंब व नम्रपणे गुरुंना म्हणाले, “ना होदरे होदेनु.” (मी गेल्यास जाईन.) कनकदासांचे गुरुजींच्या प्रश्नाला दिलेले हे उत्तर ऐकून आपल्या वर्णश्रेष्ठत्वाचा गर्व बाळगणाऱ्या तमाम शिष्यसमुहाने त्यांच्याकडे

कुत्सित नजरेने पाहत त्यांचा अपमान करण्याचा सपाटा चालविला. 'जिथे प्रत्यक्षात गुरु व्यासरायांना स्वर्गात जाणे अशक्य वाटते तिथे एका सामान्य धनगराला, अस्पृश्याला स्वर्गप्राप्ती कशी शक्य आहे?' असे वाटून त्यांनी त्यांना लबाड व खोटारडा अशी दूषणे देण्यासही कमी केले नाही. एकंदरीत वातावरण गढूळ झाले होते. बोलण्याचा गलका वाढला होता. शिष्यांना वातावरणात शांतता स्थापित करण्याचे आदेश देऊन व्यासरायांनी कनकदासांना त्यांच्या उपरोक्त विधानाचे स्पष्टीकरण करायला सांगितले. कनकदास उभे राहिले आणि म्हणाले, "'मी' याचा अर्थ 'अहंकार'. 'अहंकार' हा स्वर्गप्राप्तीतील प्रमुख अडसर होय. ज्यांनी आपल्यातील अहंकाराला समूळ काढून टाकले आहे. अशा प्रत्येकाला स्वर्गप्राप्तीचा लाभ होणे शक्य आहे." कनकदासांचे स्वर्ग व मोक्षप्राप्तीचे हे स्पष्टीकरण ऐकून व्यासराय संतुष्ट झाले. त्यांच्यावर शिव्याशापांचा भडिमार करणाऱ्या विरोधकांची तोंडे मात्र शरमेने आपोआप खाली झाली. त्यांना स्वतःच्या अज्ञानाची लाज वाटत होती.

### देवदर्शन घडविले

श्री हरीचे साक्षात विष्णूरुपात दर्शन घडवून आणणे शक्य आहे काय? याविषयीची चर्चा व्यासरायांनी सुरु केली. आपल्या शिष्यांना त्यांनी वरील प्रश्न विचारुन पाहिला. नित्याप्रमाणे या प्रश्नाचे उत्तरही कनकदासाशिवाय कुणालाच देणे शक्य नव्हते. ते कनकदासाकडे वळले आणि म्हणाले, "कनका, श्रीहरीचे विष्णूरुपात प्रत्यक्ष दर्शन घडवून आणणे तुला शक्य आहे काय?" कनकदासांनी याचे उत्तर होकारार्थी दिले. 'दुसऱ्या दिवशी सकाळी देवपूजेच्या समयी विष्णूदर्शन सगळ्यांना लाभेल.' याची शाश्वतीही त्यांनी देऊन टाकली. दुसऱ्या दिवसाची सकाळ कधी उजाडेल आणि विष्णूचे प्रत्यक्ष दर्शन कधी घडेल याची उत्सुकता तेथील शिष्यगणांना लागून राहिली. दुसऱ्या दिवसाची सकाळ झाली. नित्याप्रमाणे पूजेला प्रारंभ होताच एक कुत्रे धावत पूजास्थानी आले. तेव्हा 'हाच तो श्रीहरीरुपी विष्णू' असे कनकदास सांगत राहिले. लोकांना त्यांचे म्हणणे पटले नाही त्यांच्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष करुन लोकांनी कुत्र्याला लाठ्या-काठ्यांनी आणि दगड-गोट्यांनी मारुन

पिटाळून लावले. कुत्र्याला बसलेला जबर मार पाहून कनकदास कळवळून गेले. त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. साऱ्या प्राणीमात्रात ईश्वराचा अंश आहे असे ओरडून सांगूनही तेथील लोकांना पटले नव्हते. या प्रसंगाने कनकदासांना खूप मनस्ताप सहन करावा लागला. कुत्र्याच्या, जीवजंतूंच्या ठिकाणी ईश्वर पाहणे हा विचार कितीतरी महान आहे, उदात्त आहे. परंतु सामान्य जणांना तो पटण्यासारखा नव्हता. गुरु व्यासराय मात्र अंतर्मुख झाले होते. कनकदासांच्या सखोल ज्ञानाची प्रचिती त्यांना आली होती.

एकामागून एक घेतलेल्या सगळ्याच परीक्षांत कनकदास उत्तीर्ण झाले होते. आता त्यांना गुरुची आवश्यकता उरलेली नव्हती. त्यांचे व्यक्तीमत्व आता 'स्वंयभू' झाले होते. त्यांनी आपले सारे आयुष्य ईशसेवा आणि लोकसेवा यासाठी समर्पित करायचे ठरविले.

**प्राणीहत्येला विरोध**

संतश्रेष्ठ म्हणून कनकदासांची ख्याती सगळीकडे पसरली होती. त्यांचा ज्या समाजात जन्म झाला, त्या समाजातील लोकांना कनकदासाविषयी अभिमान वाटणे साहजिकच होते. आपल्या समाजातील या महापुरुषाला गावच्या यात्रेला बोलावून न्यावे, त्यांच्याकडून भक्तीमार्ग समजून घ्यावा अशी त्यांची इच्छा झाली. त्यांनी कनकदासांच्या वास्तव्याचा शोध घेतला. त्यांना प्रत्यक्ष भेटून गावच्या जत्रेला येण्याविषयी विनंती केली. लोकांच्या विनंतीला होकार देऊन कनकदास यात्रेला गेले. यात्रेत देवाच्या नावाचे बकरे, कोंबडे, रेडा अशांसारख्या अनेक निष्पाप प्राण्यांचा बळी देण्याचा प्रघात होता. तेथील अडाणी जनता धर्माच्या नावाखाली होणाऱ्या अशा हिंसाचारालाच देवपूजा आणि धर्म समजून त्याचे निष्ठेने आणि भक्तिभावाने पालन करत होती. कनकदासांनी पूर्वापार चालत आलेल्या या अमानवीय, क्रूर आणि रानटी प्रकाराचा निषेध नोंदविताना म्हटले आहे–

*'हरिहर पूजेगळु हरगणवादवु*
*उरि मारि चामुंडी शक्तिगळीगे*
*कुरि कोण नैवेद्य धूप दीप गळिंद*
*परम भक्तिय सलिसि पूजिसुरवय्या'*

'ईश्वर हा सर्वव्यापी आहे. सारे जीवजंतू त्याची विविध रूपे आहेत. तो प्रत्येकाच्या देहात सामावलेला असून देह ईश्वराचाच अंश आहे.' अशाप्रकारचा धर्मोपदेशही ते लोकांना देतात. जीवात्मा आणि परमात्मा यांना एकत्रित पाहण्याचा त्यांचा विचार त्यांच्या विशाल मनोभावाची साक्ष देणारा आहे. 'तीर्थयात्रा करु नका सत्यवंतांचा सहवास करा. ज्ञानी व्हा, त्यानेच चिंता नष्ट होते.' असे सांगताना त्यांची कविता सुंदर लेणे बनून अवतरते.

*'सत्यवंतर संगविरलु तीर्थव्यातके*
*नित्य ज्ञानीयाद मेले चिंते यातके'*

संत कनकदासांच्या उपरोक्त काव्यपंक्ती समाज धारणेच्या संदर्भात निश्चितच उपकारक ठरणाऱ्या आहेत. नीतिपाठ शिकविणाऱ्या या काव्यपंक्ती वाचकांच्या मनावर प्रभाव पाडून जातात.

**जातिभेदाचे खंडन**

संत कनकदास जातीने कुरुब, अस्पृश्य होते. खालच्या जातीत जन्मल्याने त्यांना जातीवादाचे विषाक्त अनुभव वेळोवेळी येत गेले. पदोपदी त्यांचा अपमान करण्यात आला होता. जाति वादाच्या नावाने आपल्या वाट्याला आलेले भोग इतरांना येऊ नये, समाजातील जातिश्रेष्ठत्वाच्या नावाने होणारे छळ थांबावेत असे त्यांना वाटले नाही तर. नवल! म्हणून जातिवादाचे खंडन करताना समतेच्या पुरस्काराचा क्रांतीकारी संदेश उत्स्फूर्तपणे त्यांच्या कवितेतून प्रकट होतो तो असा-

*'कुलकुल कुलवेंदु होडेदाडदिरि निम्म*
*कुलद नेलेयनेनादरू बल्लिरा*
*हुट्टिद योनिगळिल्ल मेट्टद भूमिगळिल्ल*
*अट्ट उण्णद वस्तुगळिल्लवो*
*गुट्ट काणिसे बंतु हिरिदेनु किरिदेनु*
*नेट्टने सर्वज्ञन नेने कंढय मनुज*
*जलवे सकल कुलक्के तायीयल्लवे आ*

*जलद कुलवेनेनादरू बल्लिरा*
*जलद बोब्बुळियंते स्थिरवल्ल ई देह*
*नेलेयनरितु नी हरिय नेने मनुज'*

'अनेकानेक योनीतून जन्म घेऊन सारेच या धरतीवर जगत असतात. पाणी साऱ्या प्राणीमात्रांची जननी आहे. पाण्याला जात नसते. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे मानवी शरीर क्षणभंगूर आहे. नाशिवंत आहे. हे माणसा! याची जाणीव ठेवून हरीचे स्मरण कर. जातिश्रेष्ठत्वाचा मुद्दा घेऊन विनाकारण कशाला भांडतोस? जातिश्रेष्ठत्व निराधार आहे. कुलाचार अनाचार होता कामा नये.' लौकिक जीवन ठाकठीक ठेवायला सांगून त्याच्या वास्तवतेचे भान आणून देणाऱ्या वरील काव्यपंक्ती अलौकिक जीवनाचे महत्व तितक्याच प्रभावीपणे सांगून जातात.

संत कनकदास आपल्या गीतांतून जातिवादाचे खंडणच करीत नाहीत तर त्यांचा मूळ पाया उद्ध्वस्त करताना त्यातील फोलपणाही दाखवून देतात. जातियतेचे समर्थन करणाऱ्यांना एक आव्हान बनून त्यांची गीतरचना कशी धारदार बनते हे पुढील ओळींवरुन लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

*'कुलकुल कुलवेन्नुतिहरु*
*कुलवावुदु सत्य सुजनरिगे*

*आत्म याव कुल जीव याव कुल*
*तत्वेंद्रियगळ कुल पेळिरय्या*
*आत्मनु कागिनेले यादि केशव नोलिद*
*भक्तरिगे कुलवावुदु हेळिरय्या'*

ईश्वरासमोर सारे समान आहेत. आत्मा, जीव आणि तत्वेंद्रिय याची जात कुणालाच सांगता येत नाही. ज्याला ईश्वरकृपा प्राप्त झाली आहे अशा भक्तांची जात सांगता येत नाही. 'सत्य' आणि 'सूजनास' जात नसते. जातिवादाला विरोध दर्शविणारा उपरोक्त विचार क्रांतिकारी म्हणावा लागेल.

संत कनकदास केवळ माणसामाणसांत अस्तित्वात असलेल्या जातिभेदावरच सवाल करीत नाहीत तर ते आपल्याला दर्शन न देणाऱ्या देवालाही ठणकवतात. लवकर दर्शन देण्याविषयी श्रीकृष्णाला हाक मारतात ती अशी–

*‘बागिलनु तेरेदु सेवेयनु कोडु हरिये*
*कूगिदरु ध्वनि केळलिल्लवेनरहरिये’*

उडपीच्या श्रीकृष्णाचे दर्शन त्यांना अशक्य झाले होते. अस्पृश्य म्हणून त्यांना तेथील बडव्यांनी मंदिरात जाण्यास मज्जाव केला होता. मंदिराचे दरवाजे बंद करून घेतले होते. देवाला डोळे भरुन पाहण्यासाठी उतावीळ झालेल्या एका अगतिक मनाचा उद्‌गार येथे पाहण्यास मिळतो. या त्यांच्या मनाची अगतिकता ही केवळ अगतिकता नसून परिवर्तनाच्या विचाराची क्रांतीप्रनवताही आहे हे ही इथे अगत्याने सूचित करावेसे वाटते.

समाजातून जातिश्रेष्ठत्व नष्ट व्हावे, असे जरी कनकदास म्हणत असले तरी माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावर नसून कर्मावरुनच ठरावे असे त्यांचे मत होते. म्हणून ते आपली जात लपवून न ठेवता तिचा जाहीरपणे उल्लेख करताना म्हणतात–

*‘नावु कुरुबरु नम्म देवरु बीरय्या*
*काव नम्मज्ज नरकुरिय हिंडुगळ’*

‘आम्ही जातीचे धनगर असून आमचे दैवत बिरय्या आहे. काव आमचे आजोबा. शेळ्या-मेंढरांच्या झुंडीसह आम्ही असतो.’ असा जातीचा उल्लेख करणारी व अध्यात्माचे वलय प्राप्त झालेली ही अभंग रचना वृत्तिश्रेष्ठत्वाचे समर्थन करण्यासाठी म्हणून सहाय्यभूत ठरावी.

संत कनकदास यांची गीतरचना विषय, आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने विविध अंगाने बहरलेली आहे. ती सरळ, सोपी आणि सामान्यजनास कळण्यास सुलभ आहे. सालंकृत व प्रकांडपांडित्याचा सोस तिला नसून ती ग्रामीण लोकजीवनाभिमुख आहे.

गेयता हा तिचा स्थायीभाव आहे. मोहन तरंगिणी, नळचरित्र, रामधान्य चरित्र, हरिभक्तिसार, ही त्यांची उपलब्ध साहित्य संपदा.

***

## शब्दार्थ

व्यतीत-कष्टी होणे, साकडे घालणे-फलप्राप्तीसाठी निवेदनकरणे, कायक-चरितार्थ, सत्कारणी-जीवनधर्म, (चांगल्या कामासाठी), कनक-सोने, आघात-संकट, दिक्कत-अडचण, गहन-गुपित, कुत्सित-वाईट, विषाक्त-विषानुभव, सालंकृत-अलंकारानी मढवलेले.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) शरण आणि दास परंपरेनी लोकांना काय शिकविले?
२) दास परंपरेतील आद्यकवी म्हणून कोणाचा उल्लेख करावा लागेल?
३) संत कनकदासांचा जन्म केंव्हा व कुठे झाला?
४) संत कनकदासांच्या आईवडिलांचे नांव काय?
५) संत कनकदासाचे मूळ नांव काय होते?
६) संत कनकदासाचे घराणे कसे होते?
७) संत कनकदासावर दुःखाचा डोंगर कशामुळे कोसळला?
८) संत कनकदासाचे वडील काय म्हणून ओळखले जातात?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** संत कनकदासाचे अंगी कोणकोणते गुण दिसून येतात?
२) संत कनकदासानी प्राणी हत्या कशाप्रकारे थांबविली?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** “श्री हरीचे साक्षात विष्णूरुपात दर्शन घडवून आणणे शक्य आहे काय?”
२) “सत्य आणि सुजनास’ जात नसते.”

**ई) टिपा लिहा.**

१) केळीखाण्याची परीक्षा
२) ना होदरे होदेनु : (‘मी’ गेल्यास जाईन)

***

# ९. जेंव्हा आपलाच इतिहास आपण विसरतो आहोत... सुधा मुर्ती

**अनुवादक : (लीना सोहनी)**

**परिचयः सुधा मूर्ती** (१९५०) यांचा जन्म कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील शिग्गाव येथे झाला. यांनी कॅाम्प्युटर सायन्स याविषयांतील एम. टेक ही पदवी प्राप्त केली असून त्या सध्या 'इन्फोसिस फाऊंडेशन' च्या अध्यक्षा आहेत. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या त्या प्रणेत्या आहेत. १९ नोव्हेंबर २००४ मध्ये राजलक्ष्मी पुरस्कार मिळाला. २००६ मध्ये भारत सरकारतर्फे सन्माननीय 'पद्मश्री' पूरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यांना सहा डॅाक्टरेटस् मिळाल्या आहेत. यांच्या सात कादंबऱ्या, चार तंत्रज्ञानविषयक पुस्तकें आणि तीन प्रवासवर्णने ही त्यांची सर्व साहित्य निर्मिती कन्नड भाषेत आहे. 'द न्यू संडे एक्सप्रेस' या इंग्रजी वृत्तपत्रातून 'द वीक' या साप्ताहिकातून त्यांनी वेळोवेळी आपले अनुभव लेखरुपाने मांडले. त्यांचे 'वाईज ॲन्ड अदरवाईज' या शीर्षकाने इंग्रजी भाषेतील पुस्तक तयार केले. याच शीर्षकाने ते मराठी भाषेत अनुवादित झाले. (२००३) हा अनुवाद 'लीना सोहनी' यांनी केली आहे.

आपलांच इतिहास आपण विसरतो आहोत...या उताऱ्यात आपल्या देशात हुतात्म्यांची आणि थोर देशभक्तांची मोठी परंपरा आहे. आपली मान आदराने झुकून जावी असा आपला इतिहास आहे. त्यांच्या जीवनकहाण्या आपल्याला स्फूर्तिदायक ठराव्या. अशाच आहेत. पण आजच्या तरुण

**पिढीला या थोर महात्म्यांविषयी किती माहिती आहे असे दोन बहिण व बंधूंच्या प्रवासातून लेखिकेच्या अनुभवास आले की, आपलाच इतिहास आपण विसरतो आहोत...असं वाटतं.**

---

आपल्या देशाला हुतात्म्यांची आणि थोर देशभक्तांची मोठी परंपरा आहे. आपली मान आदराने झुकून जावी असा आपला इतिहास आहे. त्यांच्या जीवनकहाण्या आपल्याला स्फूर्तिदायक ठराव्या. अशाच आहेत. पण आजच्या तरुण पिढीला या थोर महात्म्यांविषयी किती माहिती आहे?

आपल्या देशातील हुतात्मापद पत्करलेल्या स्त्रियांच्या कहाण्या तर अधिकच स्फूर्तिदायी आहेत. त्यांच्यातील अनेक स्त्रिया रुढार्थाने अशिक्षित म्हणाव्या लागतील पण आपल्या शत्रूंसमोर सर्व सामर्थ्यानिशी उभ्या ठाकण्याचं आणि आपल्या देशासाठी लढण्याचं असामान्य धैर्य त्यांच्या अंगी होतं. चित्रदुर्ग जिल्ह्यातील ओबव्वा, उत्तर कर्नाटकातील कित्तूर चन्नम्मा, बेळगांव जिल्ह्यातील बेलवडी माअम्मा-यादी खूप मोठी आहे. ओबव्वाजवळ एक तांदूळ सडायचं मुसळ सोडलं तर आपल्या शत्रूंचा सामना करण्यासाठी दुसरं तिसरं कांही हत्त्यार नव्हतं. पण आजच्या तरुणांपैकी किती जणांनी तिच्याविषयी ऐकलं आहे.

भारताच्या इतिहासात ज्या काही नायिका, थोर स्त्रिया होऊन गेल्या, त्यांमध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई हिचं नाव अग्रभागी तळपतं. एक तरुण निपुत्रिक विधवा. तिनं ब्रिटिशांच्या महासत्तेला आव्हान दिलं. तिचं धैर्य इतकं अतुलनीय होतं, की तिच्या शत्रूलासुध्दा तिच्याविषयी आदर वाटला तिच्याविषयी कितीतरी काव्यं लिहिली गेली. तिच्या साहसाचं वर्णन किती सार्थ शब्दांत केलं जातं. तिच्या संपूर्ण सैन्यामध्ये खरा 'मर्द' कोण असेल तर फक्त तीच होती. आपल्या आजच्या किती तरुणांना तिच्याविषयी माहिती आहे?

नुकताच मला भोपाळतर्फे 'ओजस्विनी' पुरस्कार देण्यात आला. हा समारंभ दिल्लीमध्ये संपन्न झाला. त्या पुरस्कारामध्ये एका सुंदर

स्मृतिचिन्हाचा समावेश होता. हातात तळपती तलवार घेऊन घोड्यावर स्वार झालेल्या झाशीची राणी लक्ष्मीबाई हिची ती नितांत सुंदर प्रतिकृती होती.

मी विमानानं बेंगलोरला परतले. झाशीच्या राणीचा तो पुतळा असलेलं मोठं खोकं मी हँड बॅगेज म्हणून हातात धरलं होतं. कारण मी जर माझ्या इतर सामानाबरोबर ते पाठवलं तर तो पुतळा भंग पावेल अशी मला भीती वाटत होती.

दिल्ली विमानतळावरील सुरक्षा अधिकाऱ्यांना मी ही गोष्ट समजावून सांगितल्यावर ते माझ्याशी सज्जनपणे वागले. त्यांनी मेटल डिटेक्टरच्या साहाय्याने त्या पुतळ्याची तपासणी केली व तो मला विमानात घेऊन जाण्याची परवानगी दिली.

जेट एअरवेजचे कर्मचारीपण खूप चांगले वागले. मी इकॉनॉमी क्लासने चालले होते. तो एवढा मोठा पुतळा मला मांडीवर धरून बसणंही शक्य नव्हते. आणि तो पायापाशी ठेवणं बरं वाटत नव्हतं. अर्थात डोक्यावरील सामान ठेवायच्या कप्प्यात तो बसला असता. पण एअर होस्टेसने तो माझ्याकडून घेतला आणि एक्झिक्यूटिव्ह क्लासमधील एका रिकाम्या आसनांवर नेऊन ठेवला. मर्दानी राणी लक्ष्मीबाईच्या इतमामाला साजेशी वागणूक तिला मिळाली.

सर्वांनी मला इतकी मदत केली. मी आता जरा आरामात स्थिरस्थावर होऊन बसले. मग जरा इकडेतिकडे लक्ष गेलं. माझ्या आजूबाजूचे प्रवासी हे जे काही इतका वेळ चाललं होतं, त्यामुळे जरा कुतुहलाने माझ्याकडे पाहात होते. विमानानं आकाशात झेप घेतली. अजूनही लोक माझ्याकडे वळून बघतच होते. पण कुणी आपण होऊन काही बोललं वगैरे नाही.

'संभाषण' या विषयाबद्दल माझा स्वतःचा एक सिध्दांत आहे. पाहिजे तर त्याला आपण फॉर्म्युला म्हणूया. जर आपण किती बोलतो याचा विचार केला तर मला वाटतं ते माणसाच्या आर्थिक परिस्थितीच्या बरोबर विरुध्द प्रमाणात, असं म्हणावं लागेल. म्हणजे असं, की आपण

जर बसनं प्रवास करत असलो, तर आपले सहप्रवासी लगेच, काही आडपडदा न ठेवता मोकळेपणानं आपल्याशी बोलायला सुरुवात करतात. तेच जर आपण रेल्वेच्या फर्स्ट क्लासमधून प्रवास करत असलो, तर लोक जरा परकेपणाने वागतात. विमानप्रवासात तर सहप्रवाशानं आपण होऊन बोलण्याची शक्यता जवळजवळ नसतेच. आणि जर आपण आंतरराष्ट्रीय फ्लाईटने, तेही फर्स्ट क्लासने प्रवास करत असलो, तर आपला सहप्रवासी चोवीस तासांत एखादा शब्दसुध्दा आपल्याशी बोलत नाही.

या दिल्ली-बंगलोर फ्लाईटमधे माझ्या शेजारी विशीच्या आतील दोन तरूण मुलं होती.- एक मुलगा आणि एक मुलगी. त्यांच्या अंगात उंची, महागड्या जीन्स होत्या. दोघांचेही केस इतके बारीक कापलेले होते, की दोन्ही मुलं सारखीच दिसत होती. दोघांच्यात एवढाच फरक होता की त्या मुलीचे कान टोचलेले होते. दोघे च्युईंग गम खात, एम.पी.थ्री. प्लेअरवर संगीत ऐकत स्वतःच्या नादात बसले होते. दोघे चांगले बड्या घरचे होते, हे तर उघडच होतं. त्यांची संभाषण करण्याची मुळीच इच्छा नव्हती हेही दिसतच होतं. इतरांबरोबर बोलणं तर बाजूलाच राहो, ते एकमेकांशीसुध्दा बोलत नव्हते. संगीत आणि च्युईंग गम या दोन्ही गोष्टी एकत्र आल्या की असंच होतं.

थोड्या वेळानं मीच या शांततेचा भंग करून त्या मुलांशी बोलायचं ठरवलं. मी स्वतः कॉलेजात शिकवते त्यामुळे तरूण मुलांशी बोलताना मला मोकळेपणा वाटतो. मला त्यांच्याशी बोलायला आवडतं. त्या वयात ही मुलं सहसा धूर्त किंवा कावेबाज नसतात. ती उत्साहानं सळसळणारी, जराशी मुक्त असतात आणि त्यांचे विचारही ताजे, टवटवीत असतात.

आधी मी उगीच इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. दोघेही बंगलोरच्याच एका कॉलेजात शिकत होते. तो मुलगा व ती मुलगी चुलत भावंडं होती. व दिल्लीला आपल्या आजीआजोबांना भेटून आता परत चालली होती.

त्या मुलीनं जरा चाचरत विचारलं. 'तुमच्याकडे तो काळ्या घोडयावर स्वार झालेल्या बाईचा पुतळा आहे ना? छान खेळणं आहे. ते बंगलोरला मिळत नाही का? तुम्हाला ते जवळ बाळगायला इतका त्रास होतोय, मग तरी ते तुम्ही काही खास कारणाने स्वतः घेऊन चाललाय का?'

'ते खेळणं नाहीय. तो पुरस्कार आहे.' मी तिला सांगितलं.

आता तो तरुण मुलगा उत्सुकतेनं विचारु लागला. 'तुम्हाला घोड्यांची खूप आवड आहे, वाटत?'

मी माझ्या आजवरच्या आयुष्यात कधीच घोडयाची रेस पाहायला गेलेली नाही. मला ते ऐकून फार विचित्र वाटलं. संध्याकाळची फ्लाईट असल्यानं अंधार होता म्हणून त्या मुलांना माझ्या चेहऱ्यावरचे भाव दिसले नाहीत.

त्या मुलानं विचारलं, 'हे घोड्यांच्या रेसबद्दल ॲवॉर्ड मिळालं आहे का? त्या सुंदर घोड्यावर एक बाई बसली आहे.'

त्या मुलांना माझा पुरस्कार पाहून फक्त रेसची आणि घोड्यांची आठवण झाली हे मला कळून चुकलं. त्या घोड्यावर आरुढ झालेली स्त्री कोण होती हे त्यांना मुळीच समजलं नव्हतं. आपण सांगाव का त्यांना?

'तुम्ही जरा तिकडे जाऊन तो पुतळा नीट निरखून बघा, आणि जरा विचार करुन तुम्हांला काय वाटतं, ते सांगा...चालेल?' मी म्हणाले.

'आम्ही तो पुतळा नीट निरखून पाहिलाय. म्हणूनच तर आम्ही तुम्हाला ते विचारल'. मुलं म्हणाली.

आता मात्र मला धक्का बसला. मी स्वतः एक शिक्षिका असल्यामुळे, आता या मुलांना झाशीची राणी लक्ष्मीबाई हिच्याविषयी सांगणं माझं कर्तव्य आहे. असं मला वाटलं. (मला प्रत्येक तरुण मुलगा

किंवा मुलगी हा एक विद्यार्थी वाटतो आणि त्याला ज्ञानदान करण्याची एकही संधी मी सोडत नाही, असं माझ्या मुलाचं मत आहे, व त्यावरुन तो मला नेहमी चिडवत असतो.)

'तुम्ही पहिल्या स्वातंत्र्यसमराविषयी काही ऐकलं आहे का?' मी त्या मुलांना विचारलं.

'हों, १९४२ साली झालं ते.' तो मुलगा म्हणाला.

त्यावर त्या मुलीने पुष्टी जोडली. हो ना. आम्ही तो सिनेमा पाहिलाय ना. '१९४२ अ लव्ह स्टोरी भारतीय आणि ब्रिटीश यांच्यातील युध्द. त्यात मनीषा कोईराला काय सुंदर दिसते!'

'नाही, नाही ती तर छोडो भारत चळवळ होती, पहिलं भारतीय स्वातंत्र्य समर तत्पूर्वी जवळ जवळ शंभर वर्ष आधी लढलं गेलं. आणि त्यात आपण हरलो.'

त्यावर ती मुलं काहीच बोलली नाहीत.

'१८५७ मध्ये भारतात इंग्रजांच्या विरोधात एक संग्राम झाला. तरुण राणी, झाशीची राणी लक्ष्मीबाई त्या वेळी ब्रिटीशांविरुध्द लढली. तिनं आपल्या सेनेचं नेतृत्व केले. खरं तर तिला गप्प बसून, ब्रिटिशांकडून तनखा स्वीकारुन ऐषारामात आयुष्य घालवता आलं असतं. पण तिनं तसं केलं नाही. कारण ती प्रखर देशभक्त होती. असामान्य धैर्यानं ती युध्दात लढली व रणांगणावरील तिचं हे युध्दकौशल्य पाहून तिच्या शत्रूलाही विस्मय वाटल्यावाचून राहिला नाही. तेव्हापासून तिला धैर्याचं प्रतीक मानतात व भारतीय जनतेच्या स्वातंत्र पूर्ण स्वरुप मानतात. आपणा सर्वांना स्वतंत्र भारतात जगता यावं म्हणून तिनं मरण पत्करलं.'

दोन्ही मुलं एक अक्षरही न बोलता गप्पपणे माझं बोलणं ऐकत होती, आणि च्युईंग गम न चघळता.

****

## शब्दार्थ

स्मृती-आठवण, स्मरण, युध्दकौशल्य- रणनिती, समर-युध्द, भंग पावणे- नष्ट होणे, तनखा-पगार, अतुलनीय-तुलना न करणे, रेस-शर्यत, पुष्टी जोडणे-दुजोरा देणे, ओजस्विनी-तेजस्वीपणा-बलाढ्यता.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) आपल्या देशाला कोणती मोठी परंपरा आहे?
२) कोणाच्या जीवन कहाण्या आपल्याला स्फूर्तिदायक ठरतात?
३) लेखिकेला भोपाळ तर्फे कोणता पुरस्कार देण्यात आला?
४) त्या पुरस्काराचे सुंदर स्मृतिचिन्ह कोणते?
५) दिल्ली-बेंगलोर विमानामध्ये लेखिकेच्या शेजारी कोण बसले होते?
६) एक मुलगा व मुलगी काय खात बसले होते?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** आपल्या देशातील स्फुर्तीदायी स्त्रियांचा परिचय द्या.
२) लेखिकेला कोणकोणते पुरस्कार देण्यात आले व त्या स्मृतीचिन्हांचा इतिहास लेखिकेने दोन मुलांना कसा सांगितला?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "तिच्या संपूर्ण सैन्यामध्ये खरा 'मर्द' कोण असेल तर फक्त तीच होती आपल्या आजच्या किती तरुणांना तिच्या विषयी माहिती आहे."
२) " 'ते खेळणं नाहीये' तो पुरस्कार आहे. मी तिला सांगितलं."
३) "तुम्ही जरा तिकडे जाऊन तो पुतळा नीट निरखून बघा, आणि जरा विचार करुन तुम्हाला काय वाटतं ते सांगा...चालेल? मी म्हणाले."

**ई) टिपा लिहा.**

१) भारतीय इतिहासातील थोर स्त्रियांचे महात्म्य
२) लेखिका सुधा मूर्तीची शैक्षणिक गगन भरारी.
३) आजच्या काळातील तरुण मुलांचा विचार.

**उ) उपक्रम**

आपल्या देशातील वीर स्त्रियांच्या कहाण्या मिळवून वाचा.

***

**(केवळ पुस्तके वाचून ढिगभर ज्ञान साठवणे म्हणजे विद्या नव्हे.
ते ज्ञान जीवनात उतरविणे म्हणजे खरी विद्या-डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्)**

# १०. वीरमाता जिजाऊ

## प्रा.अशोक राणा

**परिचयः** प्रा. अशोक राणा (१९५५) अमरावती येथे सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अमरावती येथे तर महाविद्यालयीन शिक्षण विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे झाले. तीन वर्षे माध्यमिक शाळेवर अध्यापनाचे कार्य, अबोलचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे २२ वर्षापासून अध्यापन करत आहेत. ऐतिहासिक, राजकिय, धार्मिक, शैक्षणिक व वैचारीक विषयांवर सतत लेखन. त्यांच्या अनेक प्रसिध्द ग्रंथातून थोरांच्या ओळखी करुन देण्याचा महत्वाचा हातखंडा आहे.

प्रस्तुत उतारा 'स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता जिजाऊ' या पुस्तकातून जिजाऊंचा अल्पसा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून त्यांचा जन्म, बालपण आणि विवाह व सासर हा वेचा निवडण्यात आला आहे.

---

### जिजाऊंचा जन्म व बालपण

लखुजी जाधवराव यश व समृध्दीच्या शिखरावर विराजमान झाले असतानाही आपल्याला मुलगी नाही ही खंत त्यांना होतीच. लाखांचा पोशिंदा असलेल्या आपल्या राजाच्या या दुःखात सिंदखेडची प्रजाही सहभागी होती पण या साऱ्यांना यातून दूर करणारा आनंदाचा क्षण लवकरच आला. म्हाळसाबाईच्या पोटी एक सुंदर मुलगी जन्माला आली. तो दिवस होता १२ जानेवारी १५९८ व वेळ होती सूर्योदयाची, सकाळी सहा वाजताची. जाधवरावांच्या पदरी असलेले रामसिंग व बजरंग भाट यांनी जिजाऊ जन्माचे असे रसभरीत वर्णन केलेले आहे. "लखोजीरावांना मुलगी व्हावी म्हणोनी म्हाळसा राणीने बहु केले नवस, जगदंबेकृपेने झाली मुलगी म्हाळसा राणीला तीच जिजामाता प्रसिध्द

सर्वाला. फसली सन १००७ ला पौष पौर्णिमा सूर्योदयाला राणी म्हाळसा महालाला चौकाचे नैऋत्य कोणाला. प्रसुदी खोलीला. राणी झाली प्रसूद. दिला जन्म मुलीला. मुलगी जन्मताच कशी भासली. जशी वीज चमकली. आश्चर्य वाटले सर्वाला. आनंदोत्सव सुरु झाला. बोलावले मुळे गुरुजीला. मोठमोठे शास्त्री ज्योतिषी ब्राह्मणाला. शास्त्री गंगाधराने कुंडली केली. भविष्य सांगितले सर्वाना. राजे लखुजी पोटी मातापूर तुळजापूर जगदंबा आली. तुमचे कूळ धन्य झाले. इचे पोटी पुढे शंकर घेतील अवतार ऐकूण सर्व आनंदले. राजाने ब्राह्मण अनुष्ठानी बसविले. महाली मंत्रघोष चालू झाले. भाटबंदी गर्जू लागले. हत्ती, गोडे, बाजे मिरवणूक निघाली गावात. साखरपान वाटी फिरुन आली महालात."

भाटांनी केलेल्या या कवनांमधून जिजाऊंच्या जन्माचा आनंद तर व्यक्त झाला आहेच. त्याशिवाय जन्मस्थळ व जन्मदिनांक विषयीही विश्वासार्ह असा तपशील नोंदविला गेला आहे. बखरीतील वर्णनाचा बाज घेऊन अद्‌भूताचे आकर्षण निर्माण करणारी भाटांची वर्णनशैली ऐतिहासिकदृष्ट्या बिनकामाची ठरली तरी, तीमधून पाझरणारे तत्कालीन वास्तव मात्र ऐतिहासिक तथ्यांच्या जवळ जाण्यास मदत करते. जाधवांच्या भाटांनी सिंदखेडच्या व्यक्तींची केलेली वर्णने व दिलेला वास्तुंविषयीचा तपशील हा जिजाऊंच्या जन्माचा खराखुरा इतिहास सांगणारा आहे. फसली शकावरुन भारतीय कालमापनाविषयीचा निर्णय घेणे सहज शक्य होते. त्यानुसार १२ जानेवारी १५९८ रोजी श्रीनृपशालिवाहन शके १५१९ हेमलंबी नाम संवत्सर, पौष शुध्द पौर्णिमा, गुरुवार रोज व पुष्य नक्षत्रावर जिजाऊंचा जन्म झाला हे स्पष्ट होते. त्यांच्या जन्मामुळे सारी सिंदखेड नगरी हरखून गेली होती. राजदरबाराकडून हत्ती-घोड्यांवरुन गावभर साखर वाटली गेली होती. लखुजीराजांनी या आनंदात नगरभोजन दिले. सिंदखेडच्या काजी घराण्यातील नझीरउल हसन काजी यांच्या बंधूकडे एक अत्यंत जीर्ण अवस्थेतील फारशी लिपीतील अत्यंत जुना कागद मिळाला आहे. त्यात जिजामाता जन्माचे वेळी लखुजी राजांनी नगरभोजन दिल्याचा उल्लेख आढळतो. दिवाळीचा सण नुकताच आटोपला होता. व त्यादिवशी थंडी खूप होती. तरीही सिंदखेडवासियांनी पुन्हा दिपोत्सव साजरा केला. घरोघरी दिव्यांच्या पणत्या पेटविल्या गेल्या. भारताच्या इतिहासाला

कलाटणी देऊन पारतंत्र्याचा अंधार दूर करणाऱ्या वीरमातेच्या जन्माचा सोहळा अशारीतीने सूचकपणे पार पडला.

लखूजींच्या अंगाखाद्यांवर खेळीत त्यांच्या शौर्याच्या कहाण्या ऐकीत जिजाऊंचे बालपण मजेत गेले. जिजाऊंची आई म्हाळसाबाई फलटणच्या निंबाळकर पवार घराण्यातील होती. अत्यंत धोरणी, मुत्सद्दी, स्वाभिमानी व धाडसी स्त्री अशी तिच्याबद्दलची माहिती उपलब्ध आहे. आपल्या माहेरच्या माणसाचे पराक्रम व शौर्य तिने जवळून पाहिले होते. त्याचप्रमाणे शूर-वीरांची खाण असलेल्या जाधव घराण्याशी तिचे नाते होते. या दोनही घराण्यांच्या पराक्रमाच्या कहाण्या सांगून तिने बालजिजाऊंचे संस्कारक्षम मन घडविले. लाडाकौतुकासोबतच शौर्याचे संस्कार त्यांनी जिजाऊंवर केले. सोबतच राजघराण्यातील प्रथेप्रमाणे अक्षर ओळखही करवून दिली. यादव घराण्याचा गौरवशाली इतिहास म्हणजे महाराष्ट्रातील शालीवाहन, शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकुट व विजयनगरच्या हिंदुसाम्राजाचाही इतिहास होय. उत्तरेकडील लढाऊ राजपूतांचा पराक्रम म्हाळसाबाईंनी जिजाऊंना सांगितला असावा. मराठयानी गाजविलेले पराक्रम व पचविलेले अपयश या दोन्हींची सांगड घालून परकीय मुस्लिम राजवटीच्या विश्वासघातकी प्रवृत्तीला शह देण्याचा संदेश त्यांच्या या संस्कारातून जिजाऊंच्या कोवळ्या मनावर कोरला गेला असणार. आपल्या मुलांप्रमाणेच जिजाऊंना देखील त्यांनी घोड्यावर बसणे, तलवार चालविणे, प्रतिपक्षावर हल्ला करणे इ. युध्दशास्त्रातील शिक्षणही दिले असावे.

लखुजी जाधवरावांचा वैभव संपन्न वाडा, अवतीभोवती वावरणाऱ्या नोकर चाकरांचा सरंजाम, घोड्यांचा पागा, हत्तीखाने, शिपायांच्या चित्तथरारक कवायती, विविध शस्त्रांची प्रात्यक्षिके, संगीतशाळा, नगारखाना इ. गोष्टी जिजाऊंच्या बालमनावर निश्चीतच संस्कार करणाऱ्या ठरल्या. राजवाड्यात येणाऱ्या मुत्सद्दी व पराक्रमी लोकांची वर्दळ, लढायांचे डावपेच, यशापयशाची चर्चा, जनतेची गाऱ्हाणी न्यायबुध्दीने सोडविण्याची लखुजींची हातोटी इ. बाबींनीही जिजाऊंचे बालमन पुरेसे परिपक्व झाले असावे. लखुजींच्या पदरी असलेल्या पंडीतांचे पांडित्य जिजाऊंना स्तिमीत करणारे ठरले असावे. त्यातून त्यांच्या मनात ज्ञानाची ज्योत तेवली असणार. जाधवरावांच्या पदरी

असलेले गोसावीनंदन हे एक श्रेष्ठ दर्जाचे कवी होते. यवतमाळ येथील दिवंगत द.बा.महाजन यांच्याकडे त्यांचे मोडीलिपीतील काव्य उपलब्ध होते. सिंदखेडकर जाधवरावांची बखर संपादित करुन या घराण्याचा इतिहास लिहिण्याचे मोलाचे कार्य महाजन यांनी केले होते.

जाधवराव मोहिमेवर असताना त्यांच्या अनुपस्थितीत राज्यकारभार पाहण्याची जबाबदारी घरच्या स्त्रियांवर येत असे. कारण की, अशा मोहीमांच्यावेळी जाधवरावांची मुलेही त्यांच्या सोबत जात आणीबाणीच्या प्रसंगी हाती शस्त्रे घेऊन शत्रूंशी दोन हात करण्याची तयारीही या स्त्रियांची असे. प्रसंगी न्यायनिवाडा करण्याचीही जबाबदारी त्या पार पाडीत. यावरुन त्यावेळी मराठ्यांमध्ये पडदा पध्दती नव्हती असे दिसून येते. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढण्याची त्यांची नेहमीच तयारी असे. या सर्व गोष्टीवरुन हे स्पष्ट होते की, मराठे वीर पुरुष आपल्या स्त्रियांना सारखाच दर्जा देऊन त्यांचा आत्मसन्मान वाढवीत असत. मराठ्यांमध्ये स्त्रियांना जी दुय्यम प्रतीची वागणूक मिळत असे त्याची सुरवात नंतरच्या काळात झाली असावी. या साऱ्या परिस्थितीचे योग्य ते संस्कार बालजिजाऊंवर झाले होते. त्यामुळे पुणे-सुपे प्रांताची जहागिरी सांभाळण्याची जबाबदारी जेव्हा जिजाऊंवर आली तेव्हा त्यांनी आपल्या पतीच्या अनुपस्थितीत यशस्वीपणे पार पाडली.

## जिजाऊंचा विवाह व सासर

देवगिरीच्या वैभवशाली यादव साम्राज्याची उपशाखा असलेले जाधवरावांचे घराणे जसे मराठ्यांमध्ये सुप्रतिष्ठित मानले गेले. त्याचप्रमाणे मेवाडच्या सिसोदिया वंशाच्या पराक्रमाचा वारसा सांगणारे महाराष्ट्रातील वेरूळचे भोसले घराणेही तेवढेच तोला-मोलाचे होते. या घराण्यातील भोसाजी या पुरुषांमुळे भोसले हे उपनाव या घराण्याला मिळाले असावे असे एक मत आहे किंवा वेरूळ परिसरातील भोसली या गावाच्या नावावरुन पडले असावे. सिसोदिया वंशातील राजा लक्ष्मणसिंह अल्लाउद्दीन खिलजीने चितोडला वेढा दिला असताना ठार झाला. त्याचा मुलगा सज्जनसिंह, नातू दिलीपसिंह व पणतू सिंहाजी होय. सिंहाजीचा मुलगा भोसाजीचा पुत्र देवरावजी राणा हा महाराष्ट्रात आश्रयास आला व हा भोसाजीचा वारस म्हणून त्याने या वंशाची येथे स्थापना केली. त्यामुळे भोसले हे नाव या कुळाला पडले असण्याची

शक्यता आहे. वेरूळचे पाटील मालोजी भोसले यांचे सुपूत्र शहाजी यांच्याशी मातोश्री जिजाऊंचा विवाह झाला व त्यामुळे जाधव व भोसले या दोन पराक्रमी मराठा घराण्यांचा संबंध जुळला.

***

## शब्दार्थ

नवस करणे-देवाची प्रार्थना करणे, बाज-आसक्त, भाट-प्रशंसक, प्रसूद-बाळंतीण, पोशिंदा-पालक, परवरदिगार, जीर्ण-जुना, फाटका, तुटका, हरखून-आनंदून, बखर- ऐतिहासिक दस्तावेज,
वैमनस्य-वैर शत्रुत्व.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या आईवडीलांचे नांव काय?
२) रामसिंग व बजरंग कोण होते?
३) राजे युध्दावर गेल्यानंतर पुणे-सुपे प्रांताची जहांगिर कोणी सांभाळली?
४) भोसले हे नांव शहाजी महाराजांच्या घराण्याला कसे मिळाले?
५) शहाजी राजांच्या वडीलांचे नाव काय?
६) जिजाऊंचा विवाह कोणाशी झाला?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** जिजाऊंचा जन्म व बालपणावर माहिती लिहा?
२) जिजाऊंचा विवाह व सासर या विषयी सविस्तर लिहा?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "आपल्या मुलांप्रमाणे जिजाऊंना देखील त्यांनी घोड्यावर बसणे, तलवार चालविणे, प्रतिपक्षावर हल्ला करणे इ. युध्दशास्त्रातील शिक्षण दिले असावे."

**ई) टिपा लिहा.**

१) लखुजी जाधव.

२) मालोजी भोसलें.

**उ) उपक्रम**

राष्ट्रमाता जिजाऊंचे चरित्र मिळवून वाचा.

****

# ११. टारफुला

## शंक़र पाटील

**परिचय** : शंकर बाबाजी पाटील (१९२६-१९९८) प्रसिध्द ग्रामीण कथाकार, कादंबरीकार व चित्रपट-कथालेखक. त्यांचे 'वळीव', 'धिंड', 'ऊन', इत्यादि कथासंग्रह; कथा 'अकलेच्या कांदयाची', हे वगनाट्य 'टारफुला' ही कादंबरी प्रसिध्द आहे. नांदेड येथे झालेल्या आखिलभारतीय मराठी साहित्यसंमेलाचे ते अध्यक्ष होते.

शंकर पाटील आपल्या साहित्यातून ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांचे प्रत्ययकारी दर्शन घडवितात. खेड्यातील निसर्ग, व्यक्ति, वातावरण व तेथील संकेत यांचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.

'टारफुला' मध्ये खेड्यातल्या सत्तासंघर्षाच्यारुपाने आधुनिक भारतातली सत्तेसाठी चाललेली चढाओढ व्यक्त झालेली आहे. गावचे पाटील असणाऱ्या दादांना केरुनाना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवितांची मनापासून काळजी वाटत असते. केरुनानांना दादांचा विश्वास वाटल्यावर ते, स्वसंरक्षणार्थ आपल्या दोन मुलींना मर्दुमकीचे धडे कसे दिले हे पाटलांना दाखवतात. त्याने दादा चकित, प्रभावित आणि निश्चित होतात; हा भाग इथे आला आहे.

---

भानावर आल्यावर दादा म्हणाले,

"केरुनाना, बसल्या बसल्या लोक फुणगी टाकत्यात हो. त्याचं बोलणं मनावर घेऊ नका. ते काय खरं न्हवं."

"ते खरं न्हवं आणि तुमचं खरं व्हय?"

"हे बगाऽऽ जरा पुढचं धोरण आखा."

“काय आकायचं म्हंता?”

“अहो तुमची एकी झाली की ती माकडं सुटून आल्यावर काय करत्यात?”

“एवढा भाबडा न्हाई मी दादा.”

“भाबडंपणा न्हवं केरुनाना, येळ येईल तशी पाठ फिरवावी लागती.”

“मग हाय की आमी तयार, जशी वेळ येईल तशी पाठ देनारच की!”

“असं म्हणता?”

“व्हय. असं म्हणतो. ते आमचं घराणं नष्टांश करत्यात का आमी त्याच करतो हे डोळ्यानं बगत बसा की तुमी.”

“तुमी इरेला पेटलाय म्हणायचं तर मग.”

“ते पेटल्यात तर मग आमी का सोडतोय?”

“मग एकी व्हायची न्हाई म्हणता तर?”

“कशाची एकी घेऊन बसलाय? हितनं सारी आता बेकीच बघा!”

न बोलता दादा गप बसून राहिले आणि समोरच्या ताटाकडं बघत केरुनाना म्हणाला,

“लई इच्चार करु नका. खावा केळं खावा. एवडा तर आमचा मान राका.”

हातात केळं घेत दादांनी विचारलं,

“ मान राखा म्हंजे? ”

“ उगा मज्जेनं बोललो हो. ”

पुढे बघून दादांनी केळं तोंडाला लावलं आणि फुसुक्कन् केरुनाना बोलला,

“ काय तुमच्या जिवावर गायकवाड आमचा अन् खून करनार हाय म्हणं आणि काय लोक म्हंत्यात तुमचा त्याला पाठिंबाबी हाय म्हणं. ”

तोंडाला लावलेलं केळं हातात धरुन दादा बघत राहिले आणि केरुनाना हसून म्हणाला,

“ तुमी तसं करशीला असं न्हवं. लोक म्हंत्यात ते बोल्लो. ”

“ मला काळजी पडलीया तुमच्या जिवाची आणि काय बोलतायसा केरुनाना तुम्ही हे? ”

" तुमाला काळजी पडलीया आमच्या जिवाची? अहो का काळजी करतायसा तुमी आमची? करायची तवा केली न्हाईसा आणि आत्ता करतायसा व्हय? "

" आत्ता येळच आलीया तशी. "

" येळ आलीया त्यांची! आमची न्हाई. त्यांच्या घड्याळात बारा वाजल्यात म्हणून अशी दुर्बुध्दी व्हाय लागलीय त्यास्नी! एक इच्चारु? "

" इचारा की. "

" हातात फळ हाय तुमच्या. दादा, खरं सांगा, तुमचा काय डाव न्हाई न्हवं त्याच्यात?"

" गळ्याची शपथ देतो केरुनाना. "

" बस्स! मग झालं तर. मनातली शंका फिटली बगा. "

" पर का शंका यावी मनात तुमच्या? "

" शंका येनारच हो. त्यो अग्नी शिरलाय न्हवं तुमच्या वाडयात? तवा मनाला काय तरी चाटून जातंय. तुमच्यावर मस्त इस्वास हाय. त्याच्यावर पायजे का नको? "

" इचारलं बरं केलं. पुन्ना असं मनात आणू नका. "

"खावा केळं खावा. आत्ता निर्मळ झालं म्हणनासा मन. "

तोंडात घास घोळवत दादा बोलले,

" असं काय मनात असतं तर मी आलो असतो का तुमच्या वस्तीवर? "

" मीबी धाडस करुन इच्चारलं असतं का तुमाला? झालं. मनातला शक गेला. आत्ता जीव बिनघोरी हाय हो माझा. तुमचं काय त्याच्यात अंग न्हाई एवढंच आमाला पायजे हुतं. मग आम्ही हाय, ते हैत, बघून घेऊ. "

" हे बगा केरुनाना. माझी एवढीच विच्छा हाय की ती पोरं आता सुटून येतील. त्यांचा धा-पंधरांचा पुट्टा हाय. आपुन सारं आता एक होऊन त्यांना तोंड द्यायला पायजे. "

" व्हयं. तुमच्यावर बी दात हैच की त्यांचा. "

" माझ्यावर हाय. तुमच्यावर हाय. सगळ्यांवरच हाय हो त्यांचा. "

" असू द्या हो. आमची नका काळजी करु तुमी. "

“ काय मगं तुमचं घराणं सगळं नष्टांश करणार म्हणून बसल्यात ते. मग काळजी करू नका कसं? ”

“ घराणं नष्टांश करत्यात? त्यांचा बा यायला पायजे गोरीतला उठून एकेकांचा! ”

“ उगा असं अडमाप बोलू नका केरुनाना. ”

“ नुसतं बोलत न्हाई दादा. करुन दावतो. आता उगंच गमजा बघा. ”

“ गमजा बघू? ”

“ व्हय, गमजाचं बगायची. हे बगा दादा, त्यो दाजीबा झेलात जाऊन भेटी येऊन येतोय. पर आमीबी काय हितं निजत्यालं न्हाई हं! त्यांचाच डाव त्यांच्यावर कसा उलटतोय बघा. फुडचं कशाला बोलायचं? चला, तुमाला मज्जा दावतो. ” असं म्हणून केरुनाना उठला. दादाही उठले आणि ‘जरा थांबा’ असं सांगून तो आत गेला आणि बंदूक घेऊन बाहेर आला. केरुनानाच्या हातातली बंदूक बघून दादा खुळ्या कावऱ्यागत त्याच्याकडं बघत राहिले आणि हसल्यागत करुन केरुनाना म्हणाला,

“ चला, तुमाला मज्जा दावतो. ”

त्याच्या हातातली ती बंदूक बघून केरुनाना काय मज्जा दाखवणार याचा अंदाज लागेना झाला. ते विचार करीत मागनं चालू लागले.

“कुठं जायचं म्हणता?”

“चला तर खरं.”

“मोटेचं पाणी पानमळ्याला चालू होतं आणि ते दोघेही विहिरीच्या धावेवर येऊन राहिले. दादा थक्कच झाले. पाय न उचलता ते बघत उभे राहिले. केरुनाना म्हणाला,

“हे बघा दादा, ही मोट मारती ती माझी थोरली मुलगी लक्ष्मी आणि धाकटी  आत पाणी पाजीवतीया.”

“लेकीला मोट मारायला शिकीवलं काय केरुनाना तुम्ही?”

“दादा, नुसती मोटच काय घेऊन बसलायसा; लेक आणि ल्योक असा फरक न्हाई केलेला आमी. जे गडयाच्या हातनं व्हायचं न्हाई ते माझ्या लेकीच्या हातनं हुतंय. दोघीबी तशाच हं! ही झाशीची लक्ष्मी हाय आणि

धाकटी तारामती हाय. गादीवर बशीवलं तर राज चालवत्याल राज! ”
असं म्हणून केरुनाना पुढं गेला आणि हाळी देऊन म्हणाला,

“लक्ष्मी, जरा मोट हुबी कर.”

मोट थांबवून लक्ष्मी उभी राहिली आणि आपल्या हातातली बंदूक तिच्या हातात देत केरुनाना म्हणाला,

“मी हाय मोटेवर. तू जरा बंदूक चालवून दाव बगू पाटलास्नी. ”

लक्ष्मीनं बंदूक खांद्यावर लावली आणि नेम धरल्यागत करुन धाडकन् तिनं बार काढला. मोटेचे बैल मागे ओढता ओढता केरुनाना हसून म्हणाला,

“बघितलंसा का दादा? हिकडं कुणीकडं बघता? गोळी कुठं गेली ते बघा. तिळभर नेम चुकायचा न्हाई हं.”

केरुनानानं तिच्या हातातली बंदूक आपल्या हातात घेतली आणि मोट तिच्या स्वाधीन करुन पुन्हा दादांजवळ येत तो म्हणाला,

“गेले तीन म्हैने सराव चालू हाय. बिन लग्नाच्या पोरी घरात बशिवल्यात ते काय उगाच न्हाई! बापाची ईर्ष्या लेकीत उतारलेली हाय हं. ह्या दोन लेकी आणि दोन लेक, अशी मिळून चार पोरं हैत मला! ”

तोंड मिटून बघत राहिलेले दादा केरुनानाचं हे बोलणं ऐकूण म्हणाले,

“ हे बरं शिक्षण दिलं लेकीस्नी. ”

“ अहो, त्याबी जिवावर उदार झाल्यात. आम्ही मेलो तर माझ्या लेकी समर्थ हैत लेकी! लाठी खेळत्यात. बंदूक चालवित्यात. धा गडी वस्तीवर आलं तर त्यास्नी थोपवून धरतील थोपवून! ”

असं म्हणून केरुनानानं पाटलांच्या तोंडाकडं बघितलं आणि वर्मी घाव घातल्यागत तो बोलला,

“ एवढं वरीस दीड वरीस आमी तुरुंगात अडीकलो म्हणून आमचं काय मागं नडलं म्हंतासा काय? माझ्या ह्या दोघी लेकींनी फुडं होऊन ह्यो मळा चालीवला. आता हिरवागार दिसतोय ह्यो पानमळा, त्यांच्या जिवावर जतन झालाय बरं दादा! सगळी हितं रानात रात्रंदिवस खपत होती म्हणून ह्यो पानमळा जगलावाचला. हाय कुनाची पावार अशी?”

दादा नुसते बघत राहिले. त्यांच्या तोंडातनं शब्द बाहेर येईना झाला आणि वर आभाळाकडं तोंड करून ते म्हणाले,

“ दिवस बराच वर आला. बरं जातो आता केरुनाना. ”

“ बरं, या मग. ” असं म्हणून दोघेही माघारी वळले. खोपीपर्यंत चालत गेले. दादा घोड्यावर बसले आणि पुन्हा एकदा केरुनाना म्हणाला,

“ आलासा बरं झालं. आमच्या मनातलाबी शक गेला. ”

“ मनात काय व्हावू ने म्हणून मुद्दामच आलो होतो. ”

“ ते बरं केलंसा. ”

दादांनी घोड्याला टाच मारली. आणि केरुनाना मागनं म्हणाला,

“ बरं जावा, आमची काळजी नगा करु. तुमीच जरा सावध व्हावा म्हंजे झालं. ”

घोडा भरधाव सुटला. बंदुकीच्या गोळीगत जाऊ लागला आणि मघाशी ऐकलेला बार दादांच्या कानात घुमत राहिली...

**(‘टारफुला’)**

***

## शब्दार्थ

ईरेला पेटणे-ईर्षा, जिद्द, फुडं-पुढे

### अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

१) पाटील दादाना कोणाच्या कुटुंबाची काळजी वाटत होती?
२) केरुनानाने आपल्या मुलीना कोणते शिक्षण दिले होते?
३) केरुनानांनी आपल्या दोन्ही मुलींना कोणती नांवे दिली आहेत?
४) लक्ष्मी मळ्यात कोणते काम करीत होती?

### आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) केरुनानानी कुटुंबाच्या रक्षणासाठी कोणती व्यवस्था केली?
२) पाटलाबद्दलचा केरुनानांचा गैरसमज कसा दूर झाला?
३) केरुनानांनी पाटलांच्यावर कोणता आरोप केला?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "त्यांच्या घड्याळात बारा वाजल्यात म्हणून अशी दुर्बुध्दी व्हाय लागलीय त्यास्नी!"

२) "तीळभर नेम चुकायचा न्हाई हं."

**ई) टिपा लिहा.**

१) केरुनाना तुरुंगात गेल्यानंतरची घरातील परिस्थिती.

२) पाटलानी पाहिलेले मळ्यातील दृष्य.

**उ) वाक्प्रचार**

१) इरेला पेटणे

२) बारा वाजणे

३) वेळ येईल तशी पाठ फिरविणे

**उ) उपक्रम**

आसाराम लोमटे यांचे 'इडा पिडा टळो' आणि सुनंदा गोरे यांचे 'उन्हातलं चांदणं' हे कथा संग्रह मिळवून वाचा.

***

# १२. संगणकाचे महत्व

**---माधव राजगुरु**

**पाठ परिचयः** आपण २१ व्या शतकात पदार्पण केले आहे. कालचे ज्ञान आज कालबाह्य ठरु पहात आहे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाने माहितीची क्षितिजे विस्तारली आहेत. त्याच आधुनिक तंत्रज्ञानाचा अविष्कार म्हणजे संगणक. संगणाकाचा महिमा अगाध आहे. या संगणकाने संपूर्ण जगाला एकदम जवळ आणले आहे. त्याचे उपयोग या पाठातून विशद केले आहेत. हा पाठ माधव राजगुरु यांनी लिहिला आहे.

---

रघुनाथराव चेन्नईला आपल्या मुलाकडे आले होते. तुर्त काही महिने आपल्या मुलाकडे चेन्नईतच राहण्याचा त्यांचा बेत होता. वाचण्यासाठी त्यांनी काही पुस्तके आणली होती. ती दोन-चार दिवसातच वाचून झाली. मग हळूहळू त्यांना इथल्या जीवनाचा कंटाळा येऊ लागला.

आजूबाजूला राहणारी, वावरणारी सर्व माणसे अपरिचित आणि अमराठी होती. नातवंडांशी गप्पागोष्टी करण्यात काही वेळ जात असे. नंतर दिवसभर काय करावे, हा त्यांच्यापुढचा यक्षप्रश्न होता. आपल्या मुलाला सांगून पुण्याला परत येण्याचा विचार त्यांच्या मनात बळावू लागला. आपल्या आजोबांची अस्वस्थता मीनाच्या लक्षात आली. संध्याकाळी जेवता जेवता रघुनाथरावांनी पुण्याला जाण्याचा प्रस्ताव मुलापुढे ठेवला. मीनाने त्याला लागलीच विरोध दर्शवला. ती म्हणाली, “आजोबा, जाऊ नका ना. आणखी काही दिवस तरी रहा इथे.” सीनाने मीनाच्या बोलण्याला पाठिंबा दिला. ती म्हणाली, “नाही आजोबा, एवढ्यात आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही.”

रघुनाथराव म्हणाले, “नाही बाळांनो, आता मी जास्त दिवस इथे राहू शकत नाही. मला घरी गेलंच पाहिजे.”

मीना म्हणाली, “आजोबा, तुम्ही आलात तेव्हा खूप दिवस राहणार आहे, असं म्हणाला होतात. एवढ्यात कसे कंटाळलात? ”

“काय करणार बाळांनो, तुम्ही सगळे आपापल्या उद्योगाला निघून जाता. मी दिवसभर घरी एकटा असतो. इथे साधे मराठी वर्तमानपत्रसुध्दा मिळत नाही. मी कसा वेळ घालवणार?” रघुनारावांनी आपली खरीखुरी अडचण सांगितली.

“एवढंच ना आजोबा! मराठी वर्तमानपत्र तुम्हाला रोज वाचायला मिळेल. याची व्यवस्था करते, मग तर झालं?” मीना म्हणाली.

“अगं मीना, ती शिळी वर्तमानपत्र वाचून काय उपयोग? ” रघुनाथराव.

“नाही आजोबा, तुम्हाला सर्व वर्तमानपत्र रोजच्या रोज मिळतील. ” मीना.

“ते कसं काय शक्य आहे बुबा?” रघुनाथरावांनी आश्चर्याने विचारले.

“आता सगळं शक्य आहे, आजोबा.” सीना पुढे होऊन म्हणाली, “आजोबा, आताचा जमाना वेगळा आहे. हे संगणकाचं युग आहे. नेटवरुन काही सेकंदांतच जगातील कुठलीही गोष्ट आपण घरबसल्या उपलब्ध करून घेऊ शकतो. आता जगात अशक्य असं कांहीच राहिलं नाही. ”

“पोरी, मी इंटरनेट शब्द ऐकलाय. खरंच काय असतं ते सांग तरी. ” आजोबा.

“मी सांगतो बाबा. इंटरनेटला मराठीत ‘आंतरजाल’ असा शब्द आहे.” मीना व सीनाचे वडील बोलू लागले. त्यांचे पुढचे बोलणे थांबवत सीना म्हणाली, “बाबा, तुम्ही नका सांगू. आजोबांना मीच सांगते. आजोबा, तुमचं जेवण झालं ना? चला, मी तुम्हाला आजचं मराठी वर्तमानपत्र वाचायला देते. ” असे बोलून सीनाने आजोबांना संगणकाजवळ नेले. संगणक सुरु झाल्यावर तिने विचारले “आजोबा,

कोणतं वर्तमानपत्र वाचायचं आहे? एका मोठ्या मराठी वर्तमानपत्राचं नाव सांगा.”

आजोबांनी ‘सर्वकाळ’ असे नाव सांगताच सीनाने इंटरनेटवर ते लिहिले. काही क्षणांतच संगणकाच्या पडद्यावर ‘सर्वकाळ’ अशी अक्षरे दिसू लागली. आजोबांचा चेहरा एकदम खुलला सीनाने त्या वर्तमानपत्राचे एकेक पान उघडून दिले अशा रीतीने आजोबांनी वृत्तपत्रातल्या सर्व बातम्या वाचून काढल्या. नंतर आजोबा सीनाकडे वळून म्हणाले, “सीना बाळ, मला रोज सकाळी ताजं वर्तमानपत्र वाचता येईल?”

मीना त्यांच्या पाठीमागेच उभी होती. ती म्हणाली, “का नाही आजोबा? रोज तुम्हांला सर्व मराठी वर्तमानपत्र इथं बसून वाचता येतील. सांगा. आणखी कुठलं वर्तमानपत्र वाचायचं आहे?”

आजोबांनी आणखी काही वृत्तपत्रांची नावे सांगितली. सीनाने ती संगणकावर उघडून दिली. एक वृत्तपत्र मात्र संगणकावर दिसले नाही. आजोबांनी त्याबाबत विचारल्यावर मीनाने सांगितले, “प्रत्येक वर्तमानपत्राच्या वेगवेगळ्या आवृत्त्या असतात. ग्रामीण आवृत्ती, शहर आवृत्ती असते, तशी इंटरनेट आवृत्ती असते. काही छोटी वर्तमानपत्र त्या त्या शहरापुरती मर्यादीत असतात, त्यामुळे त्यांची इंटरनेट आवृत्ती नसते. अशी वर्तमानपत्रे इंटरनेटवर पाहाता येत नाहीत.” आजोबांनी मान डोलावली.

सीनाने आजोबांना संगणक चालू करण्यापासून ते इंटरनेटवर वर्तमानपत्र कसे पाहायचे हे सर्व शिकवले. त्यानंतर आजोबा रोज संगणकावर वृत्तपत्र वाचू लागले. आजोबांच्या मनातला पुण्याला जाण्याचा विचार तुर्तास तरी पुसला गेला होता.

आजोबांचे सकाळी उठणे, फिरायला जाणे, नंतर चहा पीत इंटरनेटवर वृत्तपत्र वाचणे इ. कार्यक्रम नित्यनेमाने चालू राहिले.

संगणकातील इतर अनेक गोष्टींची माहिती आजोबांनी सीनाकडून शिकून घेतली होती, त्यामुळे आजोबा दिवसभरातील बराच वेळ संगणकासमोर बसून स्वतःच संगणक हाताळू लागले.

एकदिवस मीना संगणकावर काही काम करत बसली होती. आजोबांनी उत्सुकतेने विचारले, "मीनू, तू संगणकावर कसलं काम करतेस?"

"आजोबा, मी माझ्या कॅालेजचा प्रवेश अर्ज भरुन पाठवितेय. आज शेवटची तारीख आहे." मीना.

"काय? कॅालेजचा प्रवेश अर्ज?" आजोबांनी आश्चर्याने विचारले. "होय आजोबा. ते कसं, हे मी माझं काम झाल्यावर तुम्हांला सांगते." मीना.

आजोबा विचारात पडले. विचार करता करता एकदम भूतकाळात शिरले. पूर्वी निकाल जाहिर झाला, की प्रवेशासाठी कॅालेजवर ही गर्दी दिसायची. प्रवेश अर्ज घेण्यासाठी एक रांग, भरलेला प्रवेश अर्ज तपासण्यासाठी दुसरी रांग आणि प्रवेश अर्ज जिथे द्यावयाचा ती एक वेगळी रांग, गर्दीमुळे एका दिवसात प्रवेश घेण्याची प्रक्रिया पूर्ण होत नसे. किमान दोन दिवस तरी त्यात जात असत. आजोबा हे सर्व आठवत असतानाच मीनाने हाक मारुन त्यांना भूतकाळातून वर्तमानकाळात आणले.

"आजोबा, घरी बसून कॅालेजमध्ये प्रवेश कसा घ्यायचा, हेच तुम्हाला जाणून घ्यायचं होतं नां? तर ऐका." मीना सविस्तरपणे आजोबांना समजावून सांगू लागली, "प्रत्येक शिक्षणसंस्थेची स्वतंत्र 'वेबसाइट' असते. वेबसाइट म्हणजे 'संकेतस्थळं'. ज्या संस्थेत आपणांस प्रवेश घ्यायचा आहे, त्या संस्थेच्या संकेतस्थळांवर गेल्यावर प्रवेश घेण्याच्या संदर्भातील माहिती मिळते. संस्थेने तिथेच प्रवेश अर्जाचा नमुना दिलेला असतो. त्यात आपली आवश्यंक ती माहीती भरायची.

संस्थेकडून प्रवेश अर्जाची छाननी होते. तुम्हांला प्रवेश मिळाला आहे की नाही, ते संस्थेच्या संकेतस्थळांवर कळू शकते.”

“पोरी, आमच्या काळात असलं काहीही नव्हतं. संगणकाच्या शोधामुळे जगाने किती प्रगती केली आहे! बरं, मला सांग, आणखी काय काय करता येतं संगणकावर?” आजोबांनी उत्सुकतेने विचारले.

मीना सांगू लागली, “संस्थाप्रमाणे व्यक्तींचीही संकेतस्थळे तयार करता येतात. एखाद्या संस्थेविषयीची किंवा व्यक्तीची माहिती त्यांच्या विशिष्ठ संकेतस्थळांवर जाऊन घेता येते. घरी बसून ऑफिसची कामेही तुम्ही करु शकता. एवढंच नाही, अमेरिकेतील डॉक्टर तिथे बसून भारतातल्या डॉक्टरांना सूचना देतात आणि त्या सूचनांनुसार इथले डॉक्टर एखादी अवघड शस्त्रक्रिया सहजपणे करु शकतात. विमान, रेल्वे व बस यांची तिकिटे बुक करणे, दूरध्वनीची व विजेची देयके भरणे या कामासाठीसुध्दा आता धावपळ करण्याची गरज नाही. घरबसल्या ही कामे आपण करु शकतो. बाहेरच्या देशांत पत्रे जायला बरेच दिवस लागतात. पण तुमच्या संगणकावर इंटरनेटची सुविधा असेल, तर, इथून पाठवलेलं पत्रे इंग्लंड, अमेरिका यासारख्या दूरच्या देशांत काही क्षणांत पोचतं.”

“ई-मेल वर पत्र कसं पाठवायचं?” आजोबांची उत्सुकता आणखी वाढली. “पत्रासाठी ‘ई-मेल’ सेवा असते. ही सेवा देणाऱ्या अनेक खाजगी कंपन्या असतात. एखाद्या ठिकाणी आपले ‘ई-मेल’ खाते उघडायचे. त्या खात्याला तुम्ही एखाद्या सांकेतिक शब्द (पासवर्ड) द्यायचा. तो शब्द स्वतःशिवाय इतर कुणालाही माहित नसतो. तुम्हाला आलेली पत्र, काही संदेश तुमच्या खात्यात जमा होतात. ही पत्रे तुमच्या खात्याच्या सांकेतिक शब्दाच्या आधारे उघडून वाचू शकता. ज्यांच्याकडून ही पत्रे येतात, त्यात त्यांचा ‘ई-मेल’ चा पत्ता असतो, त्यावर तुम्ही पत्राचे उत्तर पाठवू शकता.”

"समज, माझा 'ई-मेल' चा पत्ता तुला माहित आहे, तर तू माझी पत्रे वाचू शकतेस. असंच ना?" आजोबांनी शंका विचारली.

"अजिबात नाही. आजोबा, तुमचा 'ई-मेल' चा पत्ता मला माहित असला, तरी मला तुमचा सांकेतिक शब्द म्हणजे 'पासवर्ड' माहित नसल्यामुळे मी तुमच्या खात्यात प्रवेशच करू शकणार नाही. स्वतःचा पासवर्ड तुम्ही कुठेही लिहूनही ठेवायचा नाही, कुणाला सांगायचाही नाही. तो फक्त स्वतःच्या मनात ठेवायचा. तो जर तुम्ही विसरलात, तर तुम्हालाही तुमचे खाते उघडता येणार नाही."

मीनाच्या या विश्लेषणानंतर आजोबा आवाक्‌च झाले. ते म्हणाले, "खरचं पोरी, संगणकाचा महिमा अगाध आहे. या संगणकाने संपूर्ण जगाला एकदम जवळ आणलंय. पोरी, तुम्ही किती भाग्यवान आहात!"

****

## शब्दार्थ

वेबसाइट-संकेतस्थळ, ई-मेल-तांत्रिकसंदेश, इंटरनेट-आंतरजाल, सर्च-शोध, चॅटिंग-वार्तालाप
पासवर्ड-सांकेतिक शब्द.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) संगणक म्हणजे काय?
२) रघुनाथरावांना चेन्नईत राहण्याचा कंटाळा का आला?
३) रघुनाथरावांना चेन्नईत मराठी वर्तमानपत्र वाचायला मिळण्याची व्यवस्था कशी झाली?
४) सर्वच वर्तमानपत्रे इंटरनेटवर का पाहता येत नाहीत?
५) आजोबा केंव्हा अवाक् झाले?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संगणकामार्फत आपणास घरी बसून कोणकोणती कामे करता येतात?

२) संगणकामुळे प्रवेश प्रक्रियेत झालेला बदल लिहा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "संगणकाचा महिमा अगाध आहे."

२) "आता जगात अशक्य असं काहीच राहिले नाही."

३) "आजोबांच्या मनातला पुण्याला जाण्याचा विचार तुर्तास तरी पुसला गेला."

**ई) टीप लिहा.**

१) ई-मेल ची माहिती लिहा.

****

# पद्य विभाग

# १. महदंबेचे धवळे

## महदंबा (सन्-१२२८-१३०३)

महदंबा ही श्री चक्रधरांची शिष्या होती. तिचे मूळ नाव रुपाबाई असे होते. चक्रधरांनी तिचे आंतरिक गुण जाणून तिचे नांव महदाइसा असे ठेवले. पुढे केसोबासांनी रचलेल्या रत्नमालास्तोत्रम् या संस्कृत काव्यात त्या नावाचे महदंबा असे रुपांतर झाले. या महंदबेला आद्य मराठी कवियित्रीचा मान आहे. महदंबेने श्रीकृष्णाची जी गीते रचली त्यांना धवळे असे म्हणतात. या धवळ्याचा पूर्वार्ध सन १२८६ म्हणजे ज्ञानेश्वरीच्या आधी तर उत्तरार्ध सन् १३१२ पूर्वी रचण्यात आला. त्यामुळे प्राचीन मराठी कवितेचे सुंदर रुप धवळ्यातून दिसते.

एकदा चक्रधरांचे गुरु गोविंदप्रभू यांनी श्रीकृष्ण विवाहोत्सव केला, त्यावेळी महदंबेला गाणी गाण्यास सांगितले. त्यावेळी तिने उत्स्फूर्तपणे जी गीते रचून गायिली ती गीते म्हणजे धवळे होय. या धवळ्यांतून श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या विवाहाचे वर्णन येते.

रुक्मिणीचे व श्रीकृष्णाचे एकमेकांवर प्रेम होते. परंतु रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याने आपल्या बहिणीचा विवाह. चैदी देशाचा राजा शिशुपालाशी ठरविला. त्यामुळे रुक्मिणीच्या मनाची झालेली अवस्था प्रस्तुत धवळ्यातून दिसून येते.

---

रुक्मीणी सखीयाते पुसे वृतांतुः
काइ बोलणें होए राउळाआंतुः
काइ बोले माता पीता काइ बोले तो रुकमिया भाइः
शीशुपाळु वरीएलीति ऐसें बोलणे आहे तेयाचा ठाइः ।।१।।

शीशुपाळु वरु ऐसें आइकीलें बाळाः
श्रमु पातली नीऱ्हा जाली व्याकुळः
स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टी पडलीए थोरीः
तुं एकु वांचोनिया सोडवीता अनु नाहीं अवधारीः ।।२।।

हृदयी धाकु तव तीये लागली चींताः
भक्तबंध छेदना म्हणे राखै अनंताः
आरतांदानी देवा कृपा करा माझीं दीन उधरणाः
शीशुपाळ बंदीसाळ चुकवी दाखवी आपुले श्रीचरणः ।।३।।

शब्दार्थ

पुसे-विचारणे, राउळ-राजवाडा, वरीएलीती-विवाह ठरवणे, ठाइ-मनात, वरु-वर, निऱ्हा-केवळ, संकष्टी-संकट, अवधारी-मन अस्थीर असणे, आरतांदानी-आर्ततेने, व्याकुळतेने, बंदिसाळ-बंदिवास.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) धवळे म्हणजे काय?
२) रुक्मिणी आपल्या विवाहाचा वृत्तांत कोणाला विचारते?
३) रुक्मिणीचा विवाह रुक्मीने कोणाशी ठरविला?
४) आपल्या विवाहाची बातमी ऐकल्यानंतर रुक्मिणीने कोणाचे स्मरण केले?
५) रुक्मिणीला कोणाचा बंदिवास नको आहे?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

**१)** महदंबेच्या धवळ्यातून दिसून येणारी रुक्मिणीच्या मनाची झालेली अवस्था कथन करा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** “काइ बोले माता पिता काइ बोले तो रुकमिया भाइः

शीशुपाळु वरीएलीति ऐसें बोलणे आहे तेयाचा ठाइः"

२) "आरतांदानी देवा कृपा करा माझीं दीन उधरणाः
शीशुपाळ बंदीसाळ चुकवी दाखवी आपुले श्रीचरणः"

**ऊ) उपक्रम**

महदंबेचे धवळे मिळवून वाचन करा.

****

# २.गुरुमहात्म्य

## संत ज्ञानेश्वर

### परिचयः ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी (१२७५ ते १२९६)

महाराष्ट्रातील भागवत संप्रदायाचे प्रवर्तक, ज्येष्ठसंत, योगी व तत्वज्ञ कवी. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंग व गौळणी ही त्यांची काव्यरचना. अध्यात्म आणि तत्वज्ञान-विषयक विचार मराठीतूनही व्यक्त करता येतात असा विश्वास संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथकर्तृत्वातून निर्माण केला. त्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील लोकांना आध्यात्मिक लोकशाहीची प्रेरणा मिळाली. ज्ञानेश्वरी म्हणजे गीतेवरील टीका होय.

मनाचे इच्छित पूर्ण करण्याचे सामर्थ्य एकमेव सद्गुरुच्या ठिकाणी असते. हे सांगण्यासाठी ज्ञानेश्वरांनी अनेक दृष्टांत दिले आहेत. शारदादेवीला नमन करुन गुरुचे महत्व सांगताना अंजन, चिंतामणी, शाखा. पल्लव, अमृत व समुद्राची विविध उदाहरणे दिली आहेत. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात २१ ते ३० ओव्यातून गुरुमहात्म्य सांगितले आहे.

---

आतां अभिनव वाग्विलासिनी। जिये चातुर्यार्थ कलाकामिनी।
ते शारदा विश्वमोहिनी। नमस्कारिली मियां ।।१।।
मज ह्रदयीं सद्गुरु । जेणे तारिलों हा संसारपूरु ।
म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ।।२।।
जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळी दृष्टीसी फांटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ।।३।।
कां चिंतामणि जालया हाती । सदा विजयवृत्ति मनोरथी ।
तैसा मी पूर्णकाम निवृत्ती । ज्ञानदेवो म्हणे ।।४।।

म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होईजे ।
जैसें मूळसिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ।।५।।
कां तीर्थे जियें त्रिभुवनी । तियें घडती समुद्रावगाहनीं ।
ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ।।६।।
तैसा पुढत पुढती तोचि। मियां अभिवंदिला श्रीगुरुचि ।
जो अभिलषित मनोरुचि । पुरविता तो ।।७।।
आतां अवधारा कथा गहन । जे सकळा कौतुकां जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।।८।।
ना तरी सर्व सुखांची आदि । जे प्रमेयमहानिधि ।
नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ।।९।।
कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचें मूळपीठ ।
शास्त्रजातां वरिष्ठ । अशेषांचे ।।१०।।

**शब्दार्थ**

अभिनव-अपूर्व, नवीन, वाग्विलासिनी-सरस्वती, चातुर्यकलाकामिनी-चौदा विद्या व चौसष्ट कलात प्रवीण, मज-मला, माझ्या, हृदयात-मनात, विशेष-अधिक प्रीती, दृष्टी-नजर, वास-वाट, मार्ग, चिंतामणि-चिंतिलेले, प्राप्त करुन देणारा मणी, महानिधी-मोठा ठेवा, पूर्णकाम-तृप्त, भजावे-आदर बाळगणे, मान देणे, मूळसिंचने-मूळाला पाणी घालणे, शाखापल्लव-फांद्या व पाने यांना टवटवी येणे, समुद्रावगाहन-समुद्रस्नान, सकळा-सर्व, अभिवंदिला-नमस्कार केला, उद्यान-बाग, बगीचा, प्रमेयमहानिधि- अनेक सिध्दांताचा मोठा साठा.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) विश्वाला कोण मोहून टाकते?
२) ज्ञानेश्वरांनी प्रथम कोणाला वंदन केले आहे?
३) ज्ञानेश्वरांच्या हृदयात कोण आहे?
४) समुद्रस्नानानें काय घडते?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) गुरुभक्तीचे महात्म्य सांगण्यासाठी ज्ञानेश्वरांनी कोणती उदाहरणे दिली आहेत?

२) ज्ञानेश्वरांच्या मुखावरती विजयवृत्ती केंव्हा दिसून आली?

३) साधकाला गुरु भेटल्यानंतर काय वाटते?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "मज हृदयीं सद्‌गुरु । जेणे तारिलों हा संसारपूरु ।
म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ।।"

२) "कां तीर्थे जियें त्रिभुवनी । तियें घडती समुद्रावगाहनीं ।
ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ।।"

**उ) टीप लिहा.**

**१) गुरुमहिमा**

**ऊ) उपक्रम**

ज्ञानेश्वराचे पसायदान वाचा.

****

# ३. संतवाणी

## अ. मनुष्य करिसी

### संत नामदेव (सन् १२७०-१३५०)

ज्ञानेश्वरसमकालीन कवी आणि संत. संत निवृत्ती, संत ज्ञानेश्वर आदींची चरित्रे अभंगातून पहिल्यांदा त्यांनीच लिहिली. कीर्तन, अभंग पदे रचून भ्रमंती करुन वारकरी पंथाचा अगदी पंजाबपर्यंत प्रचार केला. मराठी, हिंदी आणि पंजाबी भाषेतही त्यांनी रचना केली. पंजाबातील गुरुग्रंथसाहिब मध्ये त्यांचे पदे 'नामदेवजीकी मुखबानी' या नावाने समाविष्ट आहेत. घराण्यात पूर्वीपासून चालत असलेल्या विठ्ठलभक्तीमुळे बालपणापासून ते विठ्ठलभक्त बनले.

प्रस्तुत अभंग विठ्ठलभक्तीपर असून. त्यांना लागलेली विठ्ठलाची ओढ आणि आसक्ती त्यात दिसते. मानव, कुत्रा, पक्षी, झाड, पाषाण, उदक, असा कोणत्याही रुपात जन्म मिळाला तरी विठ्ठलाच्या जवळच मी राहीन असे नामदेव या अभंगात म्हणतात. उत्कट भक्ती आणि त्यासाठी योग्य प्रतिमांची निवड केल्याने हा अभंग अतिशय सुंदर झाला आहे.

---

मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें । तुझें द्वारी वसें ऐसें करी
श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें । तुझे द्वारी वसें ऐसें करी
पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषें। तुझे द्वारी वसें ऐसें करी
झाड करिसी तरी तुळसीचेनि मिषें । तुझें द्वारी वसें ऐसें करी
वृक्ष करसी तरी मंडप मखाचेनि मिषें । तुझें द्वारी वसें एसें करी
पाषाण करिसी तरी रंग शिळेचेनि मिषें । तुझे द्वारी वसे ऐसें करी

उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें । तुझें द्वारी वसें ऐसे करी
नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें । तुझें द्वारी वसें ऐसें करी

**शब्दार्थ**

मिषे-निमित्ताने, द्वारी-दारांत, उच्छिष्ट-उष्टे, चारियाचेनी-चरण्याच्या निमित्ताने, मखा-लाकडी मखर, (कमान), रंगशीळा-देवाच्या मूर्तीपुढील पसरट मोठा दगड, उदक-पाणी, सडिया-सडा.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) संत नामदेवांना कोणाची ओढ लागली आहे?

२) संत नामदेवांनी लोकजीवनातील कोणत्या प्रतिमा आपल्या अभंगात वापरल्या आहेत?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) प्रस्तुत अभंगातून विठ्ठलभक्ती संबंधी संत नामदेवाचे विचार सांगा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें । तुझें द्वारी वसें ऐंसें करी"

**उ) टिप लिहा.**

१) संत नामदेवाची विठ्ठलभक्ती

**ऊ) उपक्रम**

संत नामदेवांचे संत चरित्रपर अभंग मिळवून त्यातून संतांची माहिती जाणून घ्या.

****

# ब. विठु माझा लेकुरवाळा

**संत जनाबाई**
**(समाधी-१३५०)**

संत नामदेवाच्या परिवारातील थोर संत कवयित्री. जन्मगांव मराठवाड्यातील गंगाखेड मात्र संपूर्ण आयुष्य नामदेवांच्या घरी गेले. त्यामुळे नामयाची दासी असा स्वतःचा उल्लेख त्या करतात. नामदेवचरित्र, हरिश्चंद्रआख्यान, सेना न्हावी चरित्र प्रल्हाद चरित्र, ज्ञानेश्वरस्तुती, कृष्णजन्म बालक्रीडा व कालापदे असे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. सोप्या आणि साध्या अभंगामुळे लोकप्रियता. अभंगात भावनेचा उत्कट अविष्कार आणि कोमल भाव व्यक्त होतो.

प्रस्तुत अभंगात जनाबाईने विठ्ठलाचे कुटुंबवत्सल रुप रेखाटले आहे. सर्व संत ही देवाची लेकरे आहेत. असा भावही त्यात व्यक्त झाला असून विठ्ठलाचे पितृवात्सल्य लोभस आहे.

---

विठु माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात करी ।।

पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडिवरी । चोखा जीवा बरोबरी ।।

बंका कडियेवरी । नामा करांगुली धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

**शब्दार्थ**

लेकुरवाळा-पोरबाळे असलेला, बंका-संतबंकामहार,
करांगुली-करंगळीचे बोट.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) संत जनाबाईचे जन्मगांव कोणते?

२) संत जनाबाईने आपल्याला कोणाची दासी म्हणून संबोधले आहे?

३) 'लेकुरवाळा' हा शब्द कोणास उद्देशून वापरला आहे?

४) संत जनाबाईने भक्तांच्या सोहळ्यात कोणाकोणाचा समावेश केला आहे?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) संत जनाबाईच्या अभंगाचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।"

**ऊ) उपक्रम**

विठ्ठलाची संतानी रेखाटलेली विविध रुपे अभंगाच्या आधारे शोधा.

****

# क. हीन याती माझी देवा

## संत चोखामेळा (१४ वे शतक)

संत ज्ञानेश्वरांच्या पंथातील संतकवी. जन्मकाळ अनिश्चित. मूळ गाव पंढरपूर जवळील मंगळवेढा कामगार म्हणून कामावर असताना गावकूस कोसळून अपघाती मृत्यू. पंढरपुरातील विठ्ठलमंदीराच्या महाद्वारात संत नामदेवांनी त्यांची समाधी बांधली. दलित समाजात जन्मास आल्यामुळे तत्कालीन समाजात अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे त्यांच्या अभंगात विठ्ठलभक्ती बरोबरच पद-दलितांचे दुःखही चित्रित झाले आहे.

प्रस्तुत अभंगात, आपण अस्पृश्य असल्याने देव बाटेल म्हणून पुजारी विठ्ठालाजवळ येऊ देत नाही. त्यामुळे देवाची सेवा घडू शकत नाही. हाताचा स्पर्श झाला तरी पाणी शिंपडून लोक स्वतःला शुध्द करुन घेतात, अशी खंत व्यक्त होते.

---

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीती ।।
माझा लागतांची कर । सिंतोडा घेताती करार ।।
माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ।।

**शब्दार्थ**

याती-जात, कवण्यारीती-कोणत्यारीतीने, कर-हात, करुणा-दया, भाकी-आश्वासन दे अशी विनवणी करतो.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) संत चोखामेळा यांचे मूळ गांव कोणते?

२) संत चोखामेळ्यास कोणास भेटण्याची ओढ लागली आहे?

३) संत चोखामेळ्याला विठ्ठलाजवळ का येऊ देत नाहीत?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) 'हीन याती माझी देवा' या अभंगातून संतचोखामेळा कोणती खंत व्यक्त करतात?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा।"

**ई) उपक्रम**

संत चोखोबांच्या अंभागाच्या आधारे तत्कालीन समाजाचे स्वरुप समजावून घ्या.

✻✻✻✻

# ड. चंदनाचे हात पायही चंदन

## संत तुकाराम (१६०८-१६५०)

थोर क्रांतिकारक कवी. जन्म पुण्याजवळील देहू येथे. जन्माने कुणबी व व्यवसायाने वाणी. संसारात संकटे आल्यामुळे परमार्थाकडे वळले. देवाचे दर्शन झाल्यावर त्यांना खऱ्या भक्तीचे व परमेश्वराचे दर्शन झाल्यावर देव, धर्म, भक्तीतील ढोंग, कर्मकांड यावर तुकोबांनी आपल्या अभंगातून कठोर प्रहार केले व समाज-जागृती केली. तुकोबांनी लिहिलेले सर्व अभंग तुकोबांची गाथा या ग्रंथात समाविष्ट आहेत.

प्रस्तुत अभंगात सज्जन पुरुषांची लक्षणे सांगितली आहेत. त्यासाठी चंदन, परिस, दिवा, साखर अशा उपमा त्यांनी वापरुन त्यांनी गंध, स्पर्श, रुप, दृश्य आणि रस संवेदनाच्या माध्यमातून संत-सज्जन अंतर्बाह्य पवित्र असतात, त्यांच्यात अवगुण शोधूनही सापडत नाहीत असे सांगितले आहे.

---

चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाही हीन कोणी अंग ।।१।।
दीपा नाही पाठी पोटी अंधकार । सर्वांगी साकर अवघी गोड ।।२।।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहता अवगुण मिळेचि ना ।।३।।

**शब्दार्थ**

परीस-स्पर्शाने लोखंडाचे सोने करणारा काल्पनिक दगड, दीपा-दिवा, साकर-साखर, अवगुण-दोष.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) संत तुकारामांचा जन्म कोणत्या गांवी झाला?

२) प्रस्तुत अभंग संत तुकारामांच्या कोणत्या ग्रंथातून घेतला आहे?

३) संत तुकारामांनी आपल्या अभंगात कोणाची लक्षणे सांगितली आहेत?

४) प्रस्तुत अभंगातून लोकजीवनातील कोणत्या उपमा वापरल्या आहेत?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) संत तुकारामांनी सांगितलेली सज्जन पुरुषाची लक्षणे सांगा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहता अवगुण मिळेचि ना ।"

**ऊ) उपक्रम**

तुकोबांचे समाज उपदेशपर अभंग मिळवून वाचा.

***

# ४. सीतागीत

## परिचय : मोरोपंत (१७२९-१७९४)

महत्वाचे पंडित कवी. जन्म कोल्हापूर जवळील पन्हाळा येथे लहानपणापासून कविता करण्याचा छंद. विपुल काव्यलेखन. संपूर्ण महाभारताचे आर्यावृत्तात आर्याभारत या नावांने रुपांतर केले. कृष्णविजय, हरिवंश, हरिशचंद्रख्यान, प्रल्हादविजय इ. आख्याने. आर्याकेकावली, श्लोककेकावली संशयरत्नमाला या काव्यरचना तर सावित्रीगीत, रुक्मिणीगीत, सीतागीत अशा सुबोध गीतकथा लिहिल्या.

प्रस्तुत रचना सीतागीत असून ते धावते गीतकाव्य- म्हणजे झोपाळ्यावरील ओव्या आहेत. यातून वनवासातील सीतेच्या स्त्रीसुलभ भावना व्यक्त झाल्या आहेत. शूर्पणखेची विटंबना झाल्यामुळे चिडलेल्या रावणाने मारीच नावाच्या दैत्याला सुवर्णमृगाचे रुप घेऊन पाठवले. सीतेने त्या मृगाचा हट्ट धरला म्हणून रामाने पाठलाग केला असता मारीचाने हूबेहूब रामाचा आवाज काढून लक्ष्मणा धाव अशी आरोळी ठोकली. हा आवाज रामाचा नाही असे लक्ष्मणाने सांगताच सीतेने त्याला बोल लाविला, त्याचा पुढे सीतेला खेद झाला. तो इथें व्यक्त झाला आहे.

---

भावोजींनीं केली माझी बहु सेवा । ती त्या महा-देवा ठावी असे ।।१।।
तेथें शूर्पणखी भार्या व्हाया आली । तिला माझी भ्याली चित्त-वृत्ती ।।२।।
भावोजीनीं तिचा कर्ण-नासा-छेद । केला, कीं ते वेद-शास्त्रर्थज्ञ ।।३।।
तिचा भाऊ खर होउनियां क्रुध्द । करावया युध्द आला बाई ।।४।।

चवदा सहस्त्र राक्षस पापिष्ठ । रणीं केलें पिष्ट स्वामीनीं ते ।।५।।
तिणे घ्राण-रक्तें मुख मळवीलें। वृत्त कळविलें रावणासी ।।६।।
छळाचा उपाय मनी आठवीला । दृष्टें पाठवीला माया-मृग ।।७।।
स्वर्ण-रत्न-मय मृग म्यां देखीला । तो सत्य लेखिला मनामध्यें ।।८।।
गृहा आणावया मागे हरीणा मी । दुःख परिणामी नेणोनियां ।।९।।
मज रक्षावया लक्ष्मणा ठेवूनी । निघाले घेऊनी धनुर्बाण ।।१०।।
माया-मृगामागें जगदेक-शूर । गेले बहु दूर अरण्यांत ।।११।।
कपटी राक्षस जाणोनीया प्राण । घ्यावयासी बाण मोकलीला ।।१२।।
तो बाण लागतां हृदय विदारी । दुष्ट हाक मारी स्वामी-वाणी ।।१३।।
'हा सीते हा बंधो लक्ष्मणा ये धांवें । अंत-काळीं पावें, भेटावया' ।।१४।।
मज वाटे माझ्या स्वामीचीच हाक । शिरे कंप धाक हृदयांत ।।१५।।
'मी म्हणे, भावोजी धांवा रक्षा प्राण । हे घ्या चाप-बाण उठा वेगीं' ।।१६ ।।
भावोजी म्हणती, 'राक्षसांची माया । कोण राम-राया पाहों शके' ।।१७ ।।
वाटले ते वाक्य सत्य परी खोटें । झालें दुःख मोठें माझ्या मनी ।। १८।।
न वदावें तेंची बोलील्यें मी कोपें । चित शब्द-रोपें विदारिलें ।।१९।।
वांछितोसी दृष्टा अग्रजाचा घात । माझ्या आंगा हात लावावया ।। २०।।
हात लावीतांची सोडीन मी प्राण । शिरीं पाद-त्राण कोण वाहे ।।२१।।
माझ्या दृष्टीपुढें नको राहों साच । नरकीचा जाच मूर्त तूंची' ।।२२।।
ऐशी बाई माझी ऐकतांची वाणी । डोळां आलें पाणी भावोजीच्या ।।२३।।
मातेनें दापीता वत्स पित्याकडे । जाय तैसें घडे लक्ष्मणासी ।।२४।।
साधूसी गांजीतां झालें सध्या फळ । सज्जनाचा छळ करु नये ।।२५।।
वाटेंत धनुष्यें ओढेनिया रेघ । गेले दया-मेघ स्वामीकडे ।।२६।।

**शब्दार्थ :-**

भावोजी-दीर, शूर्पणखा-रावणाची बहीण, भार्या-पत्नी,कर्ण-नासा, कान व नाक, क्रुध्द-संतापून, पिष्ट-पीठ, येथे चुराडा, गृहा-घरी, मोकलीला-सोडला, चाप-बाण-धनुष्यबाण, अग्रज-थोरला भाऊ, दापिता-रागावणे.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) शूर्पणखा ही कोणाची बहीण होती?
२) लक्ष्मणाने शूर्पणखेची विटंबना कशी केली?

३) मायावी सुवर्णमृगाचे रूप कोणी धारण केले?

4) सीतेने कोणता हट्ट धरला?

५) मारीच राक्षसाने हूबेहूब कोणाचा आवाज काढला?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मोरोपंतांच्या सीतागीत मधील मारीच राक्षसाला मायावी रुप कां धारण करावे लागले?

२) सीतेच्या मनामध्ये खेद का निर्माण झाला?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "स्वर्ण-रत्न-मय मृग म्यां देखीला । तो सत्य लेखिला मनामध्यें ।।८।।
गृहा आणावया मागे हरीणा मी । दुःख परिणामी नेणोनियां ।।९।।"

२) ऐशी बाई माझी ऐकतांची वाणी । डोळां आलें पाणी भावोजीच्या ।।२३।।
मातेनें दापीता वत्स पित्याकडे । जाय तैसें घडे लक्ष्मणासी ।।२४।।

**ई) टीप लिहा.**

१) वनवासातील सीतेच्या स्त्रीसुलभ भावना.

**ऊ) उपक्रम**

मराठीतील सीतेच्या कहाण्या सांगणारी स्त्री गीते मिळवून त्यांचा संग्रह करा.

***

# ५. लटपट लटपट तुझे चालणे

## होनाजी बाळा

मराठीतील प्रसिध्द शाहीर जोडी होनाजी आणि बाळा. सयाजी शिलारखाने हे पिढीजात कवि घराण्यातले तर त्याचा साथीदार बाळा करंजकर शिंपी होता. होनाजी लावण्या लिहायचा तर बाळा चाली लावायचा. पेशव्यांचे आश्रित असलेला होनाजी कल्पक आणि संगीताचा जाणकार होता. होनाजीच्या लावण्यातून प्रेमाच्या विविध छटा नाजूकपणे प्रकट होतात.

ही होनाजी बाळा यांची प्रसिध्द लावणी असून तीत नायिकेच्या सौंदर्याचे व नजाकतीचे शृंगारिक वर्णन केले आहे.

---

लटपट लटपट तुझें चालणें मोठें नखऱ्याचें
बोलणें मंजुळ मैनाचें ध्रु.

वय वरुषें पंध्राचि दिसे चंद्राचि प्रभा ढवळी
आकृती लहान दिसे कवळी
दिसे नार सुकुमार मूद राखडी वेणिंत आवळी
नरम गोजरे गाल होट पवळी
रुपस्वरुपाचा झोक दिव्य नारि लोट चवळी
जशि चमके नागीन गवळी
तारुणपण अंगांत नोक मदनाचे जोराचे
बोलणें मंजुळ मैनाचें १

डुलत डुलत चालणें बोलणें बहु मंजुळवाणी
नाहिं कोणि दुसरी इजवाणी
इष्कि यार सरदार कैक सोडुन केविलवाणी

हिंडताती वेड्यावाणी
न पडे नख दृष्टींत कुठें सृष्टींत इच्या वाणी
फंदी झुरती मोरावाणी
लखलखाट चकचकाट जैसें दुकान बोहोऱ्याचें
बोलणें मंजुळ मैनाचें २

रुपसुर्तिचा डौल तेज अनमोल सगुण गहिना
जैसि का पिंजऱ्यातिल मैना
इच्यासाठिं कैकांची जनलोकांत झालि दैना
अशी ही चंचळ मृगनयना
मर्जि तुटेना भिड लोटेना जाला एक महिना
कधीं ग सांपडसिल निजभुवना
निर्मळ कोमळ कांती जैसी तुटती ताऱ्याचे
बोलणें मंजुळ मैनाचें ३

**शब्दार्थ**

वरुषें-वर्ष, प्रभा-तेज, मुद्-स्त्रियांचा केसातील एक अलंकार, पवळी-पोवळे-एक रत्नप्रकार, नोक-तऱ्हा, इजवानी-हिच्यासाठी, इष्क-प्रेम, फंदी-नादिष्ट, मृगनयना-हरिणासारखे डोळे असणारी, सुकुमार-नाजुक, बोहोऱ्याचें- जुने भांडी व साड्या घेऊन नविन साड्या विकणारा म्हणजे बोहोरा (त्यांचे भाड्यांचे दुकान कसे चकचकीत असते तसे तीचे रुप दिसते.) गहिना- दागिना, चंचळ-चंचल, मर्जि-मनाचा भाव, भिड-लोभ, निज भुवना-माझ्या हातात (जाळ्यात)

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) मंजुळ मैनेचे चालणे कसे होते?
२) कवितेतील मैनेचे वय किती आहे?
३) तिच्याकडे पाहून लोक कसे झुरत होते?
4) बोहोरा असे कविने कोणास म्हटले आहे?
५) मैनेच्या डोळ्यांना कविने कोणती उपमा दिली आहे?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) कवितेतील मैनेच्या अंगात कोण-क़ोणत्या तऱ्हा होत्या?

२) या कवितेतील मैनेचे वर्णन कविने कसे केले आहे?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "वय वरुषें पंध्राचि दिसे चंद्राचि प्रभा ढवळी
आकृती लहान दिसे कवळी"

२) "न पडे नख दृष्टींत कुठें सृष्टींत इच्यावाणी
फंदी झुरती मोरावाणी"

**ई) टीप लिहा**

१) लावणीतील सौंदर्य व शृंगार

**ऊ) उपक्रम**

'मऱ्हाटीलावणी' म.वा.धोंड, पट्टे बापुराव, रामजोशी यांच्या लावणी मिळवून वाचा.

***

# ६. मराठी माती

## कुसुमाग्रज

**परिचय : विष्णू वामन शिरवाडकर (१९१२-१९९९)**

मराठी साहित्य सृष्टीतील अग्रगण्य कवी आणि नाटककार 'कुसुमाग्रज' या नावाने कवितालेखन. याशिवाय कादंबरी, कथा, ललित निबंध इ. लेखनही त्यांनी केले आहे. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', 'मराठी माती', 'हिमरेषा', छंदोमयी', इत्यादि कवितासंग्रह प्रसिध्द. 'दुसरा पेशवा', 'कौंतेय', 'ययाति आणि देवयानी', 'नटसम्राट' ही गाजलेली नाटके इ. १९८८ साली 'ज्ञानपीठ पुरस्कार' देऊन त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कल्पनावैभव, उत्कटता, चिंतनशीलता, राष्ट्राभिमान आणि आवेशाने रसरसलेली भाषाशैली ही कवी कुसुमाग्रज यांच्या सर्वेखनाची वैशिष्ट्ये होत. नाट्यात्मकता हा कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिभेचा एक खास गुणधर्म आहे. १९६४ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

प्रस्तुत कवितेत मराठी मातीत जन्मलेल्या लोकांची माहिती सांगितलेली आहे. त्याचबरोबर माझ्या मराठी मातीला कुणी हिनवू नका असा दमही दिलेला आहे. त्याचबरोबर मराठी मातीचे महत्व सांगितले आहे.

---

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा,
हिच्यासंगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा.

हिच्या कुशीत जन्मले
काळे कणखर हात
ज्यांच्या दुर्दम धीराने
केली मृत्यूवर मात

कडे कपारीत उभी
हिच्या शिवाची देवळे,
तेज सरितांमधून
स्वाभिमानाचे ओहळे.

माझ्या मराठी मातीला
नका म्हणू हीनदीन
स्वर्ग लोकाहून थोर
मला हिचे महिमान.

दिवा झोपडीत मंद,
पेटे त्यावर मशाल.
तिच्या दीप्तीने उजळे
घर देशाचे विशाल.
रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी;
चारी वर्णातूनि फिरे
सरस्वतीची पालखी.

येथे देवाचे मंदिर
नाही श्रीमंत सोनेरी,
हिच्यासाठी रमापति
राहे वाळवंटावरी.

रसरंगात भिजला
येथे शृंगाराचा स्वर,

येथे अहंता द्रवली
झाले वसुधेचे घर.

माझ्या दरिद्री मातीचा
नका करू अवमान
हिच्या दारिद्रयात आहे
भविष्याचे वरदान

येथे फडकला झेंडा
विळ्याकोयत्यांच्यासाठी
खड्ग खंबीर राहिले
सदा कंगालांच्या पाठी.

नाही पसरला कर
कधी मागायास दान;
स्वर्ण सिंहासनापुढे
कधी लवली ना मान

हिच्या गगनात घुमे
आद्य स्वातंत्र्याची द्वाही;
हिच्या पुत्रांच्या बाहूंत
आहे समतेची ग्वाही.

अन्यायाची सुलतानी
कधी हिने ना साहिली;
आहे मृत्यूच्या दाराशी
हिच्या श्रध्देची हवेली.

**शब्दार्थ :-**

ललाटी-कपाळी, संग-सोबत, कुशी-पोट, दुर्दम-प्रबळ, सरिता-नदी, हीनदीन-हलकी व गरीब, विशाल-मोठा, अहं-गर्व, द्रवणे-पाघळणे,

खड्ग-तलवार, कंगाल-गरीब, कर-हात, लवणे-झुकणे, गगन-आकाश, धुमे-वाजे, साहणे-सहन करणे, शिळा-दगड.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कवी मराठी मातीचा टिळा कोठे लावा असे म्हणतो?

२) मराठी मातीच्या कुशीत कोणकोण जन्मले आहेत?

३) या मातीचा महिमा कसा आहे?

4) रत्नजडित अभंग-ओवी अमृताची सखी असे का म्हटले आहे?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मराठी मातीचा महिमा आपल्या शब्दांत लिहा.

२) मराठी मातीला हलकी समजू नका असे कवी का म्हणतो?

३) मराठी मातीतील लोकांची माहिती कोणत्या पध्दतीने सांगितली आहे?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी;
चारी वर्णतूनि फिरे
सरस्वतीची पालखी."

२) "येथे फडकला झेंडा
विळ्याकोयत्यांच्यासाठी
खड्ग खंबीर राहिले
सदा कंगालांच्या पाठी."

**ई) टिपा लिहा.**

१) मराठी मातीचा स्वाभिमान

२) आद्य स्वातंत्र्याचा महिमा

**ऊ) उपक्रम**

१) शिवाजी महाराज यांचे चरित्र वाचा.

२) केशवसुतांची ‘तुतारी’ कविता वाचा.

****

# ७. आईची आठवण

## माधव ज्युलियन

**परिचय : माधव त्र्यंबक पटवर्धन (जन्म १८९४-मृत्यू-१९३९)**

बडोदे या जन्मगांवी व आवळस येथे बालपण व शालेय शिक्षण, एल्फिस्टन कॉलेजमधून इंग्रजी व पार्शी विषय घेऊन एम. ए. १९१९ साली फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंग्रजी व पार्शीचे प्राध्यापक म्हणून सेवेत रुजू. १९२२ मध्ये रविकिरण मंडळाचे सदस्य १९२५ मध्ये अंमळनेर येथे शिक्षक म्हणून नेमणूक १९२८ मध्ये कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात पार्शी विषयाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती. १९३६ साली जळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष त्यांनी 'उपहासकाव्य', 'शिशुगीते', भक्तिपर कविता लिहिल्या. 'विरहतरंग', 'सुधारक तुटलेले दुवे', 'खंडकाव्ये', 'गज्जलांजली', 'स्वप्नरंजन' हे त्यांचे विविध काव्यसंग्रह प्रसिध्द.

प्रस्तुत कवितेत आईविना पोरकेपणाच्या जीवनाची व्यथा प्रकट केलेली आहे. एकाचवेळी आईपण व पत्नीव्रत सांभाळताना आईची झालेली त्रेधातिरपीट अवस्था तसेच पत्नीव्रताचे पालन करीत सती धर्म पाळला पण मातेचा धर्म मात्र तिला पाळता आला नाही. यातून मुलाची झालेली दयनिय आवस्था व एक आशावाद प्रकट झाला आहे. आईने पुनर्जन्म घ्यावा व पुन्हा त्याच आईच्या उदरी पुनर्जन्म मिळावा अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करणारा आशावाद प्रकट झाला आहे.

प्रेमस्वरुप आई! वात्सल्यसिंधु आई!
बोलावुं तूज आता मी कोणत्या उपायी?

तूं माय, लेकरुं मी; तूं गाय, वासरुं मी;
ताटातुटी जहाली, आता कसें करुं मी?

गेली दुरी यशोदा टाकूनि येथ कान्हा,
अन् राहिला कधीचा तान्हा तिचा भुका ना?

तान्हयास दूर ठेवी-पान्हा तरीहि वाहे-
जाया सती शिरे जी आगींत, शान्त राहे;

नैष्ठुर्य त्या सतीचें तूं दाविलेंस माते,
अक्षय्य हृत्प्रभूचें सामीप्य साधण्यातें.

नाही जगांत झाली आबाळ या जिवाची
तूझी उणीव चित्तीं आई, तरीहि जाची.

चित्तीं तुझी स्मरेना काहीच रुपरेखा,
आई हवी म्हणूनी सोडी न जीव हेका.

विद्याधनप्रतिष्ठा लाभे अता मला ही,
आईविणें परी मी हा पोरकाच राही.

सारे मिळे परंतू आई पुन्हा न भेटे,
तेणें चित्ताच चित्ती माझ्या अखण्ड पेटे.

आई, तुझ्या वियोगें ब्रह्मांड आठवे गे
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगें.

किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोती,
अव्यक्त अश्रुधारा की तीर्थरुप ओती!

ही भूक पोरक्याची होई न शान्त आई,
पाहूनिया दुज्यांचे वात्सल्य लोचनाही.

वाटे इथूनि जावें, तुझ्यापुढें निजावें,
नेत्री तुझ्या हसावें, चित्ती तुझ्या ठसावें,

वक्षी तुझ्या परी हें केव्हा स्थिरेल डोकें?
देईल शान्तवाया हृत्स्पन्द मन्द झोके?

घे जन्म तूं फिरुनी, येईन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी!

**शब्दार्थ :-**
नैष्ठुर्य- निष्ठुर, अक्षय-अढळ, ऱ्हतप्रभुचे-दयाळू, सामीप्य-जवळीकता, आबाळ-हालअपेष्टा, हेका-हट्ट, पोरका-अनाथ, चित्ता-अग्नी, चित्त-मन, विद्याधन-विद्यरुपी धन, वियोग-ताटातुट, ब्रम्हांड-विश्व, उल्का-एक नक्षत्र, तारे, विदेह-देह नसलेला, अव्यक्त-व्यक्त न करता येण्यासारखा, दुजां-दुसरा, लोचन-डोळा, ठसणे-अंतःकरणात रुतून बसणे, वक्ष-स्तन.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कवीने गाय व वासरुं हे रुपक कोणास वापरले आहे?
२) कवीतेतील यशोदा कोणास टाकून गेली?
३) विद्या, धन, प्रतिष्ठा मिळाली तरी कवितेतील नायक कोणाविना पोरका आहे?
४) बाळाला कोणाच्या कुशीत शांत झोप येते?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

**१)** माधव ज्युलियनांच्या आईची आठवण या कवितेतील बाळाची झालेली अवस्था यावर सविस्तर उत्तर लिहा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** “सारे मिळे परंतू आई पुन्हा न भेटे,
तेणें चित्ताच चित्ती माझ्या अखंड पेटे..”

२) "घे जन्म तूं फिरुनी, येईन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी!"

**ई) टीप लिहा**

१) पोरकेपणाची व्यथा

**ऊ) उपक्रम**

१) 'आई' वरील कविता मिळवून वाचा.

***

# ८. संसार

**बहिणाबाई चौधरी**

## परिचयः बहिणाबाई चौधरी (१८८०-१९५१)

जळगांव जवळील आसोदे या गांवी शेतकरी कुटुंबात जन्म. निरक्षर असूनही त्यांच्याजवळ विचारांच्या मोत्याची खाण होती. त्यांना लाभलेल्या दुःखमय आयुष्यावर भरभरुन प्रेम केले. देवावर आणि दैवावर विसंबून राहणे त्यांना मान्य नव्हते. शेतीची नित्यनियमाची कामे करीत आपल्या खानदेशी, वऱ्हाडी बोलीभाषेतून गाणी लिहिली. 'बहिणाईची गाणी' हा त्यांचा कविता संग्रह प्रसिध्द आहे.

"आधी कष्ट मग फळ" हा सफल संसाराचा मंत्र आहे. संसार खोटा आहे. असे म्हणणे म्हणजे मंदिराच्या कळसाला लोटा म्हणणे होय. संसार म्हणजे रडणं, कुढणं नव्हे. तो गळ्यातील हार आहे. त्याला लोढणं म्हणू नये. संसार थोडा कडू व बराच गोड असतो. दुसऱ्याचा विचार प्रथम करायला शिकवितो तो संसार. त्या दुसऱ्याच्या प्रगतीसाठी आपण कष्ट केले पाहिजे हे ही संसार शिकवितो. असामान्य संसाराची स्वप्ने पहाणाऱ्या बहिणाबाईंचे विचार या संसार कवितेत दिसून येतात.

प्रस्तुत कवितेत वेगवेगळ्या उदाहरणांनी संसाराची महती केली आहे.

अरे, संसार संसार
जसा तावा चुल्हयावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर ।

अरे, संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही ।

अरे, संसार संसार
नही रडनं कुढनं
येड्या, गयातला हार
म्हनू नको रे लोढनं ।

अरे, संसार संसार
खीरा येलावऱ्हे तोड
एका तोंडा मधी कडू
बाकी सर्वा लागे गोड ।

अरे, संसार संसार
म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
मधी गोडंब्याचा ठेवा ।

देखा संसार संसार
शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
मधी चिक्ने सागरगोटे ।

ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दुःखाले होकार
अन सुखाले नकार ।

देखा, संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद उधार
सुखादुःखाचा बेपार ।

अरे, संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार

असा संसार संसार
आधी देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
मंग जीवाचा आधार ।

**शब्दार्थ**

मियते-मिळणे, कयसाला-कळसाला, गयातला-गळ्यातला, खीरा-निंबोणीच्या आकाराचे गोड फळ, भिलावा-बिबा, भीमफूल-बिब्याला आलेली गोड फळ, गोडंबी-बिब्याच्या आतील गर, सागरगोटे-समुद्रातील गुळगुळीत दगड, नगद-रोख, बेपार-व्यवहार (व्यापार), मदार-सृष्टीचा सुत्रधार(जबाबदार), ईसार-संस्कार (बयाणा), जोजार-संसाराचा व्याप (ओझं)

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कवयित्रीच्या मते सफल संसाराचा मंत्र कोणता?

२) कवयित्रीच्या मते हाताला चटके बसल्याशिवाय काय मिळत नाही?

३) संसार हा कशाचा व्यापार आहे, असे कवयित्रीला वाटते?

4) कवयित्रीला कोणाचा आधार वाटतो?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) कवयित्रीचा संसार कसा असतो ते सविस्तर लिहा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "अरे, संसार संसार
जसा तावा चुल्हयावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर ।"

२) "ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दुःखाले होकार
अन सुखाले नकार ।"

**ई) टीप लिहा.**

१) संसाराची महती

**ऊ) उपक्रम**

१) 'बहिणाईची गाणी' हा कवितासंग्रह मिळवून वाचा.

****

# ९. पंचारती

## इंदिरा संत

**परिचय :** इंदिरा नारायण संत (१९१४-२०००)

कवयित्री, कथाकार, ललित लेखिका, शालेय काळात काव्यलेखनास प्रारंभ 'सहवास' हा पहिला काव्यसंग्रह; 'श्यामली', 'कदली', 'चैत्', हे कथासंग्रह प्रकाशित. 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ' 'रंगबावरी' 'बाहुल्या' 'गर्भरेशीम', 'चित्कळा', 'वंशकुसुम','निराकार', हे त्यांचे कवितासंग्रह; 'मृदगंध', 'मालनगाथा' हे ललित लेखांचे संग्रह तसेच लोकगीतांचे संकलन व संपादनाची इतर पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत.

प्रस्तुत कवितेत सुजलाम सुफलाम महाराष्ट्राचे तसेच महाराष्ट्राच्या खाणीत जसे अनेक शूर वीर होऊन गेले, तसे महदंबा, जनाई, बहिणाबाई, अहिल्यादेवी, जिजाई, यांच्या सारख्या मानिनींही होऊन गेल्या. या सर्व तेजस्वी, कर्तृत्ववान, स्त्रियांच्या कार्यांचा गौरव कवयित्रीने या कवितेतून अतिशय भावनाशीलतेने व्यक्त केला आहे.

---

मराठीच्या महाराष्ट्रा<br>
आज स्वागत स्वागत<br>
सह्याद्रीच्या कड्यावरी<br>
वाजे वाऱ्याची नौबत !

काळ-कवाड फोडून<br>
आल्या आल्या साऱ्याजणी,<br>
महाराष्ट्राच्या स्वागता<br>
आज मानाच्या धनिणी !

शकुनाचा हाती दीप
महदंबा आधी येई,
रचे दीपांची आरास
धवळिल्या दिशा दाही !

नामयाच्या जनाईने
केले सडासंमार्जन,
हात अबीर-मंजिरी
गंधे भारिले गगन !

केली जळक्या काडीची
लक्ष्मीबाईने लेखण,
चित्रे रेखिली स्वागता
रंग प्राणाचे भरुन !

अहिराणी बहिणाबाई
आणी तव्याची भाकर
ओवाळून टाकायाला
उभी राहिली तत्पर !

देवी अहिल्येच्या हाती
पुण्यतीर्थाचा कलश,
नेत्र कराया पवित्र
उभी राहिली सहर्ष !

ओवाळाया महाराष्ट्रा
आज जिजाईच्या हाती,
कोटि सूर्याच्या तेजाने
उचंबळे पंचारती !

**शब्दार्थ**

आरास-ढीग, धनिणी-मालकिणी, सहर्ष-आनंदाने.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) वाऱ्याची नौबत कोठे वाजत आहे?

२) महदंबेच्या हाती कोणता दीप दिला आहे?

३) जळक्या काडीची लेखणी कोणी केली?

४) 'आधी हाताला चटके, मग मिळते भाकर' असे कोणी म्हटले?

५) पुण्य तीर्थाचा कलश कोणाच्या हातात आहे?

६) प्राणांचे रंग भरुन कोणी चित्र रेखाटले आहे?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** महाराष्ट्राच्या स्वागताला कोणकोणत्या मानाच्या धनिणी आलेल्या आहेत?

२) दीपांची आरास कोणी व कशासाठी रचली आहे?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "नामयाच्या जनाईने
केले सडासंमार्जन,
हात अबीर-मंजिरी
गंधे भारिले गगन !"

२) "ओवाळाया महाराष्ट्रा
आज जिजाईच्या हाती,
कोटि सूर्याच्या तेजाने
उचंबळे पंचारती !"

**ऊ) उपक्रम**

१) महाराष्ट्रात होऊन गेलेल्या थोर राष्ट्रीय स्त्रियांची माहिती गोळा करा.

✻✻✻

# १०. आनंदी पक्षी

**बालकवी.**

**परिचय : (त्र्यंबक बापूजी ठोंबरे) : (इ.स. १८९०-१९१८)**

आत्मनिष्ठ निसर्ग कवी, निसर्ग आणि निसर्गाचे घटक हे त्यांच्या कवितांचे मुख्य विषय आहेत. निसर्गाच्या विविध रुपातून बालकवींना दिव्यतेचा भव्यतेचा साक्षात्कार झाला. निसर्गाबद्दलच्या हळुवार भावना तेवढ्याच हळुवार शब्दांत व्यक्त करताना बालकवींनी आपले सारे कौशल्य पणाला लावले आहे.

आनंदी पक्षी ही कविता सुबोध परंतु सामान्यतेच्या पातळीवर राहणारी आहे. निरागस अक्षय आनंदाचं प्रतीक म्हणून गणली जाते. असा आनंद मानवाच्या जीवनात अवतीर्ण व्हावा ही कवीची इच्छा आहे.

---

केव्हां मारुनि उंच भरारी। नभांत जातो हा दूरवरी,
आनंदाची सृष्टी सारी । आनंदें भरली. १

आनंदाचे फिरती वारे। आनंदानें चित्त ओसरे,
आनंदें खेळतो कसा रे । आनंदी पक्षी! २

हिरवें हिरवें रान विलसतें। वृक्षलतांची दाटी जेथें,
प्रीती शांती जिथें खेळते । हा वसतो तेथें ३

सुंदर पुष्पें जिथें विकसलीं। सरोवरीं मधु कमलें फुललीं
करीत तेथें सुंदर केली । बागडतो छंदें. ४

हासवितो लतिकाकुंजांना । प्रेमें काढी सुंदर ताना;
आनंदाच्या गाउन गाना । आनंदें रमतो. ५

जीवित सारें आनंदाचें । प्रेमरसानें भरलें त्याचें;
म्हणोनिया तो रानीं नाचे । प्रेमाच्या छंदें ! ६

आम्हांकरितां दुर्धर चिंता । नाना दुःखें हाल सभोंता,
पुरे ! नको ही नरतनु आतां । दुःखाची राशी ! ७

बा आनंदी पक्ष्या, देई । प्रसाद अपुला मजला कांहीं,
जेणें मन हें गुंगुन जाई । प्रेमाच्या डोहीं, ८

उंच भराऱ्या मारित जाणें । रूप तुझें तें गोजिरवाणें !
गुंगुन जाइल चित्त जयानें । दे, दे तें गाणें ! ९

**शब्दार्थ :-**

दुर्धर-असह्य, चित्त-मन, विलसते-फुलते, विकसली-फुलली, लतीकाकुंज-वेलींची बाग, नरतनु-मानवी देह.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कविकल्पनेतील पक्षीसृष्टी कशाने भरली आहे?
२) कवितेतील पक्षी कोठे कोठे प्रवास करतो ?
३) पक्ष्यांना कोणती चिंता सतावत नाही?
४) कवी मानवाकरिता देवाकडे कोणते मागणे मागतो?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) कविच्या नजरेतील पक्षी जीवन व मानवी जीवनाची तुलना कवीने कोणकोणत्या उदाहरणाने सांगितले ते लिहा.

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "बा आनंदी पक्ष्या, देई । प्रसाद अपुला मजला कांहीं,
जेणें मन हें गुंगुन जाई । प्रेमाच्या डोहीं,"

२) "हिरवें हिरवें रान विलसतें। वृक्षलतांची दाटी जेथें,
प्रीती शांती जिथें खेळते । हा वसतो तेथें "

**ई) टीप लिहा.**

१) मानवी जीवन व पक्षी जीवनातील रहस्य.

**ऊ) उपक्रम**

१) पक्षी जीवनावर आधारित मारुती चितमपल्ली यांचे पक्षीवर्णन पुस्तक मिळवून वाचा.

***

# ११. तेंव्हा जीवन मला कळू लागले

**वामन कर्डक**

**परिचय :** वामन कर्डक (१५ ऑगष्ट १९२२-१५ मे २००४)

जन्म नाशिक जिल्ह्यातील तालुका सिन्नर मधील, देशवंडी या लहान खेड्यात झाला. वडीलांचे नांव तबाजी कर्डक. आईचे नांव सईबाई. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झंझावाती विचारांने प्रभावीत होऊन काव्यलेखनास प्रारंभ. प्रतिकूल परिस्थितीत त्यांना जीवन कंठावे लागले. जवळजवळ ५५ वर्षे ते काव्य लेखन करीत राहिले. प्रामख्याने त्यामध्ये भीमगीते व लोकरंजनाबरोबरच लोकशिक्षणाचे विचारधन खेड्यापाड्यातील अती सामान्य बांधवापर्यंत पोहोचविले. या कार्याची पोच पावती म्हणून त्यांना 'लोककवी' ही उपाधी मिळाली. तसेच 'भीमशाहीर' अशी गौरव उपाधी प्राप्त झाली. त्यांची वाणी आणि लेखणी मानव मुक्तीच्या लढ्यासाठी कार्यरत राहिली.

या कवितेत कवीने जीवनाच्या दाहकतेचे वर्णन केले आहे. जीवनातील चढउतार व त्यातून जीवन जगण्याचा केविलावाणा प्रयत्न करणारा वर्ग व त्यांच्या जीवनाची कशी ससेहोलपट होत आहे. जीवन जगणे कसे कठीण झाले आहे. याचा प्रत्यय या कवितेत येतो.

---

केस माझे हे जेव्हां गळू लागले
तेव्हां जीवन मला हे कळू लागले ।।धृ ।।

गात होतो पुढे, जात होतो पुढे
हात होतो पुढे, त्यात होतो पुढे
पाय त्यांचेच मागे वळू लागले तेव्हां...।।१।।

बाग मागे आणि आग होती पुढे
पंख पसरीत गेलो मी ज्योतिपुढे
पंख सारेच तेथे जळू लागले । तेव्हां...।।२।।

एक सेवक होऊन सेवा दिली
लोक उलटून म्हणतात केव्हां दिली
बोल उलटे हे जेव्हां मिळू लागले । तेव्हां...।।३।।

गोडी होती मधाची मला जोवरी
लाख लटकून होते मोहोळा परी
संपता अर्क सारे पळू लागले । तेव्हां...।।४।।

काल वामन परी पेरण्या ही कला
येत होते आणि नेत होते मला
जाणे माझे हे तेथे टळू लागले । तेव्हां...।।५।।

**शब्दार्थ**

लटकून-लोंबकळत. बाग-बगिचा. ज्योती-दिवा. उलटून-परत फिरुन. संपता-सर्व संपल्यानंतर. मोहोळ-मधमाशांनी जमवलेल्या मधाची पोळी व त्यावर बसलेल्या मधमाशा. अर्क-मध. पेरण्या-पसरवत जाणे.

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कवीला जीवन केंव्हा कळू लागले?
२) कवीचे पाय मागे का वळू लागले?
३) ज्योतीवर प्रेम कोण करतो?
४) मोहोळातला मध संपल्यानंतर काय झाले?
५) कवी कशाची पेरणी करत आहे?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** 'तेंव्हा जीवन कळू लागले' या कवितेतून कविला जीवन विषयक अनुभव कसा सुचवायचा आहे ते लिहा?

२) 'मोहोळ' मधमाशा, व मानवी जीवनातील प्रसंग यातून कवीला काय सुचवायचे आहे?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "गोडी होती मधाची मला जोवरी
लाख लटकून होते मोहोळा परी"

२) "बाग मागे आणि आग होती पुढे
पंख पसरित गेलो मी जोतिपुढे"

**ई) उपक्रम**

१) बा. भ. बोरकरांची 'जीवन त्यांना कळले हो' कविता वाचा.

***

# १२. रबीची पेरणी

## फ. म. शहाजिंदे

**परिचय : फकीर मेहबूब शहाजिंदे (सास्तूरकर) (१९४९)**

यांच्या कवितेत शेतकऱ्यांच्या जगण्याची विविध संदर्भ अभिव्यक्त होतात. महात्मा फुले यांच्या विचारांची समृध्द परंपरा घेऊन त्यांची कविता ग्रामीण जीवनाचा आशय व्यक्त करते. त्यांच्या कवितेत शेतकरी व शेतमजुरांच्या समस्या प्राधान्याने चित्रित झाल्या आहेत.

त्यांचे 'निधर्मी', 'आदिम' हे कविता संग्रह आणि 'मी तू' ही कादंबरी प्रसिध्द. 'शेतकरी' हे खंडकाव्य बहुचर्चित ठरले आहे.

प्रस्तुत कवितेत प्रतिमा अलंकार इ. बाह्य आवरणांचा आसरा फारसा घ्यावा लागत नाही. आशय थेट व्यक्त करत असताना त्यांची भाषा अल्पाक्षरी बनते. हे त्यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य होय.

---

आता रबीची पेरनी करायची हाय
तर चाडं नवेच करुन घेवं लागनार
सुतार पाटलाला गोड बोलावं लागत्यय
च्या पानी करावं लागत्यय
तवा कुटं मनासारकं काम व्हत्यय
नाही तर मग पेरनी खोळंबली समजा
आगाताची पेरनी रबीहून जरा सोपी हाय
रबीच्या पेरनीत बैलवाला लई ताप व्हत्यय
हातावर भाकर घिवून जेवावं लागत्यय
एक दोन दिवसांनी बी जर का

पेरनी लांबली तर दनक्याला फरक, पडत्यय
येळला लई महत्व हाय
आन त्येच्यातबी चित्ती नक्षीतराचं
एकांदा पावूस आपटून पडला तर
मग समदं पेरलेलं रानच फिरत्यय
झक मारुन डबल पेरनी करावी पडतिया
एक तर हाय? काय करावं?

**शब्दार्थ :-**

रबी-खरीप पिकानंतर घेतले जाते ते पीक.
खोळंबणे-थांबणे, चाडं-धान्य पेरण्याचे एक साधन, आगात-खरीप
नक्षीतर-नक्षत्र, चित्ती-नक्षत्रांचं एक नांव

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) रबीची पेरणी करावयाची असताना शेतकऱ्याला काय करावे लागते?
२) आगाताची पेरणी कशाहून सोपी आहे?
३) रबीच्या पेरणीत शेतकऱ्याला काय करावे लागते?

**आ) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

**१)** रबीची पेरणी या कवितेचा आशय स्पष्ट करा?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "पेरनी लांबली तर दनक्याला फरक, पडत्यय
येळला लई महत्व हाय"

**२)** "झक मारुन डबल पेरनी करावी पडतिया
एक तर हाय? काय करावं?"

**ई) उपक्रम**

१) शेतकऱ्यांच्या समस्या या विषयावर निबंध लिहा.

***

# १३. पोरी

## अनुराधा पाटील

**परिचय :**अनुराधा कौतिकराव पाटील (१९५३)

१९७५ नंतरच्या म्हणजे वयाच्या २५ व्या वर्षानंतर प्रसिध्द कवयित्री म्हणून त्या चिरपरिचीत झाल्या. त्यांनी त्यांच्या जीवनात विपुल साहित्य निर्मिती केली. त्यातील कांही निवडक काव्य संग्रहांना उदाः-दिगंत, तरीही, दिवसेंदिवस आणि वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ ह्या काव्यसंग्रहाना राज्यशासनाचे पुरस्कार व महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार. ग्रामीण पर्यावरणाशी निगडीत प्रतिमासृष्टी आणि स्त्रीचे संवेदन, आत्मसंवादाच्या बळावर प्रगल्भपणे जगण्याला सामोरे जाण्याची वृत्ती तरल प्रवाही शैली हे त्यांच्या कवितेचे विशेष.

प्रस्तुत कवितेत कवयित्रीने एका छोट्या मुलीचे भावी जीवन कसे जाईल यांचे भावपूर्ण कल्पनाचित्र रेखाटले आहे.

---

पुलाच्या कठड्यावर
पाय झुलवत बसलीय मुलगी,
मी विचार करते
ती मोठी झाल्यावर
इकडे उडी घेईल की तिकडे?
ती देईल मुलाला जन्म
की नुसत्याच मुली जन्माला घालून
गोवली जाईल
अक्षम्य अपराधाच्या साखळीत?

मी पाहते तिला
गरगरत्या आकाशपाळण्यात

वाहत्या वाऱ्याच्या
कानाशी बिलगून खिदळताना
जिथं जमिनीवरचे
पाय सुटण्याची भीती तिला
स्पर्शही करत नाहीय
पण पुढे अबाधित राहील तिचं
हे टिकलीबांगडीचं
चिमूटभर स्वातंत्र्य...?

की बाप नवरा मुलगा
परंपरेच्या या काटेरी कुंपणातच
अडकून पडेल तिचा पदर ?

तिला करता येईल
टकमक टोकावर उभं राहून
हाती न येणाऱ्या

झगमगत्या नक्षत्रावर
स्वतःला उधळून प्रेम?
की अंगवळणी पडलेल्या सवयीनं
ती मोजेल मुकाट
हमखास चुकणारे आयुष्याचे
पहिले पाढे पंचावन्न?

पोरी,
उपलब्ध नसतं कधीच
दुःखाला अर्थपूर्ण करणारं
कुठलंही रसायन
आणि आपले काळे पंख पसरून
ते कवेत घेतं
तुमचं उरलंसुरलं आकाश
म्हणून जगण्याच्या अंगानेच

उलगडत न्यावा लागेल तुला
तुझ्या झुलल्या झोक्याच्या दोराला
पडणारा पीळ
आणि स्वीकाराच्या दिशेनंच
मोजावं लागेल
तुझ्या जमीन अस्मानातलं अफाट अंतर.

**शब्दार्थ :-**

अक्षम्य-क्षमा न करण्यासारखे, हमखास-विशेषकरुन, कवेत-मिठीत, बगलेत, रसायन-सामग्री,

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) 'पोरी' या कवितेत स्वातंत्र्यासाठी कोणते विशेषण वापरले आहे?

२) पुलाच्या कठड्यावर पाय झुलवत कोण बसले आहे?

३) परंपरेच्या काटेरी कुंपणात कोण अडकून पडले आहे?

**आ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१)** परंपरेचे काटेरी कुंपण यातून कवयित्रीला काय सुचवायचे आहे?

२) अनुराधा पाटील मुलीला कोणता जीवनविषयक दृष्टीकोन देतात?

**इ) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

**१)** "म्हणून जगण्याच्या अंगानेच
उलगडत न्यावा लागेल तुला
तुझ्या झुलल्या झोक्याच्या दोराला
पडणारा पीळ"

**ई) टीप लिहा**

१) 'पोरी' या कवितेतील समाजातील संघर्ष

**ऊ) उपक्रम**

१) 'स्त्री' विषयक लेख वाचा.

***

# स्थूल वाचन विभाग

# १. बदलते बोरगांव

## डॉ.नागनाथ कोत्तापल्ले

**परिचय :** डॉ. नागनाथ लालुजीराव कोत्तापल्ले (जन्म १९४८) जन्म मुखेड (जि. नांदेड) येथे झाला. पुणे विद्यापीठातून मराठीत सर्व प्रथम आलेल्या डॉ. कोत्तापल्ले यांनी मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागातून १९७१ मध्ये कुलपतीचे सुवर्णपदक आणि कविवर्य मायदेव पारितोषिक मिळविले. पुणे विद्यापीठाचे माजी प्रमुख. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विद्यमान 'कुलगुरु'. युवा साहित्य चळवळीला दिशा देणारे विचारवंत ग्रामीण कथालेखक कादंबरीकार, कवि आणि समीक्षक २०१२-२०१३ वर्षाच्या चिपळूण येथील ८६ व्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड.

प्रस्तुत उतारा 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' या लेखातून घेतला आहे. औद्योगिक करण व शहरीकरण यांचेमुळे ग्रामीण जनजीवनात झालेले परिवर्तन तसेच शहरांच्या विस्तारामुळे आसपासच्या खेड्यामधील सुपीक जमीन नष्ट होत असल्याची खंत व्यक्त केली आहे.

---

एका सुप्रभाती शासनानं अध्यादेश काढला आणि बोरगांवसह पाच-पन्नास गावं महानगरच्या पंखाखाली आली. महानगरात राहणाऱ्या नोकरदार वर्गाला त्यामुळे वाढीव घरभाडे भत्ता मिळणार होता. इतरंही अनेक सोयी-सवलती उपलब्ध होणार होत्या. झालंच तर, महानगराच्या आसपास मोठे उद्योगधंदे स्थिरावणार होते. त्याचा फायदा महानगरचे उत्पन्न वाढविण्यात होणार होता. एकंदरीत काय, तो अध्यादेश म्हणजे

महानगराचा कायापालट करणारा देवदूतच होता आणि बोरगांवचे काय भवितव्य होतं कुणास ठाऊक !

अध्यादेश निघाला आणि काही महिने सामसूमच गेले आणि एके दिवशी महानगपालिकेची सिटी बस गावात येऊन उभी राहिली. बोरगावच्या लोकांनी बस पाहिली नव्हती असे थोडेच आहे ? पण त्यांना कुठं बाहेरगावी जायचं असलं अगर महानगराकडे जायचं असलं तरी महामार्गापर्यंत चालावं लागायचं. मग तिथे बस मिळायची आणि मग तीन-चार किलोमीटर अंतरावर असलेल्या महानगरात बोरगांवचे लोक यायचे. त्यांतले काही तर पायीच यायचे, पण आता थेट गावात सिटी बस येऊन थांबली होती. एवढेच नाही तर बोरगावाला जोडणारा कच्चा रस्ता चांगला डांबरी करण्याचं कामही लगोलग सुरु झालं. बोरगावच्या लोकांना किती आनंद झाला! आता थेट शहरापर्यंत बसनं जाता येईल. चालण्याचे श्रम वाचले. कॅालेजला, शाळांना जाणाऱ्या पोरांची तर फारच सोय झाली. सगळं गाव मोठे आनंदून गेलं. त्यांनी साखर वाटायचीच तेवढी शिल्लक ठेवली होती!

मग बस नियमित सूरु झाली. जाणाऱ्यांची संख्याही हळूहळू वाढू लागली. शाळा-कॅालेजच्या पोरांबरोबर इतरही काही मंडळी आता गंमत म्हणून शहराकडे फिरकू लागली. पूर्वी भजनामध्ये, कीर्तनामध्ये रमणारे चारचौघे आता सरळ सिनेमा थिएटरात जाऊन बसू लागले. पूर्वी सिनेमाला जायचं म्हणजे पायी चालावं लागायचं. आता तर काय, सरळ गावातच बस येऊ लागली. घरुन निघायचं आणि सरळ बसमध्ये बसायचं. हळूहळू भजनाला जाणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली. हे सिनेमापर्यंत होतं असं नाही. बोरगावची मंडळी आता महानगराचे घटक झाले होते. त्यामुळे स्वाभाविकपणेच त्यांना एक वेगळा आत्मविश्वास येऊ लागला होता.

बोरगावची गर्दी बघून की काय पण महानगरातल्या पांडोबा जाधवानं एक झोपडीवजा हॅाटेलच उभं केलं. हे हॅाटेल त्यानं उभं केलं ते नेमकं बोरगावचा रस्ता महामार्गाला जिथं मिळतो तिथं. परिणाम असा झाला की या हॅाटेल काश्मीरमध्ये महामार्गावरुन येणारे-जाणारे प्रवासी थांबू लागले. रात्रीच्या वेळी महानगरातले अधिकारी आणि श्रीमंत लोक

गाड्या घेऊन तिथे येऊ लागले. पाहता पाहता ते झोपडीवजा हॉटेल मोठं झालं. चार एकराच्या परिसरात पसरलं. पण पांडोबा जाधव मोठा हुशार. त्यानं त्या चार एकरात मोठा बगीचा लावला. डेरेदार झाडांच्या मधून हिंडताना काश्मीरमध्ये गेल्यासारखं काही लोकांना वाटायचं. मग त्यानं वेगवेगळ्या 'हट्स' उभारल्या. चार-पाच लोक एकत्र बसून जेवू शकतील अशा. केवढ्या सोयी केल्या होत्या त्या हॉटेलमध्ये. आणि सर्व काही मिळण्याची सोयही तिथं करण्यात आली होती. अशा काश्मीरमध्ये बोरगावच्या एखाद्या-दुसऱ्या माणसास जावेसे वाटल्यास आपणास नाव ठेवण्याचा अधिकारच काय? सगळ्या सुखसोयी काय शहरातल्या लोकानीच भोगाव्यात काय? आम्हा ग्रामीणांना काहीच का नको!

पण पांडोबा जाधव मोठे बुध्दीमान गृहस्थ होते. त्यांना बोरगावच्या गिऱ्हाईकांची फारशी चिंता नव्हती. शेवटी ती मंडळी येऊन येऊन किती येणार होती ? धंदा तर महानगरातल्या ग्राहकांवरच चालणार होता. बोरगावचे स्वस्त मजूर जरी पांडोबा जाधवांना मिळणार होते तरी गिऱ्हाईक शेवटी महानगरीतलंच होत ना? त्यांच्यासाठी पांडोबानी एक युक्ती शोधून काढली. त्यानी त्याठिकाणी एक हॉल बांधला, त्या हॉलचं वैशिष्ट्य असं होतं की आत आल्याबरोबर एखाद्या खेड्यातल्या घरात प्रवेश केल्यांसारखं वाटायचं. त्यांनी भिंतीना रंग दिलाच नाही. खेड्यातल्या कुडाच्या झोपड्या जशा आतून मातीनं लिंपून घेतात तसा काहीसा रंग त्यांनी भिंतीना दिला. त्यावर ड्रॉईंग काढलं तेही खेड्यातल्या भिंतीवर असतं तसं. म्हणजे दोन त्रिकोण एकमेकावर उभे करायचे आणि हातपाय काढून माणूस साकार करायचा. पशु-पक्षीही अशाच तऱ्हेनें काढायचे. खाली फरशी तर अजिबात नाही. रोज ताज्या शेणानं सारवायचं. त्या हॉलला पांडोबानं नांव दिलं. 'सुभोजनम्' आणि काय आश्चर्य, बाहेरच्या झोपड्या जशा रात्री भरायच्या तसंच आता हा हॉलही तुडुंब भरु लागला. अर्थात बोरगावची माणसं त्या हॉलमध्ये जात नव्हती हा भाग वेगळा. पण महानगरातल्या माणसांना मात्र केवढं आकर्षण. थेट खेड्यात गेल्यासारखं हो! पण पांडोबा एवढ्यावरच थांबले नाहीत. ते बोरगावमध्ये आता शिरू पाहत होते. त्यांना तिथं काही उद्योग, व्यवसाय करायचे होते. नाही तर बोरगाव इतर गावांच्या मानानं सुखी होता, समृध्द होता. गावाला तिन्ही बाजूनं वळसा घालून नदी जात

होती. नदीला पाणीही भरपूर असायचं. नाही म्हटलं तरी बोरगांवची शेती शंभर नंबरी होती...

पांडोबावर मात केली सुखलाल शेठनं. सुखलाल म्हणजे महानगरातील एक प्रस्थ होतं. गेल्या कित्येक पिढ्यांपासून पैसा कमावणं हे सुखलालच्या घराण्याचं ब्रीद होतं. पण सर्वात अधिक पैसा कमावला तो सुखलालनंच. तो वीस-बावीस वर्षाचा झाला तेव्हाचं त्याच्या लक्षात आले की, परंपरागत व्यापारापेक्षा जमीन खरेदी-विक्री करणे अधिक फायदेशीर आहे. आणि तो तेंव्हापासून जमिनी घेतो आहे. त्याचे प्लॉट्स पाडतो आहे. आणि विकतो आहे. आताही त्यानं ठरवून टाकलं की, बोरगावच्या आसपासची सगळी जमीन घेऊन टाकायची. छान जाहिरात करायची की, निसर्गरम्य परिसरात बंगले बांधून राहा वगैरे...आणि त्याला खबर लागली की, श्रीधरराव पवारांची पंचवीस एकर जमीन विकायची आहे.

ही बातमी कळल्याबरोबर सुखलाल नोटांनी भरलेली बॅग घेऊन पवारांच्या घरी हजर झाला. अतिशय दिमाखदार कार पवारांच्या दारापुढे उभी राहिली. आजूबाजूची पोरं सोरं सारी कार बघायला जमली...आणि पाहता पाहता सौदा ठरला. सुखलाल पवारांच्या शेतात उभं राहून दूरवरचा प्रदेश न्याहळत होता. या शेतातून हॉटेल काश्मीर सहज दिसत होतं. कोणाचं आहे? पलीकडे पवारांच्या भावकीची शेतं होती. त्याच्या पलीकडे गावातल्या एका कोळ्याचं थोडंसं रान होतं. त्याच्या पलीकडे काही गोरगरिबांचे छोटे छोटे असंख्य तुकडे होते. हे सगळे रान पाहता पाहता सुखलालच्या डोळ्यासमोर बोरगाव पासून महानगरापर्यंत असंख्य बंगले उभे असलेले दिसले. कल्पनेतल्या कल्पनेत त्यानं करोडो रुपयांचा हिशेब केला ही सगळीच शेतकरी मंडळी थोडीच त्याच्यापुढं जाणार होती! निघता निघता तो एवढंच म्हणाला, “पाटील, कोणाला विकायचं असेल तर आधी मला सांगा. योग्य भाव देऊ.” आणि खरोखर पुढच्या चार-पाच महिन्यानंतर अनेक शेतकरी येऊन सुखलालला भेटू लागले. इसार पावती करु लागले. त्या बिच्याऱ्यांना माहितच नव्हते की, शासनाने महामार्गाच्या दुसऱ्या बाजूनं मोठा औद्योगिक परिसर उभा करावयाचे ठरविले होते. त्या औद्योगिक परिसरासाठी बोरगाव हेच

जवळचे ठिकाण ठरणार होते. पाहता पाहता सुखलालने बरीच जमीन खरेदी केली. त्या जमिनीचे ले आऊट वगैरे मंजुर करुन घेण्याच्या तो मागे लागला. आणि पाहता पाहता दुसरेही अनेक इस्टेट एजंट आणि बिल्डर्स बोरगावमध्ये शिरले. सगळ्या गावात पैसा खुळखुळू लागला. शेतकऱ्यांनी एवढा पैसा कधीही पाहिला नव्हता. त्यामुळे तो कसा जपून ठेवावा हे त्यांना कुठं माहित होतं? बँकेत ठेवून व्याज मिळवणे, किंवा व्यापार करणे हे त्यांना कुठं जमत होतं...हा सगळा पैसा असाच जाणार होता. हळूहळू बोरगाव बदलत होतं तिथली मातीची घरं जाऊन काही सिमेंट काँक्रीटची घरे होऊ लागली होती. नाही म्हटलं तरी थोडी शानशौकीची वृत्ती वाढीस लागली होती. रोज नियमीत सिटी बसेस येऊ लागल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे विष पेरणारे लोक आता बोरगावात नियमित आणि सहज येऊ लागले होते. असं वेगळं व्यवस्थित चालू असताना एक आक्रीत घडलं.

त्याचं झालं असं की, विठ्ठलरावानं आपली पिढीजात शेती विकावयास काढली होती. तसा विठ्ठलरावाला शेतीत कधी फारसा रस नव्हता. तो दुसरे उपद्व्याप करीत बसायचा. पोरंही आता हाताशी येऊ लागली होती. पण विठ्ठलरावाच्या मनाने घेतले की शेती विकून टाकावी आणि पोरांना दुकानं, हॉटेलं वगैरे टाकून द्यावी. पोरांचीही त्याला ना नव्हती. त्यानं आपलं पाच एकराचं रान विकून टाकलं. त्याला सगळ्यात अधिक किंमत मिळाली होती. तो खूश होता. पण दुसऱ्या दिवशीपासून तो भूमिहीन होणार होता.

कुठून तरी त्याच्या नव्वद वर्षाच्या म्हाताऱ्या आईलाही ही खबर लागली आणि ती बेभान झाली. ज्या दिवशी शेताचा ताबा द्यायचा त्या दिवशी ती सकाळीच शेतात गेली आणि कोण शेतात पाऊल टाकतो ते बघते असं काहीबाही बडबडू लागली. दुपारी बाराच्या दरम्यान सगळे आले आणि म्हातारीच्या तोंडाचा पट्टा सुरु झाला. पिढ्यान्पिढ्यांपासून सोनं देणारी जमीन विकणारा हैवान आहे असं ती म्हणू लागली, उद्या पावसाळ्यात पेरायचं कुठं असाही तिचा प्रश्न होता. तिची सारी स्वप्नं या शेतात उगवलेली होती. आणि तिला नवं अर्थशास्त्र कळत नव्हतं... ती वेड्यासारखा आरडाओरडा करीत होती. मोजणी करणाऱ्यांच्या मध्ये

मध्ये पडत होती. पण काही काही उपयोग नव्हता. शेवटी ती कळवून हात जोडून जमीन घेणाऱ्याला म्हणाली,

"साहेब ही जमीन कशाला घेताय तुम्ही ते मला कळलंय. तुम्ही इथं घरं बांधणार ना? इथली जमीन इतकी सुपीक आहे की इथं पन्नास फुटापर्यंत नुसती काळी माती आहे. पायाच लागणार नाही. आणि एवढी चांगली जमीन कशासाठी वाया घालवताय..."

पण तिचं कोणालाचं ऐकायचं नव्हतं. तिच्या विचारात, बोलण्यात फार मोठं तथ्य होतं. घरं बांधायची तर बांधा ना. पण नापीक, खडकाळ जमीन पाहून घरं बांधा. असली सुपीक शेती कशासाठी वाया घालवताय...? अशी सुपीक जमीन जर आपण हळूहळू घालवून बसलो तर उद्या अशी जमीन कुठं मिळणार आहे...? तिचं सारं सारं खरं होतं. खरं म्हणजे तिनं एक नवं आणि श्रेष्ठ अर्थशास्त्र मांडलं होतं. पण संधीसाधू लोकांना हे अर्थशास्त्र नको होतं...त्यांनी आपलं काम चालू ठेवलं. म्हातारी हतबल झाली. तिला काय करावं ते कळेना. मग तिने दूरवर दिसणाऱ्या महानगराकडं पाहात मोठ्ठा आक्रोश सुरु केला. काळीज भेदून जाणारा, सारा आसमंत व्यापून उरणारा आक्रोश होता तिचा. पण तो आक्रोश मात्र तिच्या मुलाला आणि तिथल्या कोणालाच ऐकू येत नव्हता...बोरगाव हळूहळू महानगरात विलीन होत होतं!

**(उद्याच्या सुंदर दिवसांसाठी)**

## खालील प्रश्न सोडवा.

१) औद्योगिकरण व शहरीकरणामूळे बोरगावच्या ग्रामीण जनजीवनावर झालेला परिणाम लिहा.

२) सदरील लेखातून ग्रामीण जीवनाचा ऱ्हास कोणकोणत्या कारणांनी होत आहे ते सविस्तर लिहा.

३) विठ्ठलरावांच्या आईने सांगितलेले श्रेष्ठ अर्थशास्त्र कोणते?

४) पांडोबा जाधवांनी केलेली प्रगती.

****

# २. पहिली शिकार

**–महादेव मोरे**

**परिचय :** महादेव मोरे यांचा जन्म २२/०६/१९३९ निपाणी येथे सामान्य रयत कुटुंबात झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण निपाणी येथेच झाले व महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे झाले.

जीवनातील आर्थिक परिस्थितीवर मात करुन वडिलोपार्जित रयतांची कामे करणारे पण कसलाही वसा-वसीका नसलेले पण साहित्य लेखनाकडे वळले. कारण त्याला सुध्दा आर्थिक परिस्थितीच कारणीभूत ठरते. सदरील लेखकाची, प्रकाशित ग्रंथसंपदा “थ्रिल्स” मधील कथा. डी. आय.जी श्री. भगवत स्वरुप चतुर्वेदी, श्री. रामकुमार भ्रमर, श्री. प्रकाश पंडित, श्री. अजयकुमार यांच्या मूळ हिंदीवरुन घेतल्याअसून “पहिलीशिकार” ही कथा आफ्रिकेतील एका वन्य जमातीच्या युवकांच्या हकीकतीचे मराठीकरण आहे. “थ्रिल्स” (अनुवादित) ही कथा आफ्रिकेतील एका वन्य जमातीच्या युवकांच्या पहिल्या शिकारीचे वर्णन केले आहे.

---

माझं लहानपण केव्हाच संपलं होतं. वस्तीपासून दूर जंगलामध्ये गुरुंच्याजवळ दोन वर्ष राहून जीवन व्यतीत करण्याची आमच्या जमातीची विद्या शिकलो होतो. आणि आता माझ्या परीक्षेचा दिवस उजाडला होता. जमातीच्या मुख्याचा, पुढाऱ्याचा मी मुलगा असल्याने गुरुंचा माझ्यावर फार लोभ होता. पण ज्या परीक्षेच्या कसोटीवर मला उतरावं लागणार होतं, तीत ते मला सोबत देणे अशक्य होतं. फार तर ते देवतापुढे माझ्यासाठी प्रार्थना करु शकत होते.

आमच्या नागाजमातीची अशीच परंपरा आहे की, मुख्याचा मुलगा असो, किंवा साध्या नागरिकाचा मुलगा असो त्याला एकाकीच परीक्षा द्यावी लागते. आणि अशी परीक्षा दिल्यावरच.गावातील लोक त्याला आपल्या बरोबरीचं स्थान देतात. आणि मगच नागा जमातीची एखादी तरुणी त्याच्याशी लग्न करते.

ही परीक्षा म्हणजे पहिली शिकार! या पहिल्या शिकारीहून एक तर लोक विजयी परत येतात किंवा परत येत नाहीत. अशांची केवळ हाडंच परत आणली जातात. या पहिल्या शिकारीमध्ये असफल होऊन परत आलेला एकही माणूस मी आजपर्यंत पाहिलेला नाही. अशा यशाचा आम्ही नागा लोक फार अभिमान बाळगतो.

माझे बाबा सांगतात की, या 'पहिल्या शिकारी' ची प्रथा फार पुरातन आहे. हा माणसांचा तिसरा जन्म आहे. माझ्या जमातीमध्ये असे मानतात की जेंव्हा मूल जन्मतं तो पहिला जन्म. जेंव्हा मुलगा गुरुंच्या जवळ आपलं शिक्षण पूर्ण करुन घेतो तो दुसरा जन्म. आणि तिसरा जन्म म्हणजे तो आपली पहिली शिकार करतो तो. पूर्वीच्या काळी माझे पूर्वज माणसांची शिकार करत असत. पण एकदा अजाणता एका स्त्रीची शिकार केली गेल्यामुळे जमातीची देवी रागावली आणि तिच्या कोपामुळे एकही मुलगा जिवंत राहिला नाही. सारी पटापटा मरुन गेली. शेवटी देवीचा राग शांत करण्यात आला आणि जमातीने माणसाच्या शिकारीवर बंदी घातली.

खरं तर त्यावेळी रायफलीसारखं शस्त्र प्रचारात आलं होतं; पण या पहिल्या शिकारीत तिचा काहीच उपयोग नव्हता. आमच्या परंपरांगत हत्यारानच ही पहिली शिकार केली पाहिजे असा नियम होता.

माझ्या ह्या पहिल्या शिकारीचा दिवस प्रसन्नतेचा शिडकाव करीतच उगवला. माझ्या अंगात एक प्रकारचा उत्साह संचारला...एक उत्सुकताही होतीच.

माझ्या गुरुने माझ्या भात्यातील बाणाचे फाळ तापवून लालबुंद केले आणि ते विषामध्ये बुडविले. भाल्याला धार लावली आणि या पहिल्या शिकारी संबंधी जरुरीच्या गोष्टी पुन्हा एकदा मला सांगितल्या.

मग मला बाहेर काढण्यात आलं...माझ्याबरोबर गावच्या पुढारी नि त्याच्या मागोमाग गावातील सारें लोक होते. पहाटेच्या गार वाऱ्याच्या सोबतीने धुसर प्रकाश साऱ्या गावावर पसरला होता. ह्या प्रकाशात आमचीही मिरवणूक जंगलाच्या सरहद्दीपर्यंत आली...मग तेथे एक कोंबडी कापून वन देवतेला अर्पण केली. मग गुरुने आपल्या हातात मक्याचे दाणे घेऊन ते मोजत देवीला कौल लावला...मी जंगलामध्ये दक्षिण दिशेने जावे असा देवीने कौल दिला.

मग तेथेच मला निरोप देऊन सगळी मागे फिरली, मी दक्षिणकडे तोंड करुन जंगलात शिरलो. तीन दिवसाचं जेवण मला बांधून देण्यात आलं होतं. या तीन दिवसांत शिकार गावली तर बरं नाही तर उदर निर्वाहासाठी प्रयत्न करणं हे सर्वस्वी माझ्या कुवतीवर अर्थातच अवलंबून होतं.

असाच तीन-चार मैल चालत गेल्यावर मला थोडी सुस्ती आली...समोर एक डोंगर होता. त्या पलीकडील शिकारक्षेत्रात तो ओलांडून उतरणं मला भाग होतं तसं बघितलं तर माझ्या दोस्तांबरोबर पुष्कळवेळा यापूर्वी मी जंगलात फिरलो होतो...पण त्यावेळी सोबतीला दोस्त असल्याने तितकीशी भीती वाटत नसे...आज मात्र मी एकटाच होतो नि अनेक प्रकारच्या शंकाकुशकांनी मन भरुन गेलं होतं.

असाच मी चालत होतो. अंग शिणल्यागत झालं होतं. माझ्या डाव्या हाताला पिंपळाचं एक भकास झाड होतं, त्यावर मी चढलो, दोन फांद्या फुटलेल्या एक दुबेळक्यात मी अंग लोटून दिलं, आणि शिणवटा घालवू लागलो. हळूंच माझ्या मनात नागीचा विचार आला. मग याच विचाराने मन व्यापून गेले...नागी माझ्या शेजारी राहात होती. आडजागी फुटलेल्या रानफुलासारखी ती फुलली होती. माझं तिच्यावर मन बसलं होतं. आणि तिचंही माझ्यावर...पण मी या 'पहिल्या शिकारीत' यशस्वी झाल्यावर ती माझी पत्नी बनणार होती....अन्यथा नाही... निदान

यासाठी तरी ही 'पहिली शिकार' मी यशस्वीपणे करायला हवी होती...गुरुंनी शिकविलेली सारी विद्या मला आता आठवू लागली. त्याची मनात पुन्हा उजळणी सुरु झाली...मग मनात आलं, आता उठावं, असा आळस काढत बसलो तर शिकार कशी होणार?

झाडावरुन खाली उतरलो, तेंव्हा साऱ्या दिशा सारख्याच वाटत होत्या. खाली जमिनीवर झाडांची सावली पडली होती, त्यांवरुन मी दिशा निश्चीत केली आणि माझ्यापुढे पसरलेल्या डोंगरमाथ्यावर आलो. तेथून खाली नजर टाकली. खाली घनदाट जंगल पसरलेलं होतं. पाच-सहा मैल रुंदीचा हा पट्टा होता. त्याच्या सीमेवर असाच एक डोंगर उभा होता. दोन्ही डोंगरांच्या घसरणी जिथे संपुष्टात आलेल्या होत्या, तेथे एक ओढा खळाळत वाहत होता, तेच आमच्या जमातीचं शिकारक्षेत्र ह्या विस्तीर्ण पट्ट्याबाहेरील जंगल दुसऱ्या जमातीत होती. तेथे शिकार करण्याचा हक्क अर्थात आम्हांस नव्हता.

जंगल म्हणजे एक सजीव, विराट असं विश्व असतं ज्यांना पशु-पक्ष्याची, झाडा-झुडपांची, वाऱ्याची भाषा समजते; त्यांना हे म्हणनं पटेल. एक एक झाड तुमच्या बरोबर बोलत असतं...पानांचं सळसळणही एखादी रहस्यपूर्ण घटना सूचित करतं. जमिनीवरुन सरपटणारे, धांवणारे, चालणारे प्राणी नि आकाशात उडणारे पक्षी आपल्या गतीतून पुष्कळ काही सांगत असतात...पण हे ओळखायला पाहिजे, समजायला पाहिजे आणि हेच महत्वाचे.

मला जंगलात तीन दिवस रहावं लागणार होतं; म्हणून प्रथम मी माझं कार्यक्षेत्र निश्चित करुन घेतलं. मी असा विचार केला. या ओढ्यामध्ये पाणी पिण्यासाठी जनावर नक्कीच येत असणार, म्हणून तेथे जवळपासच मला माझा तळ ठोकावा लागणार...मी जंगलातून वाट काढीत त्यां ओढ्यापर्यंत जाऊन पोहचलो...डोंगरावरुन घरंगळत आलेला एक मोठा दगड ओढ्याच्या पात्रात पडला होता; त्यामुळे ओढ्याला बांध घातल्यासारखं तेथे पाणी साठलं होतं...ही जागा माझ्या कामाच्या दृष्टीने मला उपयोगाची वाटली...तेथे एका घनदाट पर्णसंभार असलेल्या

झाडाच्या दोन फांद्या आल्या होत्या त्यांच्या दुबेळक्यात बैठक मारण्याचं मी निश्चित केलं.

आतापर्यंत दोन प्रहर झाली होती. शिकार साधण्याची वेळ सायंकाळीच असते. कारण त्याच वेळी हिंस्त्र श्वापदे पाणी पिण्यासाठी येतात. आणि त्याचवेळी पाणी पिण्यास येणाऱ्या इतर जनावरांची शिकारहि करतात. तेंव्हा संध्याकाळपर्यन्तचा हा तीन चार तासांचा वेळ फुकट घालवायचा नाही, असा विचार करुन आजूबाजूंच्या जागेचं निरीक्षण करावं म्हणून मी फिरु लागलो.

मध्येच एकाएकी एका मोकळ्या जागेतील दगडावर बसलेले कावळे काव् काव् करु लागले. त्यांचा गोंग़ाट ऐकून तेथे काही तरी काळंबेरं जरुर आहे, असं मला वाटलं पण काय ते स्पष्ट समजावं म्हणून मी जवळच्याच एका झाडावर चढलो. नि तीक्ष्ण नजरेने पाहू लागलो.

ओढ्याकाठच्या वाळूतून एक भला मोठा अजगर हळूहळू येत होता. त्याचं पोट फुगलेलं होतं, तेव्हा त्याने एखादी शिकार मारली असावी, असं अनुमान निघत होतं. तो हळूवार गतीने मी ज्या झाडावर चढलो होतो. तिकडेच येऊ लागला त्याची चाल आळसलेली होती. पोट भरल्यामुळे तो निष्काळजीसा वाटत होता. तो नक्की माझ्याच दिशेनं येत आहे, असं मला वाटलं...

गुरुनं मला सांगितलं होतं, ‘साप, तसेच अजगरांच्या डोळ्यांमध्ये वशीकरण शक्ती असते. तेंव्हा त्यांच्यावर आपणांस जर वार करायचा असेल तर तो नेहमी त्यांच्या नजरेआड राहून केला पाहिजे.’

झाडाच्या बुंध्याला वेटोळे घालीत अजगर हळूहळू वर चढू लागला. तसा मी विचारातून जागा झालो...मी भात्यातून एक विषारी तीर काढला, धनुष्यावर चढविला आणि अजगराच्या डोक्यावर नेम धरुन सोडला. तो तीर त्याच्या डोक्यातून घुसून आरपार बालच्या बाजूंस आला. तीर लागताच एक जोरदार फुत्कार काढून तो खाली

पडला. तो खाली पडताच मघाचे ते कावळे आणखीन जोरजोराने काव् काव् करु लागले, एकच गोंगाट वाढला.

अद्याप अजगर मेलेला नव्हता. तो हिंस्त्रपणे फूत्कारत होता, आणि झाडावर चढण्याचा प्रयत्नही करीत होता. पण माझा तीर आरपार घुसल्याने त्याला हे अशक्य होत होतं...तीर लागलेल्या जागेतून आता रक्तस्त्राव होऊ लागला होता. कोणत्या प्रेरणेने व विचाराने कोणास ठाऊक; पण तो एकदम मागे फिरला नि हळूहळू ओढ्याच्या दिशेने जाऊ लागला...तो जेंव्हा वाळूंत जाऊन पोंहोचला. तेव्हा कोठून कोणास ठाऊक ? आठ दहा गिधाडे तेथे जवळपास येऊन उतरली!

आता ही गिधाडे या अजगराची सुंदर कातडी चिवडून खराब करुन टाकतात की काय, अशी भीती पडली. त्याची ती पट्ट्यापट्ट्याची कातडी माझ्या प्रेयसीला भेट म्हणून द्यावी, असा मी विचार करीत होतो. आणि ही गिधाडे...मी झटकन खाली उडी मारली पळतच वाळूत गेलो. आणि दगडांनी व भाल्याने त्या अजगराचं डोकं ठेचून काढलं.

अजगराचं वजन अंदाजे अडीच मणाहून अधिकच होतं! मी जर ह्या पहिल्या शिकारीसाठी बाहेर पडलो नसतो, आणि हाच अजगर जर मी माझ्या गावाजवळ मारला असता, तर त्याच्या चरबीचा काही उपयोग झाला असता. मी रिकाम्या हाताने गावाकडे परतु इच्छित नव्हतो, म्हणून त्याचं कातडं सोलण्यावरच मी समाधान मानलं....अजगराचं ते सुंदर कातडं मग मी एका फांदीवर वाळण्यासाठी म्हणून टाकलं.

तो कृष्णपक्ष नव्हता; म्हणून सूर्यास्तापूर्वीच चंद्राचा गोल उगवला होता. दुपारी निश्चित केलेल्या झाडावरील बैठकीवर मी होतो पाय फांद्यावर ठेऊन नि बाकीचं शरीर पानांत लपवून मी पहुडलो होतो. माझ्या समोरुन पाणी पिऊन हरणाच्या दोनतीन जोड्या, घुई रेडे, चारपाच हत्ती, काही नीलगाई आणि एक नर गेंडा निघून गेला. रात्र पडली तशा आकृती धूसर दिसू लागल्या...फिक्कट चांदण्यात स्पष्ट दिसणं अशक्य होतं. रात्रीचा पहिला प्रहर होईपर्यंत मी जागा होतो, पण हिंस्त्र श्वापद कांही दिसून आलं नाही. मग केव्हातरी मला झोप लागली.

ओढ्याच्या पलीकडून एक गर्जना कानावर पडताच माझी झोप उडाली. मी आवरुन सावरुन बसलो. तीन-चार वेळा अशी गर्जना झाली. मी लगेच ओळखलं, ती एका चित्त्याची गर्जना होती. त्यानं शिकारीवर ताव मारला आहे. नि नुकतंच तो पाणीही प्याला, ते सर्व त्या गर्जनातून सूचित होत होतं.

कशी तरी रात्र सरली. मी दुसरा दिवसही झाडावरचं घालविला तहान लागल्यावरच फक्त तीन चार वेळा ओढ्यापर्यंत गेलो होतो. संध्याकाळ झाली तसा मी झाडाच्या काही फांद्या तोडल्या. एका चमड्याच्या पातळ लांबट वादीमध्ये त्या ओवून एक जाळं तयार केलं आणि ते झाडाखाली पसरलं. मग मी झाडावर चढलो. वाटेल त्या परिस्थितीत आजची रात्र मला रिकामी जाऊ द्यायची नव्हती.

सूर्यास्ताच्यावेळी एका मध्यम बांध्याची नीलगाय त्या जाळ्यात गावली. तशी ती फारच धडपडू लागली. हंबरु लागली. तिच्या सोबतच्या इतर नीलगाईनी बराच वेळ ती सुटका करुन घेईल म्हणून वाट पाहिली पण शेवटी अंधार पडत असलेला पाहून त्या पाणी प्याल्या नि जाळ्यात सापडलेल्या गाईकडे वळून वळून पाहत निघून गेल्या.

तसा मी शिकारीच्या देवीला मनोमन प्रणाम केला. आता मी कुण्याही रायफलधारी इंग्रज शिकाऱ्याच्या बरोबरीचा होतो. झाडावर माझं मचाण होतं. आणि खाली शिकारीचं भक्ष्य बांधलं होतं. वाघ किंवा चित्ता यायचीच केवळ आता वाट होती.

जसजसा अंधार दाट होऊ लागला तशी पाणवठ्यावरील जनावरांची गर्दीही कमी कमी होऊ लागली. आता तर ते एक दोन अशा संख्येने येत, संशयाने इकडे तिकडे पाहत, पाणी पीत नि पळून जात. प्रथम मला असा संशय वाटत होता की रात्रीचा तो चित्ता जवळच कोठेतरी असावा, पण लवकरच हा संशय दूर झाला...याच वेळी माझ्या गुरुने सांगितलेली गोष्ट मला आठवली जंगलामध्ये सात कोस दूरपर्यंत शिकाऱ्याचा वास. जनावरांना येत असतो...म्हणून मला अशी भीती वाटू लागली की, माणसाचा वास आल्यावर चित्ता इकडे फिरकलाच नाही तर...?

यावर उपायहि तात्काळ मला सुचला. मी मेलेल्या त्या अजगराची तीव्र कुबट वास मारत असलेली ती कातडी कमरेला लपेटली आणि फांदीवर सावधानपणे बसलो...एक तास असाच गेला...लांडगे ओरडू लागले...दुसरा तास संपता संपता चाँद उगवून वर आला...याचवेळी पक्ष्यांचा गलगलाट वाढला पक्षी चुळबुळ करु लागले, ओरडू लागले, चित्ता येत आहे. असाच याच अर्थ होता.

अजूनपर्यंत नीलगाय हंबरडे फोडीतच होती...पण आता चित्त्याचा गंध येताच तिनं पुन्हा एकदा जोरानं पाय झाडून सुटण्याची धडपड केली. पण ती व्यर्थ ठरली...मग नीलगाय निश्चेष्ट पडली...ह्यावेळी चित्ता ओढ्याजवळ आला होता...मी सावधपणे त्यादिशेनं पाहिलं. दोन हिरव्या ठिणग्या चमकत असलेल्या झाडीमधून दिसून आल्या...भात्यातून हळूच मी एक बाण काढला, धनुष्य सरळ केलं आणि त्यावर बाण चढविला.

एकाएकी नीलगाय जोराने हंबरली, मग धडपडू लागली. चित्त्याने तिचा गळा दाबून धरला होता. क्षणात त्यानं तिचं नरडं फोडलं आणि तो अधाशीपणे रक्त पिऊ लागला...मी नेम धरला पुऱ्या ताकदीने खांद्यापर्यंत धनुष्याची दोरी खेचली आणि बाण सोडला...सणसणत वेगाने बाण निघून गेला न थांबता लगेच दुसराहि बाण मी सोडला.

एक जोरदार गर्जना कानावर आदळली, आणि जखमी चित्त्याचं धूड मी ज्या फांदीवर बसलो होतो, त्या फांदीला येऊन आदळलं...त्या हादऱ्याने प्रयत्न करुन देखील मी माझा तोल सावरु शकलो नाही...मी खाली आदळताच दगडाचा जोराचा मार मला बसला. तरीही मी मला स्वतःला सावरलं. धडपडत उभा राहिलो. आणि भाला सरसावून लढण्यासाठी उभा राहिलो. मी सावरुन असा उभा रहातोय, तोच चित्त्याने माझ्यावर झेप घेतली आणि मीही नेम धरुन त्याच्या डाव्या जांघेमध्ये भाला घुसविला...मग मला आठवलं ते एवढचं की, माझं तोंड व डोकं रक्ताने माखून गेलं आहे फक्त एवढंच इतकच आठवलं लगेच मी बेशुध्द झालो.

दुसऱ्या दिवशी मी सकाळी शुध्दीवर आलो, डोक्याला जखम झाल्याने पुष्कळ रक्त निघून गेलं होतं. मी कसातरी पडतझडत ओढ्याजवळ गेलो आणि पाण्याने माझी जखम धुऊन काढली. जवळच्या झाडोऱ्यातील विशिष्ट औषधी झाडपाला ओरबाडून काढला नि तो दगडावर वाटून डोक्यावरील जखमेत भरला.

अंगात थोडी शक्ती आल्यावर मी जखमी चित्त्याच्या पाठलागासाठी निघालो...मला फार दूर जावं लागलंच नाही. ओढ्याच्या पल्याडल्या अंगाला, एक फर्लांगभर अंतरावर 'काही कावळे' ओरडत होते. मी तेथे गेलो. चित्ता मरून पडला होता. त्यांची लांबी पांच फुटापर्यंत होती. मग मी त्याची कातडी सोडवू लागलो. यामध्ये ४/५ तास निघून गेले...

मला विजय मिळाल्याने काम करताना थोडीही थकावट वाटली नाही...अजगर व चित्त्याची कातडी घेऊन मी गावाकडे निघालो. गावाबाहेरील देवळाजवळ मी पोहचलो आणि ढोल जोरजोराने वाजवू लावलो! मी विजयी होऊन सुखरुप परत आल्याची ही खूण, अर्थात ती गावातील लोकांनी ओळखली व गावातील ढोलही वाजू लागले.

आणि माझ्या स्वागतासाठी सारा गाव देवळाकडे लोटू लागला. त्यात माझी प्रेयसीही खात्रीने असेल...

मलाहि खूप आनंद झाला. कारण ती मला मिळणार होती. माझा तिसरा जन्म झाला होता. मी जमातीचा माणूस झालो होतो.

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) कथेतील नायकाने 'केलेल्या पहिल्या' शिकारीचे वर्णन करा.

२) नागा जमातीतील 'पहिल्या शिकारीचे' जीवनातील महत्व सांगा.

३) 'पहिली शिकार' कथेतील निसर्ग वर्णन स्पष्ट करा.

****

# ३. तिची वाटच वेगळी

## मथू सावंत

**परिचय** : मथू सुरेश सावंत (१९६६) मराठवाड्याच्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखिका. 'पाण्यातली पायवाट', 'तिची वाटच वेगळी' आणि 'पाणबळी' हे कथासंग्रह; 'राहूकेतू' ,'जिनगानी' या कादंबऱ्या; 'कथाकार भास्कर चंदनशिव' हा समीक्षाग्रंथ प्रसिध्द. याशिवाय बालसाहित्यही प्रसिध्द. दोन वेळा राज्य पुरस्काराने सन्मानित. बदलते ग्रामीण वास्तव, विशेषतः ग्रामीण स्त्रीचे जागे होऊ पाहणारे आत्मभान हा त्यांच्या कथांचा महत्वाचा विशेष.

प्रस्तुत कथेत भारतीय राज्यघटनेनुसार स्त्री आणि पुरुष यांना तितकाच हक्क असूनही महिलांसाठी आरक्षण मिळवूनही पुरुष प्रधान मंडळीनी स्त्रीयांच्यावरती पुरुषी हक्क गाजवणाऱ्या पुरुषी अहंकाराचा त्रास सहन करणाऱ्या महिलांच्या हक्कासाठी आपल्या अस्तित्वासाठी प्रत्यक्ष आपल्या पतीशी संघर्ष करणारी चंद्रकला लेखिकेला या कथेत दिसते.

---

बनपूर गावात आज चर्चेला उधाण आलं होतं लहानथोरांच्या तोंडी एकच विषय होता 'गंगाधर सरपंच झाला...गंगाधर सरपंच झाला'. दुपारी बारा वाजता गंगाधरची उघड्या जीपमधून गावातून मिरवणूक काढण्यात आली. गंगाधरचे कार्यकर्ते बेभान होऊन नाचत होते. बँडवाले बँड वाजवीत होते. उखळीचे बार कानांचे पडदे फाडीत होते. 'गंगाधर पाटील जिंदाबाद! पाटील साब आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं' या घोषणांनी बनपूर गाव दुमदुमत होते तसं पाहिलं तर निम्मं गाव गंगाधर पाटलाच्या विरोधात होतं. पण गंगाधर मुरब्बी राजकारणी निघाला. सासरवाडीहून त्यानं मिरवणुकीसाठी माणसं आणली होती. कधी हात

जोडून तर कधी हात उंचावून गंगाधर अभिवादन करीत होता. बायकामुले गच्च्यांवरुन, खिडक्यांमधून मिरवणूक पाहत होती. गंगाधरच्या बाजूलाच जीपवर श्रीपती उभा होता. आपल्या मित्राची विजयी मिरवणूक पाहताना त्याचे डोळे आनंदाने लकाकत होते. एवढ्यात अचानकपणे धुरळा उडवीत गावात पोलीसगाडी येऊन मिरवणुकीसमोर उभी राहिली. लोकांना वाटले, बंदोबस्तासाठी पोलीस आले असावेत. पण दुसऱ्याच क्षणी जीपमधून चंद्रकला खाली उतरली. तिच्या डोळ्यात अंगार फुलला होता. ती गंगाधर व श्रीपतीकडे बोट दाखवत म्हणाली, “साहेब, हेच ते फसवणूक करुन माझं जीवन उद्ध्वस्त करु पाहणारे लोक, पकडा यांना.”

काही कळण्याच्या आतच इन्स्पेक्टर मोहित्यांनी श्रीपती आणि गंगाधरला अटक वॉरंट दाखवून बेड्या घातल्या. क्षणार्धात मिरवणुकीवर सुतकी कळा आली. श्रीपती आणि गंगाधरला घेऊन पोलीस जीप आल्या वेगाने धुरळा उडवीत निघूनही गेली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भयमिश्रित आश्चर्याचे भाव पसरले होते. झाला प्रकार पूर्णपणे लक्षात येताच दाराआडून, खिडकीतून मिरवणूक पाहणाऱ्या बायका रस्त्यावर आल्या. चंद्रकलाला म्हणाल्या, “तू खरी वाघीण निघालीस. जे काम आजवर कोणाला करता आलं नाही ते तू करुन दाखवलंस.”

“ही तर सुरुवात आहे,” असे म्हणून चंद्रकला आपल्या चुलत सासऱ्याच्या घरी गेली. त्यांच्या तब्येतीची चौकशी करुन ओसरीवर बसली. घटाघट तांब्याभर पाणी प्याल्यावर तिला जरा बरं वाटू लागलं. पण आतापर्यंत अडवून धरलेला तिच्या भावनेचा बांध फुटला, “मामाजी, तुमच्या पाठबळावर मी हे काम केलं,” असं म्हणून ती ढसढसून रडू लागली.

रामजीमामा तिच्या पाठीवर मायेचा हात फिरवीत म्हणाले, “रडू नको बाई. या कुडीत जीव असंल तवर तुला कधी अंतर देणार नाही. खूप सोसलंस पोरी. तू खूप सोसलंस.”

“मामाजी, या गावातच राहून मी लढणार आहे. माझ्यावर जी वेळ आली ती कोणावर येऊ नये म्हणून झगडणार आहे. मला घरी जायंचय, आशीर्वाद द्या,” असे म्हणून चंद्रकला रामजी पाटलाच्या पाया पडली. तोंड भरुन आशीर्वाद घेऊन ती स्वतःच्या घरी आली. पाहाते तर काय? सासूबाई- “माज्या शिरपतीला पोलीसानं धरुन नेलं माय. असली कसली बायको आसंल? नवऱ्यालाच तिनं जेलमंदी टाकलं.” म्हणून धाय मोकलून रडत होती. चंद्रकलाची नणंद बायजाक्काही पदरानं डोळे पुशीत होती. चंद्रकलाहून लहान असलेली नुकतीच लग्न झालेली तिची सवत मंदा मूकपणे अश्रू ढाळीत होती. चंद्रकलाला पाहताच मंदा चंद्रकलाचे पाय धरुन हुंदके देत म्हणाली, “ताई, तुझ्याबरोबर माझंही नशीब फुटलं गं.”

“रडू नको. रडण्यातच माझी जिंदगी गेलीय आजवर. आल्या प्रसंगाला धीरानं सामोरी जा. तू अन् मी स्त्री असलो तरी दोघींच्या जगण्याचे मार्ग वेगळे आहेत. तू काय अन् मी काय गरिबीमुळे अशा परिस्थितीची शिकार झालो आहोत.” एवढे बोलून चंद्रकला घरात गेली. डोळे मिटून ती भूतकाळात शिरली. ज्या घराच्या कर्त्या पुरुषाला अटक करायला लावली त्याच घरी थांबणं केवढं धाडसाचं काम! पण भीतीचा लवलेशही तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. जणू संथ वाहणाऱ्या चंद्रभागेला आज पूर आला होता.

तिच्या मनात असंख्य विचारांचं पाणी खळाळत होतं. तिला आठवत होतं ते सारं...

“म्हणं सरपंच व्हणार, निवडून आली म्हणून मुखत्यार झाल्यागत वाटलं की काय तुला? आली मोठी गावचा कारभार करणारी. गावचा कारभार करणं भाकरी थापण्याइतकं सोपं काम वाटतं की काय तुला? आँ? व्हतूस काय सरपंच? व्हतूस?” असं म्हणून श्रीपतीनं चंद्रकलेला लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. चंद्रकला ढसढसून रडत होती. “ मारु नका जी. मी पाया पडते तुमच्या, हात जोडते.” असं

म्हणून विनवणी करीत होती. तिच्या कळकळून बोलण्याचा श्रीपतीवर कुठलाच परिणाम होत नव्हता. उलट तो अधिकच चिडून कुऱ्हाडीच्या दांड्यानेच तिला गुरांसारखं झोडपत निघाला.

“नको नको रे बापा शिरपती, आता बस कर बघू. उगं हकनाक मरुन जाईल. आजकालच्या पोरी चार बुकं शिकल्या की उध्दट वागतात. उलटून बोलतात. नवऱ्याची भीतीच वाटत नाही त्यांना. नवऱ्याच्या शब्दाला मान देत नाहीत. आमच्या वेळी नव्हतं असं कायी. हे बघ शिरपती, घाल न्हेऊन तिला म्हायेरी. तिच्या मायीला म्हणावं, सांभाळ आपली दिवटी लेकं.” श्रीपतीची आई त्याच्या हातातील कुऱ्हाडीचा दांडा काढून घेत म्हणाली.

“च्या मारी, मजं ऐकत नाही. लयी माज चढलाय हिला. दया दाखवायच्या काबील नाही राहिली ही. झकमारी केली अन् हिला निवडणूकीला उभं केलं. सगळे म्हणाले– “चार बुके शिकलेली हाय. शानी हाय. बायकांसाठी राखीव वार्ड हाय. करा उभं चंद्रकलाला,” हिला कोण कुत्रं पुसत होतं गावातलं. दादाराव पाटलाची सून म्हणून लोकांनी हिला मत दिलं. आली निवडून. घराची इज्जत गेली नाही हे काय कमी झालं? नाहीतर त्या सुताराच्या रखमाबाईकडून हार पत्करली असती तर काय नाक राहिलं असतं दादाराव पाटलाचं? तोंडाला काळं लागलं असतं, काळ! जे झाले ते खूप झालं. आता म्हनं सरपंच व्हायचंय. तोंड बघा सरपंच व्हणारीचं.”

असं बोलून श्रीपती आंबोण्याकडे तोंड करुन पचकन थुंकला, अन् ढाळजत जाऊन बसला. इतक्यात बाहेरुन गंगाधर आला. श्रीपतीजवळ घोंगड्यावर ऐसपैस बसत म्हणाला.

“काय, मग दोस्ता? वयनी राजी झाल्या न्हवं?”

“नाव काढू नको तिचं माज्याम्होरं. मजं डोस्कच आऊट झालंय बघ. भावकीचे हायेत की साले, कडूचे. आमचं चांगलं चाललेलं तेयला कुठं पाहावतंय? हिला लावलीय फूस. भरलेत कान. ‘मी सरपंचपदासाठी

उभच राहणार हाय' म्हणतीया. पण गड्या गंगाधर, तू कायबी काळजी करू नको. अरं लंगोटीयार आपण. बायको एक गेली तर दुसरी मिळंल. पण दोस्ताचं मन मोडणार नाही. अरं, तू सरपंच झालास तर मीच सरपंच बनल्यासारखं हाय की," श्रीपती म्हणाला.

त्याच्या बोलण्याचा धागा पकडीत गंगाधर म्हणाला, "मनातलं बोललास बघ मज्या. अरं मी उपसरपंच म्हणून राहीन. वयनी सरपंच व्हईल, पण बाईच्या हाताखाली काम करणं मनाला पटत नाही बघ. "

त्याची नाराजी ओळखून श्रीपती म्हणाला,

"ए दोस्ता, अरं मी असल्यावर तू नाराज का व्हतूस? मी तुला सरपंच करुनच सुखाचा घास घेईल. दोस्तासाठी एवढं करू शकलो नाही तर थू असल्या जिंदगीवर! तू चिंताच करू नकोस. मी सगळं बरोबर करतो. उद्याच नेऊन घालतो तिला माहेरी. बायकांची जात. चार दिवस कुरकूर करते. मगं बसते गुमानं."

"खरं बोललास बघ."

चंद्रकला धुमसत तशीच कोऱ्यात पडून होती. अजूनही ती रडत होती. कुऱ्हाडीच्या दांड्याचे काळेनिळे वळ चांगलेच उठून दिसत होते.

श्रीपतीची आई लेकीला म्हणाली, "जाय माय बायजा, बोलावून आण तिला जेवायला. तिन्हीसांजेला घरात रडणं बरं नसतंय म्हणाव."

बायजा उठली. चंद्रकलाजवळ जात म्हणाली, "वयनी, उठा, चला आमच्यासंगं जेवायला. दादाचा राग इंगळावनी हाय. तेच्या कलानं घ्या. उठा."

"नाही, मला भूक नाही जेवायला. मार खाऊन पोट भरलंय माझं. तुम्ही जेवा... "

काय चुकलं माझं? अनायासे सरपंचपद मिळतयं. अकरा मेंबरांपैकी सातजण मला सरपंच करा म्हणतात. त्यात वाईट काय आहे? मराठीच्या पुस्तकातील धड्यातल्या अनुताई वाघांसारखं आपल्याला काही चांगलं काम करता येईल. साक्षरतेचे वर्ग चालवून निरक्षरता दूर करता येईल. महिलांसाठी लघुउद्योग निर्माण करून त्यांना स्वावलंबी बनविता येईल अण्णा हजारेंच्या राळेगण शिंदीसारखं आपलं बनपूर गाव

आदर्श गाव करण्यासाठी मेहनत घेता येईल. नाहीतर दहावी शिकून काय फायदा? शाळेत मराठीच्या बाई नेहमी सांगायच्या, शिका, स्वावलंबी बना. संघर्ष करा. अन्यायाविरुध्द बंड करा. समाजऋण फेडा." मला समाजऋण फेडण्याची एक चांगली संधी आलीय. ती का सोडू?

सुदैवानं नवा मार्ग गवसला. इलेक्शन लागलं. संधी चालून आली. ह्यांना घरात पद आल्यावर काय फायदा होतो हे कितीही पटवून सांगितलं. पण छे! माझ्यापेक्षा दोस्ताचं पारडं जड भरतंय. पुरुषप्रधान विचारांपासून दूर व्हायला हे तयारच नाहीत.

भावकीचे चुलत सासरे रामजीमामा माझ्या पाठीशी बापासारखे उभे आहेत. तेवढंच पाठबळ मिळतं ते म्हणतात,

"बाई चंद्रकला, व्हईल घरात चार दिस धुसफुस. पण नंतर सगळं सुरळीत होईल बघ. आम्ही तुलाच सरपंच करणार. भांडणं झाली म्हणून काय वैरी थोडेच आहोत एकमेकांचे? शेवटी आमच्याच घराण्याची शान राहिल की!" मामाजीचे हे बोल किती खरे आहेत! देव आला द्यायला अन् पदर नाही घ्यायला अशी गत झालीय, विचार करुन करुन डोकं जड पडलंय. चंद्रकला भानावर आली. साडीच्या पदरानं तिनं डोक्याला गच्च आवळून बांधलं अन् डोळे मिटून पडून राहिली. दुःख आणि वेदनेनं तिला ग्लानी आली. रात्रभर ती पडल्याजागीच झोपून राहिली. पहाट झाली. गार वारा सुटला. श्रीपती उठला. आईला म्हणाला, "माय, म्या सायाळला नेऊन सोडतो हिला. कपडे घेऊन नीघ म्हणावं. मला हिचं तोंड बगायचीबी इच्छा नाही."

"म्या कोनाला काय बोल बापू? एकापरिस एक शाने निघालाव तुमी. मारझोड करण्यापरिस जेची लेक तेला पोचती करुन येण्यात शहाणपण हाय, असं बोलून श्रीपतीची आई चंद्रकलाला उद्देशून म्हणाली,

"जा बाई. आपल्या माहेरी जा. राग निवळल्यावर येशील परत. काय सांगावं बाई तुमा आजकालच्या शिकलेल्या पोरींना? अगं, संसार तोडणं सोपं असतंय बाई, पर जोडणं लयी अवघड काम. नवऱ्याची मर्जी राखणंच बायकांचा धर्म असतो. पर आजकालच्या पोरींना नवऱ्याच्या

बरोबरीनं वागायला पाह्यजे. सोताच्या विचारानं राहायला पाह्यजे असं वाटतंय. कर्माच्या भोगापुढून कोण गेलंय? अवदसा सुचते कायतरी. मी पिकलं पान. शिरपतीच्या बापावानी पटकन गळून पडावं एवढंच मागणं मागतेय त्या देवाकडं. त्ये गेले अन् मला ठेवलं मागं, लेक-सुनेचं हे नाटक बगायला."

श्रीपतीच्या म्हाताऱ्या आईनं डोळ्याला पदर लावला तशी बायजाही रडू लागली. ती रडत म्हणाली, "माय, तसं का बोलतीस? तू माजी सावली हाईस."

चंदकलाच्या मनात प्रचंड खळबळ माजली. काय निर्णय घ्यावा हेच तिला कळेना. तिनं आपले कपडे पिशवीत भरले. सासूच्या, नणंदेच्या पाया पडून मूकपणेच ती श्रीपतीपाठोपाठ निघाली. चंद्रकला माहेरी आली. झाला प्रकार सर्वांना समजला. चंद्रकलाला सोडून श्रीपती बनपूरला निघून गेला.

श्रीपती चावडीसमोरुन घराकडे जाताना गंगाधर, तुकाराम, पांडू सगळेच म्हणाले, "ए श्रीपती, अरं ये की वाईच, लयीच कामाचा झालास की."

श्रीपती त्यांच्याजवळ जात म्हणाला, "तुमीच काम लावून देलंय नव्हं का. गंगाधर, सकाळीच सोडली बल्ला सासरवाडीला नेऊन, आता तुझा मार्ग मोकळा झाला."

"हे बरं झालं बघ."

"वयनी सरपंच झाली तर आधी तुलाच सोडचिठ्ठी देईल बघ ती. असली बायको नसलेली परवडली. तुझ्या जागी मी असतो तर काय केलं असतं ठाऊक हाय?." गंगाधर म्हणाला.

"काय केलं असतं?" श्रीपती म्हणाला.

"अरं, लाथा घालून घरातून हाकलून दिलं असतं अन् थाटात दुसरी बायको केली असती. तुझी हाय काय हिंमत सांग? लेका, आता दुसरी वयनी करुन देतो, गंगाराम म्हणाला, तसा तुकाराम श्रीपतीला

चिडवण्यासाठी म्हणाला, "श्रीपती दुसरं लगीन करील म्हणता? त्याची काय हिंमत हाय रं त्या जहांबाज बायकोम्होरं . अरं, गड्यानों, पहिल्या बायकोच्या नाकावर टिच्चून दुसरं लगीन करायला हिंमत असावी लागते. हिंमत!

तसा श्रीपती इरेला पेटून म्हणाला, "ये गंगाधर मला भरीस घालू नगं. अरं मी भितो की काय. एक नी धा बायका करीन. सांग हाय का ध्यानात कुठं पोरगी?"

"अरं, मज्या मामाची पोरगी हाय. नक्षत्रावाणी देखणी हाय. पण गरिबी हाय घरची, जुळत नाही कुठं. करतो मनलास तर चल. उद्या बासरच्या देवळात लगीन लावून टाकू." गंगाधर श्रीपतीला म्हणाला.

"चल, मी हाय तयार, जा सांग तुज्या मामाला. लग्नाच्या तयारीला लागा म्हणांव."

"अरं पण...इलेक्शन हाय चार दिसावर." गंगाधर म्हणाला.

"ए, आधी लगीन श्रीपतीचं, मग इलेक्शन सरपंचकीचं. " तुकारामानं तानाजीच्या आवेशात घोषणा केली. गुपचूप श्रीपतीच्या लग्नाचा बेत ठरला. बासरच्या सरस्वती मंदिरात गंगाधरच्या मामाच्या मुलीसोबत श्रीपतीचं लग्न लागलं. निवडणूकीची रणधुमाळी संपेपर्यंत मुलीला माहेरीच ठेवण्यात भलाई आहे. या जाणिवेनं मंदाला तिच्या माहेरी ठेवण्यात आलं. मात्र निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी तिला बनपूरला आणण्यांत आलं. आपल्या नवऱ्याच्या पराक्रमामुळं गंगाधर सरपंच झाला, त्याची विजयी मिरवणूक तिलाही पाहता यावी हा हेतू तिला बनपूरला आणण्यापाठीमागं होता. श्रीपतीचा चुलता सायाळला गेला. आपल्या मूर्ख पुतण्याला कृतीतून योग्य उत्तर द्यायचं ठरवून चंद्रकलाचा सरपंचपदासाठी फॉर्म भरला. तिची सही घेतली. सूचक म्हणून आपली सही केली. अर्ज दाखल करायला ते जाणार इतक्यात गंगाधर आणि त्याच्या साथीदारांना ही बातमी समजली. साम-दाम-दंड-भेद नीतीचा वापर करून सरपंचपद रिकामे ठेवायचा गंगाधरचा निर्णय पक्का होता. श्रीपतीची त्याला साथ होती. उपसरपंच राहून सरपंचपदाचा कारभार सांभाळायचा असं गंगाधरनं मनाशी ठरवून टाकलं होतं. रस्त्यातच श्रीपतीच्या चुलत्याला-रामजी पाटलाला अडवण्यात

आलं. काही कळतं न कळतं तोच रामजी पाटलाच्या डोक्यावर काठीचा दणका बसला. रामजी पाटलासोबत असलेल्या काही समर्थकांनाही मारहाण करण्यात आली. गंगाधरनं रामजी पाटलाचा अर्ज घेऊन फाडून टाकला व दातओठ खात म्हणाला,

"ए थेरड्या, गुमान गप्प बसणार नाहीत तू. तुझ्यावर मी डोळा ठेवूनच होतो. आता मतदानाला जर आलास तर उद्या तुझं मडं वेशीबाहेर दिसंल. आला मोठा सुनेला सरपंच करणारा. व्हयना वस्ती अन् खेळतो कुस्ती!"

रामजी पाटलाच्या अन् गंगाधराच्या गटात मारामारी झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली सरपंच पदासाठी एकही अर्ज दाखल होऊ शकला नाही. निवडणूक पार पडली. गंगाधर उपसरपंच झाला. सरपंचपद रिकामंच राहिलं. दोन्ही पदं गंगाधरच्या दारी आपोआपच चालत आली. गावांत गंगाधरची माणसं विजयानं धुंद होऊन नाचत होती तर रामजी पाटील मारहाणीत जखमी होऊन तालुक्याच्या दवाखान्यात विव्हळत होते. हा अन्याय सहन करणं चंद्रकलाला केवळ अशक्य झालं. तिनं पोलिसांत फिर्याद दिली.

चंद्रकला मोठ्या धाडसानं बनपूरला स्वतःच्या घरीच राहत होती. कामधंदा करत होती. शेतीकडं पाहात होती. चंद्रकलाच्या या नैतिक बळामुळं गावातील सगळेच गप्प झाले. गंगाधर आणि श्रीपतीची जमानत घ्यायला गावातून कोणीही पुढं आलं नाही. अशीच चंद्रकला शेताकडं जात होती, तिच्या कानावर आवाज आला.

"बघा, नवऱ्याला जेलमदी टाकून बाई शेती बघतेय. काय काळीज हाय. मानलं बुवा लोक कुजबुजत होते. घराघरात नवऱ्यांना बायका धमकी देत होत्या.

"बघा बरं. तुम्ही माझा छळ करू नका. नस्ता मी त्या चंद्रकलासारखं तुमच्यावर पोलीस केस करीन."

चंद्रकला लोकांच्या प्रतिक्रिया ऐकत होती. त्याकडं दुर्लक्ष करून ती आपलं काम करण्यासाठी रस्ता तुडवीत शेताकडं जात होती. रस्त्यावरची माणसं ती दिसताच बोलणं बंद करून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होती. ते पाहून वडाच्या झाडाखालचा एक म्हातारा त्या माणसांना उद्देशून म्हणाला,

"काय बघताय रं असे? गावची वाघीण हाय ती तिची वाटच वेगळी हाय!"

**("तिची वाटच वेगळी")**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) चंद्रकला सरपंच होऊ नये यासाठी श्रीपती व गंगाधर यांनी कोणकोणती कारस्थाने केली?

२) चंद्रकलाने कोणाच्या साथीने श्रीपती व गंगाधर यांना कशाप्रकारे वठणीवर आणले?

३) आपल्या अस्तित्वासाठी चंद्रकलेने कोणा-कोणाशी व कसा संघर्ष केला?

****

# ४. देव घावला! देव पावला!

**वामन होवाळ**

**परिचयः** वामन गोविंद होवाळ (१९३८) मराठीतील नामवंत कथाकार; लोकनाट्य-लेखक, 'बेनवाड', 'येळकोट', 'वारसदार', 'वाटा आडवाटा' इत्यादी कथासंग्रह; 'नाम्या म्हणे मी उपाशी', 'जपून पेरा बेणं', 'आंधळ्याची वरात बहिऱ्याच्या घरात' ही लोकप्रिय लोकनाट्ये.

अन्यायाविरुध्द बंड करणारा तरुण नायक त्यांच्या कथांतून भेटतो. तसेच ग्रामीण माणसांच्या जीवनातील विसंगती, संघर्ष, तडजोडी हे त्यांचे लेखनविषय. रसरशीत व्यक्तिचित्रण, मिश्कील विनोदी संवाद, बोलीभाषेतून व्यक्त केलेले जीवनानुभव व तत्त्वविज्ञान ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये.

अंधश्रध्देचा त्याग करुन शहरात गेलेल्या दांपत्याकडून गावातील सामान्य माणसांचा हा देवभोळेपणाचा लाभ उठवणाऱ्या दांभिक प्रवृत्तीची खिल्ली उडविली जाते याचे मार्मिक चित्रण या कथेत आले आहे.

---

कोंबड्यानं दिलेल्या धारदार बांगेनं यल्लाप्पा खडबडून जागा झाला. लगबगीनं उठून त्यानं आजूबाजूला पाहिलं. अगदी फटफटीत होत आलं होतं. बरीच वर आलेली शुक्राची चांदणी निस्तेज होत चालली होती. मावळतीला झुकलेलं बाजलं पार उलंपालटं झालं होतं. यल्लाप्पानं ते पाहिलं आणि तो स्वगतच बोलला, "आराराऽ पार उजाडलं की!"

अंगावर चादरीची भाळ मारुन तो घरात गेला आणि "कुसे, एऽ कुसे ऽऽ" असं म्हणत त्यानं कुसाबाईला चिखलातल्या मेढीगत लडालडा हलविलं.

वाऱ्यानं हालणाऱ्या मांडवावरच्या पडवळासारखं अंग तीन जागी वाकडं करीत कुसानं लोळण घेतली आणि म्हटलं, "का वं ? रामाधर्माच्या पारी का कोकालताय?"

"अगे, पार उजाडलं की! सगळं आटपून वांगीला कवा जायचं?" यल्लाप्पा काहीसा चिडून म्हणाला,

"याऽ बयाऽ खरं की काय?" असं म्हणत कुसा लगबगीनं उठली.

अंथरूणं झडाझडा झाडून तिनं वलाणीवर टाकली. घाईघाईनं हातपाय तोंड धुतलं. रात्री राहिलेली भाकरी घेऊन तिच्यावर चटणीची भुकटी टाकली. झाली तयारी!

घरात जाऊन कोनाड्यात ठेवलेला जग तिनं रुसलेल्या पोराला ओढावं तसा दरदिशी दाराच्या तोंडी ओढला. जगाला अडकविलेले अनेक देव खुळऽकन हसले. जगात कुठंतरी भंडाऱ्यात पडलेली काकणं किणकिणली. दाराच्या तोंडी जग मांडून कुसा कमरेवर हात ठेवून म्हणाली, "आवं, आता का उशीर करताय? धरा; हात लावा जरा."

खांद्यावर टाकलेलं धोतर सावरीत यल्लापा पुढं झाला. कमरेत वाकून त्यानं जगाला हात लावला अन् तो कुसाच्या डोक्यावर दिला. कण्हत-कुथत कुसानं तो जग शिरावर झेलला आणि ती घराच्या बाहेर पडली.

यल्लाप्पानं मग एका काखेत झोळी अन् दुसऱ्या काखेत तुणतुणं अडकविलं. हातात चौंडकं घेतलं आणि तोसुध्दा झपाझप वाटेला लागला. इनाम ओढा ओलांडून ते टेकडीला लागले. माळाचा गुलजार फुफाटा पायाला गुलालासारखा भासत होता. वारा थोडासा वाहतच होता. कुणी कष्टाळू शेतकऱ्यानं भल्या पहाटे जोडलेल्या मोटेचा कुईऽ कुईऽ असा आवाज येत होता. अख्ख्या माळावर कुणी माणूस म्हणून दिसत नव्हतं. सगळं सामसूम होतं. त्या प्रसन्न वातावरणात कुसा आणि यल्लाप्पा गप्पा मारीत निघाले होते. वांगीच्या ओढ्याजवळ पोहचताना त्यांनी दिवसाचा सोनेरी गोळा वर येताना पाहिला. दोघांनीही मनोभावे नमस्कार केला.

ओढ्यात उतारल्यावर मानेचा कढ जावा म्हणून कुसानं जग खाली ठेवला. यल्लाप्पानंही मग चांगली बचकंएवढी तंबाखू मळली, ह्या हातावरनं त्या हातावर तीन-तीनदा घोळली आणि तोंडात टाकली.

"हं, उचल बघू आता," असं म्हणून त्यानं जगाला हात घातला. कुसानं पुनः तो जग डोक्यावर घेतला.

कुसानं डोईवरचा जग मानेच्या काट्यात तोलून धरला आणि ती डाव्या काखेत तुणतुणं धरुन, उजव्या हातातल्या बारीक काडीनं ते वाजवू लागली. तुणतुण्याची तार झणझणू लागली. यल्लाप्पानं मान डोलवून 'धोंड कॉट कॉटऽ, धोंड कॉट कॉटऽ' अशा सुरातलं चौंडकं वाजवायला सुरुवात केली आणि दोघांनीही 'ओऽ दूर जानेवालेऽ' ह्या गाण्याच्या चालीवर 'रेणुका तू माझी आईऽ' हे गाणं धारदार आवाजात सुरु केलं. अंथरुणातून उठलेली उघडीनागडी पोरं 'लेकांनो, बघायला आलं' म्हणून त्यांच्याकडं धावली.

आयाबाया जोगवा वाढायला बाहेर येऊ लागल्या. यल्लम्मा हे कडक देवस्थान! ओल्या झाडालासुध्दा जाळून खाक करतं अशी या देवस्थानाची ख्याती! मग माणसाचं काय होईल ते कसं सांगावं? माणसाचा तर आजानात धुरळाच होऊन जाईल! ही अंधश्रध्दा दूर व्हायला अजून भरपूर अवधी होता. म्हणूनच त्या जोगवा वाढत होत्या; पण चार-सहा घरं मागून होतात न होतात तोच अमृत अण्णाचा बापू आला अन् त्यानं "ए लेकांनो, सारं जग सुधारलं अन् तुम्ही अजून जोगवा मागताच का?" असं खडसावलं.

कुसानं आणि यल्लाप्पानं आपला मोहरा गावात वळविला. नव्या नव्या चालीवर आईची गाणी म्हणून ते दोघं जोगवा मागत होते. कुणबी बायका पसा-कुडता दाणे सुपात घेऊन वाढत होत्या.

मागता मागता कुसा आणि यल्लाप्पा मारुती दादाच्या घराजवळ आले. त्यांना बघून ह्या दादाचं माथं भडकलं. तसा हा दादा स्वभावानं भारी फटकळ! देव नाहीच असं समजून भुता-खेतासारखा रात्री-अंधाराचंसुध्दा म्हसोबाच्या डोंगरात शेत राखणीसाठी मुक्काम ठोकायचा. कुणी भीक मागताना दिसला की दादाच्या कपाळाची शीर उभी राहायची. एकदा तर त्यानं मरीआईचा गाडा, पट काढून गडी फेकावा असा, फेकून

दिला होता. मरीआईच्या बाबानं वाळलेल्या केसांच्या जटा झाडून झाडून दादाला शाप दिला; पण दादाला काहीच झालं नाही.

...आणि नेमकी ह्या दादाच्या तावडीतच कुसा आणि यल्लाप्पाची जोडी सापडली गेली.

त्यांना तराटणी देत दादा म्हणाला, "ए यलप्या, ते वाजवायचं बंद कर पहिलं!" चौंडकं आणि तुणतुण्याचा आवाज गप्पकन बंद पडला. मारुतीदादा जरा थांबून म्हणाला. "का मागून खाताय रं सुक्काळीच्यांनो! हातपाय झडल्यात का तुमचं? कष्ट करुन पोट भरलं तर हातपाय काय उरावर येतील का?"

"मालक..." यल्लाप्पा अवघडून म्हणाला.

"अन् तुला काय धाड आलीय गं! पाठवार मोजलं तर मुंडा हात भरंल की! चला चालायला लागा, पुनः या गावात फिरकला तर याद राखा, जरा माणसासारखं जगा की!"

कुसा आणि यल्लाप्पा जग घेऊन गावाबाहेर पडले. आजवर अशी खूप बोलणी त्यांनी खाल्ली होती; त्याचं आजपर्यंत तरी त्यांना काही वाटलं नव्हतं. पण मारुतीदादानं केलेल्या 'कष्ट करुन जगा' या शब्दांच्या स्मरणानं त्यांच्या मनाला चटका लागला. गावाबाहेर असलेल्या वडाच्या सावलीला दोघेही न बोलताच थांबले. चितागती होऊन एकमेकांकडं पाहू लागले.

एवढ्यात डोक्यावर ट्रंक घेऊन चाललेला कदमाचा बापू दिसला. त्याला पाहून यल्लाप्पा म्हणाला, "रामराम मंबयवालं! सकाळच्या गाडीनं आला का काय?"

"होय. कसं काय बरं आहे ना? " बापूनं विचारलं.

"व्हय, पण तुम्ही मध्येच कसं येणं केलं?" कुसा काहीतरी बोलायचं म्हणून बोलली.

"आलो सहजच! " बापू बोलला.

"सहज कसं?"यल्लाप्पा म्हणाला, "सदुआण्णाची जमीन खरेदी करताय नव्हं चार हजाराला?"

"तुम्हांला ठाऊकच आहे की मग! " बापू हसत हसत बोलला आणि चालू लागला.

कुसा बराच वेळ गप्प झाली आणि म्हणाली, "आपणांला कवा जमीन-जुमला खरेदी करायला येईल का? हक्काचं घरदार तरी हाय का आपणांला? सात-आठ वर्सं झाली हे देवाचं सव्वा मणाचं ओझं माझ्या शिरावर हाय! ह्या देवाला तरी कणव येऊ नये का आपली! "

"अगं चालायचंच. आपल्या नशिबातच हे हाय, त्याला आपण तरी काय करणार!" यल्लाप्पा धीर देत म्हणाला.

"ह्याला नशीब म्हणायचं? मागायला गेलं की दाराशी आलेल्या कुत्र्यागत माणसं धुडकावून लावत्यात. घर न्हाय न् दार न्हाय! हक्काचं म्हणून काय हाय ह्या जगात आपलं!" कुसा डोकं फिरल्यागत बडबडत होती.

"आता रं देवा! आगऽ तुझं म्हणणं तरी काय हाय मग"! यल्लाप्पा कातावून म्हणाला.

"आपणसुध्दा पुण्या-मुंबईला जाऊया, कष्टाचं चार पैसं मिळवूया! "

"आन् हे देवस्थान ग ! " यल्लाप्पा भांबावून म्हणाला.

"हे देऊया सोडून! " कुसा निर्धारानं म्हणाली.

"कुसा!" यल्लाप्पा सावकाशीनं बोलू लागला, "ह्या कडक देवस्थानाच्या भंडाऱ्यात हात घातला. त्यामुळे सितूबुवाचं हातपाय झडलं; शंकर व्हलार रगात वकून मेला, अन् रामण्णा झिडून गेला. आन् आपण ह्या देवाला सोडला, तर एका रात्रीत धुरळा होऊन जाईल का न्हाय आपला?"

यल्लाप्पा चांगलाच हाबकला होता.

"देवाची रगड सेवा केलीया आपण! आता त्या वडाखालच्या पडक्या विहिरीत ह्या देवाला ठेवून मुंबईला जाऊया. काहीतरी पोटाचा उद्योग करूया."

"आग, पण... " यल्लाप्पा अडखळला.

"काय व्हत न्हाय! आता मनात आलंय हेच खरं!" कुसा बोलली आणि जगातल्या भंडाऱ्यात पडून असलेले सगळे पैसे तिनं काढून घेतले.

कुसा आणि यल्लाप्पा मुंबईला गेले. त्यांच्या एका नातेवाइकाकडे परेलच्या डबकचाळीत त्यांनी मुक्काम ठोकला. आठपंधरा दिवसांतच कुसा इतर बायकांच्या मदतीनं भाजीपाला विकायला शिकली.

भल्या पहाटे उठायचं, डोक्यावर हेलपाटी घेऊन परळ स्टेशन गाठायचं. पहिली गाडी पकडून थेट भायखळा मार्केट. भाजीपाला खरेदी करायचा आणि तो दिवसभर विकायचा.

हे बरं होतं. कुणाचं एक नव्हतं, दोन नव्हतं. पोटपाणी भागून दिवसाकाठी दोन दोन रुपये सुटायला मरण नव्हतं. डालडाच्या डब्याचे पत्रे ठोकून बनविलेली ती झोपडी कुसा आणि यल्लाप्पाला महालासारखी वाटायची. सगळं ठीक होतं. उण्याला भर म्हणून यल्लाप्पालाही 'सन्चरी' मिलमध्ये 'कोंबड' खात्यात नोकरी मिळाली. आता सगळं मनासारखं चाललं होतं.

एके दिवशी यल्लाप्पानं चार इष्टमित्रांना गोळा केलं. स्वतःला भारीपैकी धोतर-पैरण अन् टोपी घेतली. मधल्या बोटात सोन्याची अंगठी चढवली. कुसासाठी तिच्या मनाला येईल असली साडी-चोळी घेतली. गळ्यात एक बोरमाळ अन् मणी-डोरलं घातलं. इष्टमित्रांना जेवणबी दिलं. सर्वांना खूश केलं.

दिवस अंधारात दडत होते. अंधाऱ्या रात्री उजेडासाठी धडपडत होत्या. कालचक्र चालूच होतं. चार-पाच वर्षांचा काल गेला आणि एकदा आपल्या गावी जावं असं कुसाच्या मनात आलं. आपला विचार तिनं यल्लाप्पाला बोलून दाखविला. सगळी तयारी झाली एका रातराणीनं कुसा आणि यल्लाप्पा गावी येऊन पोचले.

गावात बराच बदल झाला होता. विजेचे खांब आले होते. मराठी शाळेची एक नवी इमारत उभी होती. कदमाच्या वीस खणी घराच्या मोक़ळ्या सोप्यावर पडव्या बांधून खोल्या तयार केलेल्या दिसल्या बहुधा कदमबापूची पोरं वायली राहिलेली असावीत. पाराखाली पाणी उपसायचा पंप लावलेला दिसला. कडक उन्हामुळं पारावरच्या पिंपळाची पानं मात्र पार गळून गेली होती.

त्यांना पाहताच मधल्या आळीच्या तानूबाईनं त्या दोघांना अगत्यानं घरी नेलं. मग चहूकडच्या आया-बाया गोळा झाल्या.

"कुसा, किती ग बदललीयास?" हौसा वैनीनं विचारलं.

"चोरीमारी करुन गेल्यागत कुठं फरारी झाला होता?" शिंदेबाई अंदाज घेऊ लागल्या. "आमी मुंबईला गेलो होतो. कुसा म्हणली.

"कस, बरं चाललंय नव्हं?"

"व्हय एकदम चांगलं! दोघांनांही नोकरी हाय! यावं म्हणलं चार-आठ दिवसाच्या रजेवर!"
यल्लाप्पा म्हणाला.

"बरं झालं. पण कुसा, देव कुठं हाय ग?" विठा वारकरणीनं विचारलं.

"हाय की?" कुसा म्हणाली.

"कुठाय? दिसत न्हाय ते! संगं आणला न्हाय का? "

"व्हय; देवाला रजा मिळाली न्हाय!" कुसा हसत म्हणाली.

"अग दवाड." विठा वारकरीण सांगू लागली, "वांगीच्या अण्णा भगताला देव घावलाय."

"देव घावलाय?" गप्पकन यल्लाप्पानं विचारल.

"व्हय! गावाबाहेरच्या वडाखालच्या विहिरीत सायना संगीत देव घावला. देव्हाऱ्यात जपून ठेवल्यागत होता. तुमच्या देवासारखाच. एक महिना झाला. वांगीत उरसाचा दणका उठलाय!"

हे खरं होतं पाण्याचा दुष्काळ पडू लागला, म्हणून अण्णा भगतानं ती विहीर खणली. त्यातच हा देव घावला. त्या देवाची गावभर वाजतगाजत मिरवणूक काढली. भगतानं देऊळ बांधलं आणि आपणच देवाचा भक्त होऊन बसला. घावलेला देव बघायला माणसाचा पूर वाहू लागला. पूजा व्हायला लागली. कैक आंधळ्यांना डोळे आले. अनेक जणांना अनेक प्रकारे गुण आला. चहूकडे हाच बोलबाला!

कुसा आणि यल्लाप्पा हे सगळं मिस्कीलपणे हसत ऐकत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून कुसा आणि यल्लाप्पा वांगीला गेले. नवीन बांधलेल्या देवळात खूप लोक जमले होते. आतल्या अंगाला एका कट्ट्यावर जग मांडला होता. त्यातले सगळे देव चकचकीत होते. सभोवतालची मोरपिसं हळुवार वाऱ्यानं उडत होती. जगाभोवती भंडाऱ्याची उधळण झाली होती. समोर अण्णा भगत उघडाबंब होऊन बसला होता.

कुसा आणि यल्लाप्पा देवाजवळ जाऊन पोहोचले.

“काय काम आहे तुमचं?” अण्णा भगतानं गुरगुरत्या आवाजात विचारलं.

देवाच्या नावावर मिळकत व्हायला लागल्यापासून अण्णा फार कमी आणि मोजकं बोलत होते. “हा देव घावला तुम्हांला?” कुसानं विचारलं.

“पहिला सव्वा रुपया मांडा नि मग विचारा काय विचारायचं ते!” अण्णा भगत म्हणाला. “कुठं? त्या वडाखालच्या विहिरीतच घावला नव्हं ह्यो देव?”

“हो, हो. देव मला घावलाय, मला पावलाय! काय म्हणणं हाय तुमचं?” अण्णा भगत पुनः गुरगुरला.

“मालक, पाच-सहा सालांपूर्वी आम्हीच ह्या देवाला हिरीत ठेवला होता!” यल्लाप्पा म्हणाला. “तोंड आवरुन बोला!” अण्णा नाकपुड्या फेंदारुन म्हणाला. “जाळून राख करीन!”

“ते आम्हांला भ्या घालू नका. खोटं वाटत असेल तर त्या देवाच्या मागच्या बाजूला आमचं नाव हाय का न्हाय बघा!” कुसा हसत म्हणाली.

अण्णा भगतानं उठून मोठा देव उचलला. त्याला उलटा केला. खरंच त्यावर बारीक अक्षरांत नाव कोरलं होतं ‘कुसाबाई यल्लाप्पा तुपे!’

अण्णा भगताचं धाबचं दणाणलं. आता हे लोक बाहेर बोभाटा करणारं. आपलं पितळ उघडं पडणार, याची त्याला धास्ती वाटू लागली.

तो एकदम नरम येऊन म्हणाला, "तुम्ही ह्या देवाचं जुनं भगत. मी तुम्हांला शे-दीडशे रुपये देतो, पन हे चार लोकात सांगू नका."

आणि त्यानं आपल्या आसनाखालून दहा-दहाच्या नोटा काढल्या.

"ते ऱ्हाऊ द्या तुमच्याकडंच अण्णासाब!" कुसा यल्लाप्पाकडं वळून म्हणाली, "आता चला हो!"

देवळाबाहेर पडणाऱ्या कुसा आणि यल्लाप्पामागं पैसे घेऊन "ह्यातलं पाच-पंचवीस तरी घ्या." असं म्हणत अण्णा भगत गयावया करीत धावत होता.

**('बेनवाड')**

**अ) ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

